CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २४ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ४८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विनम्र अभिवादन



साने गुरुजी यांची आज जयंती

## महत्त्वाचे

### उच्च न्यायालयाचा पूजा खेडकरला दणका

**नवी दिल्ली** : नागरी परीक्षेतील फसवणूक आणि चुकीच्या पद्धतीने ओबीसी व अपंगत्व कोट्याचा लाभ घेतल्याप्रकरणी दाखल फौजदारी खटल्यात अटकपूर्व जामीन देण्यास नकार देत दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी माजी आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरला दणका दिला. अटकपूर्व जामीन फेटाळला जात असून, अटकेवरील अंतरिम संरक्षण उठवले जात आहे, असे न्या. चंद्रधारी सिंह यांनी याचिकेवर निर्णय देताना सांगितले. पूजा खेडकरच्या विरोधात प्राथमिकदृष्ट्या भक्कम पुरावे आहेत त्यामुळे तपास आवश्यक आहे.

### रजिस्ट्रीसाठी हेलपाटे होणार बंद : बावनकुळे

**नागपूर** : लोकहिताचे निर्णय घेण्यासाठी आम्ही आलो आहोत. एखाद्या रजिस्ट्रीसाठी नागरिकांना आता हेलपाटे घालण्याची गरज उरणार नाही. कोणतीही रजिस्ट्री आता कोणत्याही कार्यालयातून करता येईल, यादृष्टीने महायुतीचे सरकार कार्य करणार आहे. पासपोर्ट कार्यालयाच्या दर्जाचे आणि तशा सोयीसुविधा असलेले महसूल कार्यालय नागरिकांना लवकरच बघायला मिळेल, असा विश्वास राज्याचे नवनियुक्त महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. यापुढे गैरमार्गाने आपली कामे करवून घेणाऱ्यांनी सावध व्हावे. आमच्या सरकारमध्ये कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अधिकाऱ्याला पैसे देऊन बदल्या करवून घेता येणार नाहीत. यापुढे कोणत्याही शिफारशीशिवाय उमेदवारांना नोकरी मिळेल. नियमाबाहेर कोणतेही काम होणार नसल्याची स्पष्टोक्ती महसूलमंत्र्यांनी केली. तरुण भारत कार्यालयाला दिलेल्या सदिच्छा भेटीत उपस्थितांशी संवाद साधला.

### अमरावतीच्या मजुरांचा पुण्यात अपघातात मृत्यू

**पुणे** : सोमवारी पहाटे पुण्यात फूटपाथवर झोपलेल्या लोकांना ट्रकने धडक दिल्याने दोन चिमुकले आणि एक माणूस ठार झाला, तर अन्य सहा जण जखमी झाले असे, पोलिसांनी सांगितले. ठार झालेले मजूर अमरावतीतील होते. वाघोली परिसरातील फूटपाथवर पहाटे १२.५५ वाजता ही घटना घडली. येथे अनेक लोक झोपले होते. ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही घटना घडली. मृतांमध्ये मूळचे अमरावती येथील मजूर आणि त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश आहे. हे मजूर काही दिवसांपूर्वी नोकरीच्या शोधात पुण्यात आले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. वैभवी पवार, वैभव पवार, आणि विशाल पवार अशी मृतांची नावे आहेत. या घटनेनंतर ट्रकचालक गजानन तोत्रे याला अटक करण्यात आली. तो मद्याच्या धुंदीत वाहन चालवत होता का, हे तपासण्यासाठी त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

### ठाण्यात ८ बांगलादेशी घुसखोरांना अटक

ठाणे : ठाणे जिल्ह्यात बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गोपनीय माहिती आणि तक्रारीच्या आधारे पोलिसांनी भिवंडीतील काल्हेर आणि कोनगाव येथे शनिवारी आणि रविवारी छापे टाकले. या नागरिकांकडे भारतात राहण्यासाठी कोणतेही वैध कागदपत्रे नव्हती, यामध्ये तीन जण भंगार विक्रेते, दोन मजूर, एक गवंडी आणि दुसरा प्लंबर म्हणून काम करीत होते. कायद्याच्या तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाचवी-आठवीच्या विद्यार्थ्यांना आता अनुत्तीर्ण करण्याची परवानगी

## केंद्राने रद्द केली 'नो डिटेन्शन पॉलिसी'

**नवी दिल्ली, २३ डिसेंबर**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सोमवारी एक महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेत 'नो डिटेन्शन पॉलिसी' संपवली आहे. यामुळे आता पाचवी आणि आठवीत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढे ढकलले जाणार नाही.

या धोरणाची घोषणा करताना शिक्षण मंत्रालयाने म्हटले की, पाचवी आणि आठवीत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन महिन्यांत पुन्हा एक परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे, मात्र या परीक्षेतही अनुत्तीर्ण होणाऱ्यांना वर्गात ढकलले जाणार नाही. मात्र, आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना



अनुत्तीर्ण झाला म्हणून, कोणत्याही स्थितीत शाळेतून काढून टाकले जाणार नाही. शालेय शिक्षण सचिव संजयकुमार यांनी आज एका पत्रपरिषदेत याबाबतची घोषणा केली.

शिक्षण मंत्रालयाने आज 'नो डिटेन्शन पॉलिसी' संपवण्याची घोषणा केल्यामुळे आता पाचवी आणि आठवीतील विद्यार्थी अनुत्तीर्ण होऊ शकतात. विद्यार्थ्यांची शिकण्याची क्षमता अधिक विकसित करण्यासाठी तसेच त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता सुधरवण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला, असे संजयकुमार म्हणाले.

शिकण्याचा अधिकार (राईट टु एज्युकेशन) कायद्यात सुधारणा करीत सरकारने २०१९ मध्ये 'नो डिटेन्शन पॉलिसी' लागू केली होती. आज ही पॉलिसी रद्द केल्यामुळे देशातील तीन हजारांवर केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये आणि सैनिकी विद्यालयांवर या धोरणाचा परिणाम होणार आहे. विशेष म्हणजे, दिल्ली सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने यावर्षीपासूनच हे धोरण रद्द केले होते. *(तभा वृत्तसेवा)*

### विद्यार्थ्यांची शिकण्याची क्षमता घटली

'नो डिटेन्शन पॉलिसी'मुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या क्षमतेत घट झाली होती. वर्ग पाच आणि आठ हा शिक्षणाच्या दृष्टीने मूलभूत असा पाया आहे. या धोरणामुळे विद्यार्थी तसेच शिक्षक या दोघांनाही अभ्यासाच्या दृष्टीने अधिक गंभीर व्हावे लागणार आहे. पाचवीत आणि आठवीत अनुत्तीर्ण होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारची शैक्षणिक शिथिलता आली होती तसेच शिक्षकांमधील शिकवण्यबाबतचे गांभीर्यही कमी झाले होते. अभ्यास नाही केला, तरी आपण उत्तीर्ण होणारच असा अनाठायी विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला होता.

# सालगड्यानेच केला मालकाचा खून

## मोहोळ तालुक्यातील यल्लमवाडीतील घटना; आधी सोने चोरले, नंतर खून करुन पुरावा नष्ट करण्याचा केला प्रयत्न, धाराशिव जिल्ह्यातील आरोपी गजाआड

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २३ डिसेंबर-**

ज्याच्या शेतात काम करतो. त्याच द्राक्ष बागायतदाराचा सालगड्याने सोने चोरीच्या उद्देशाने खून करून मृतदेहाचे तुकडे तुकडे करून घराच्या पाठीमागे पुरुन पुरावाही नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु या घटनेचा उलगडा करण्यात मोहोळ पोलिसांना यश आले. ही घटना यल्लमवाडी (ता. मोहोळ) येथे घडली. कृष्णा नारायण चामे (वय ५२) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. आरोपीचे नाव सचिन भागवत गिरी असे आहे.



मयत कृष्णा चामे

मोहोळ तालुक्यातील यल्लमवाडी येथील कृष्णा चामे हे कुटुंबासमवेत काळेवाडी, पुणे येथे राहत होते. यल्लमवाडी येथे १० ते १५ दिवसांतून येऊन शेती करत होते. शेतातील द्राक्षांच्या बागेची औषध फवारणी व इतर शेती कामासाठी त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील सांगवी येथील सचिन भागवत गिरी याला कामाला ठेवले होते. दरम्यान दि. १४ डिसेंबर रोजी ९ वाजण्याच्या दरम्यान त्यांच्या राहत्या घरातून दोन अज्ञात व्यक्तींनी दुचाकीवरून येऊन चामे यांच्या अंगावरील सोने घेण्याकरता किंवा अज्ञात कारणास्तव त्यांचे अपहरण केल्याची फिर्याद त्यांचा मुलगा विश्वजीत चामे याने मोहोळ पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक रणजीत माने यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा तपास सुरू होता. तपासादरम्यान मयत कृष्णा चामे यांच्या शेतात काम करणारा सचिन गिरी याच्यावर पोलिसांचा संशय बळावला. याबाबत पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने पोलिसांना दिलेल्या कबुली जबाबमध्ये मालक कृष्णा चामे यांचा हातोड्याने मारहाण करून खून करून मृतदेहाचे चाकूने तुकडे करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने पुरून ठेवले असल्याचे सांगितले. ते तुकडे पोलिसांना त्याने काढून दिले. मृत कृष्णा चामे यांच्या अंगावरील सोन्याचे दागिनेही काढून दिले.



पोलिस निरीक्षक रणजित माने

अंगावरील सोने चोरी करण्याच्या उद्देशाने कृष्णा चामे यांचा खून केल्याप्रकरणी सचिन गिरी याच्यावर मोहोळ पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक रणजीत माने करीत आहेत.घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार, मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत माने आदींनी घटनास्थळी भेट दिली.

### राज्यात बुधवारपासून पावसाची शक्यता

**पुणे** : उत्तर भारतातून येणारे थंड वारे अन् दक्षिण भारतातून येणारे बाष्पयुक्त वाऱ्याच्या प्रभावामुळे ऐन थंडीत राज्यात पर्जन्यस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे गुरुवार २६ आणि शुक्रवार २७ डिसेंबर रोजी राज्यातील बहुतांशी भागात पावसाची शक्यता पुणे हवामान विभागाचे प्रमुख डॉ.के.एस. होसाळीकर यांनी वर्तवली आहे. गुरुवार २६ आणि शुक्रवार २७ डिसेंबर रोजी राज्यात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

# रोजगार-स्वयंरोजगाराच्या संधी वाढल्या : नरेंद्र मोदी

## ७१ हजार तरुणांना मिळाली नियुक्तिपत्रे

**नवी दिल्ली, २३ डिसेंबर**

आमच्या सरकारच्या धोरणा आणि निर्णयामुळे देशात रोजगाराच्या तसेच स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहे, देशातील युवकांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी केले. गेल्या दीड वर्षात देशात दहा लाखांवर तरुणांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

देशभरात आयोजित रोजगार मेळ्याच्या माध्यमातून आज ७१ हजार तरुणांना नियुक्ती पत्रे देण्यात आली, या कार्यक्रमात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगने सहभागी होत मोदी म्हणाले की, आज भारतातील तरुण नव्या आत्मविश्वासाने ओतप्रोत आहे, समाजाच्या सर्व क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचे झेंडे गाडत आहे. देशात ४५ ठिकाणी आयोजित रोजगार मेळ्यात ७१ हजारांवर तरुणांना केंद्र सरकारची विविध मंत्रालये तसेच विभागांमध्ये नियुक्तीची पत्रे देण्यात आली.



रोजगार मेळ्यात डेहराडून येथे नियुक्तिपत्रांचे वितरण करताना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग राज्यमंत्री अजय टम्टा

नव्या भारताच्या निर्माणासाठी देशाला अनेक वर्षांपासून अत्याधुनिक अशा शैक्षणिक धोरणाची प्रतीक्षा होती. आमच्या सरकारने देशात नवी शैक्षणिक धोरण लागू केले आहे. त्यामुळे देशाची नव्या आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. आमच्या सरकारच्या धोरणांमुळे तसेच निर्णयांमुळे शहरी भागांतच नाही, तर ग्रामीण भागांतही रोजगाराच्या आणि स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. ज्याचा फायदा युवावर्गाला मिळाला आहे. गेल्या दीड वर्षात दहा लाख तरुणांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या, हा एक विक्रम आहे, असे ते म्हणाले.

**कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार**

कृषी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात रोजगार मिळाले, याकडे लक्ष वेधत मोदी म्हणाले की, मोदी सरकारच्या धोरणांमुळे तरुणांना फक्त रोजगारच मिळाला नाही, तर आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करण्याची संधीही मिळाली आहे. महिला सशक्तीकरणाला आपल्या सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे, महिला सर्व क्षेत्रात आत्मनिर्भर व्हावे, असा आमचा प्रयत्न आहे, असे ते म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

# नाराज भुजबळांनी घेतली देवेंद्र फडणवीसांची भेट

**मुंबई, २३ डिसेंबर**

मंत्रिपद न मिळाल्यामुळे छगन भुजबळ नाराज आहेत. या नाराजीदरम्यान सोमवारी छगन भुजबळ यांनी थेट सागर बंगला गाठत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. भेटीत नेमकी काय चर्चा झाली, हे अद्याप गुलदस्त्यातच आहे. मात्र, भुजबळांच्या या भेटीमुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

भुजबळांसोबत काय चर्चा झाली, असा प्रश्न विचारला असता, त्यांची तुमच्यासोबत चर्चा झालीच आहे, असे उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीवेळी समीर भुजबळही त्यांच्या सोबत होते. ही बैठक ४० मिनिटे चालली.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीत जो महाविजय झाला यात ओबीसी समाजाचे मोठे पाठबळ मिळाले असून, त्याबद्दल आभार मानत त्यांनी ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. याबाबत मी काळजी घेणार असल्याचे भुजबळ यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.






## महत्त्वाचे

### विनोद कांबळी रुग्णालयात दाखल, प्रकृती 'स्थिर'



**मुंबई** : भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी याची प्रकृती बिघडल्यामुळे त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ५२ वर्षीय कांबळीला त्याच्या एका चाहत्यांनी रुग्णालयात आणले होते. त्याचा मित्र ठाणे जिल्ह्यातील भिवंडीच्या कलरर भागातील रुग्णालयाचा मालक आहे. कांबळीची प्रकृती कशामुळे बिघडली, याचे कारण स्पष्ट झाले नसले तरी त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले जाते. शनिवारी कांबळीला रुग्णालयात दाखल करण्यात आले. १९९३-२००० दरम्यान भारतासाठी १७ कसोटी आणि १०४ एकदिवसीय सामन्या खेळणाऱ्या विनोद कांबळीने नुकतीच शिवाजी पार्क येथे दिग्गज प्रशिक्षक रामकांत आचरेकर यांच्या स्मारकाच्या उद्घाटन समारंभात हजेरी लावली होती. या कार्यक्रमात त्याचा दीर्घकाळचा मित्र सचिन तेंडुलकर देखील उपस्थित होता. कांबळी बऱ्याच काळापासून आरोग्याशी संबंधित संघर्ष करत आहे.

### एमबाप्पेचा शानदार गोल, रिअल माद्रिदचा विजय



**माद्रिद** : कायलिन एमबाप्पेने नोंदविलेल्या शानदार गोलच्या बळावर रिअल माद्रिदने स्पॅनिश लीग फटबॉल स्पर्धेत सेव्हिलाविरुद्धच्या साखळी सामन्यात ४-२ ने विजय नोंदवला. अखेरच्या दहा मिनिटांच्याखेळात एमबाप्पेने एका कोपऱ्यातून उजव्या पायाने जोरकसपणे फटका मारून संघाचा चौथा गोल केला. माद्रिदबरोबरच्या गत आठ सामन्यांतील हा एमबाप्पेचा सहावा गोल होता. त्याने आपल्या नवीन क्लबबरोबर लवकरच जुळवून घेतले, मात्र गत ४ डिसेंबर रोजी ॲथलेटिक बिल्बाओकडून रिअल माद्रिदला २-१ असा पराभव पत्करावा लागला.या सामन्यात एमबाप्पे पेनॉल्टी किक चुकला होता. माझ्यामध्ये अजून बराच खेळ शिल्लक आहे. मी बिल्बाओ विरुद्धच्या सामन्यात बरेच सकारात्मक धडे घेतले. मला या जर्सीसाठी माझे सर्व काही द्यावे लागेल आणि व्यक्तिमत्त्वाने खेळावे लागेल, से फ्रान्सचा एमबाप्पे सामन्यानंतर म्हणाला.

### मुंबई, महाराष्ट्र, झारखंड संघांचा विजय

**मुंबई** : विजय हजारे करंडक क्रिकेट स्पर्धेत सोमवारी तनुष कोटियानने ३७ चेंडूंत फटकावलेल्या नाबाद ३९ धावांच्या बळावर मुंबईने अहमदाबाद येथे झालेल्या सामन्यात हैदराबादवर ३ गड्यांनी विजय नोंदविला. अष्टपैलू तनुषने ३८ धावांत ३ बळीसुद्धा टिपले व त्यालाच सामनावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोमवारीच तनुषची बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील उर्वरित दोन सामन्यांसाठी भारतीय संघात निवड झाली. मुंबईत खेळल्या गेलेल्या सामन्यात ऋतुराज गायकवाडच्या झंझावाती नाबाद १४८ धावांच्या खेळीच्या बळावर महाराष्ट्राने सेनादल संघावर ९ गडी राखून दणदणीत विजय मिळविला. जयपूरमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात ईशान किशनच्या १३४ धावांच्या उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर झारखंडने मणिपूरविरुद्धचा सामना ८ गड्यांनी जिंकला.

# अश्विनच्या जागी तनुष कोटियान



**मुंबई, २३ डिसेंबर**

मेलबर्न येथे होऊ घातलेल्या भारत-ऑस्ट्रेलियादरम्यानच्या बॉक्सिंग-डे चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यासाठी अलिकडेच निवृत्त झालेला अव्वल फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनच्या जागी मुंबईचा ऑफस्पिनर-अष्टपैलू तनुष कोटियान याची भारतीय संघात निवड करण्यात आली. सोमवारी सायंकाळी मुंबई क्रिकेट संघटनेने त्याच्या निवडीची पुष्टी केली.

तनुषला ऑस्ट्रेलियाकडे मंगळवारी रवाना होण्यासाठी तयार राहण्यास सांगण्यात आले आहे, परंतु अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आले नाही. विजय हजारे ट्रॉफीसाठी संघाचा भाग म्हणून तनुष सध्या हैदराबादमध्ये आहे.

ऑस्ट्रेलियाकडे रवाना होण्यासाठी तयार रहा असा निरोप मिळाल्यामुळे मला खूप आनंद झाला. मला लवकरच अधिक तपशील मिळणार आहे, पण मी भाररतीय संघात सहभागी होणार आहे, असे तनुष कोटियानने सांगितले.

ब्रिस्बेनमधील गॅबा येथे अनिर्णीत राहिलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यानंतर आर. अश्विनने अचानकपणे सेवानिवृत्तीची घोषणा करणाऱ्या आर. अश्विन याच्या जागी बदली खेळाडू म्हणून तनुष कोटियान याची निवड करण्यात आली आहे. संघात रवींद्र जडेजा व वॉशिंग्टन सुंदर या दोन फिरकीपटूंचा समावेश आहे. सुंदर पर्थ येथे पहिला कसोटी सामना खेळला, या सामन्यात भारताने २९५ धावांनी विजय मिळविला, तर जडेजा ॲडिलेड येथे दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळला.

२०२३-२४ च्या रणजी करंडक हंगामात तनुष कोटियनने १० सामन्यांमधून २९ गडी बाद केले व १६.९६ च्या सरासरीने पाच अर्धशतके व एका शतकासह ५०२ धावा केल्या. त्या हंगामात मुंबईला ४२ व्या रणजी करंडकाचे विजेतेपद जिंकून दिले व तनुषला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार मिळाला. बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत सध्या भारत व ऑस्ट्रेलिया १-१ ने बरोबरीवर आहे व त्यांना अजून मेलबर्न व सिडनी येथे कसोटी सामने खेळायचे शिल्लक आहे. *(वृत्तसंस्था)*

## उर्वरित दोन कसोटींसाठी मोहम्मद शमी तंदुरुस्त नाही

**नवी दिल्ली** : भारताचा स्टार वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी बॉर्डर-गावस्कर पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उर्वरित दोन सामन्यांसाठी पूर्णपणे तंदुरुस्त नाही. शमीच्या डाव्या गुडघ्यावर किरकोळ सूज वाढल्यामुळे त्याला ऑस्ट्रेलियाला पाठवण्यात येणार नसल्याचे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सोमवारी स्पष्ट केले.

राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत बीसीसीआय वैद्यकीय पथक शमीच्या उजव्या टाचेवर शस्त्रक्रियेनंतर त्याच्या पुनर्वसनासाठी जवळून काम करत आहे. शमी या टाच समस्येपासून पूर्णपणे बरे झाली आहे, असे मंडळाने एका निवेदनात म्हटले आहे.

तथापि, त्याच्या डाव्या गुडघ्याने त्याच्या गोलंदाजीच्या कामाच्या ओझ्यातून ताण पडल्यामुळे किरकोळ सूज दर्शविली आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

नोव्हेंबरमध्ये मध्य प्रदेशाविरूद्ध बंगालच्या रणजी करंडक सामन्यात भाग घेतल्यानंतर शमीने ४३ षटके दिली, तेव्हा त्यांनी सय्यद मुश्ताक अली चषकाच्या सर्व नऊ सामन्यात दाखल झाला. या स्पर्धेदरम्यान त्याने आपली सहनशक्ती वाढविण्यासाठी व आगामी कसोटी सामन्यासाठी स्वत:ला तयार करण्यासाठी अतिरिक्त गोलंदाजीच्या सराव सत्रासह आपल्या सामन्याच्या वर्कलोडची पूर्तता केली.

# मनु भाकरने खेल रत्नसाठी केलेल्या अर्जाकडे दुर्लक्ष



**नवी दिल्ली, २३ डिसेंबर**

दोन ऑलिम्पिक पदकविजेती नेमबाज मनू भाकर हिचे नाव यावर्षी प्रतिष्ठित मेजर ध्यान चंद 'खेल रत्न' पुरस्कारासाठी नामांकित खेळाडूंच्या यादीतून गहाळ झाले आहे.

२०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मनू भाकरने दोन पदके जिंकून इतिहास घडवला. मनू १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत कांस्यपदक जिंकून ऑलिम्पिक पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला नेमबाज ठरली. तिने सरबज्योत सिंग याच्यासमवेत मिश्र १० मीटर एअर पिस्तूल संघाच्या स्पर्धेत आणखी एक कांस्यपदक मिळवून दिले आणि भारताच्या स्वातंत्र्यापासून कोणत्याही भारतीयांनी एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदक जिंकले.

सोमवारी, नेमबाज जवळच्या सूत्रांनी आयएएनएसला उघड केले की, नेमबाज मनू भाकरने खेल रत्न पुरस्कारासाठी अर्ज केला होता, परंतु त्यांना निवडण्यात आले नाही. मनु भाकरने खेल रत्नसाठी खरोखर अर्ज केला, परंतु विचित्रपणे निवडले गेले नाही. हे सर्वांसाठी धक्कादायक आहे. एनआरएआयची यात कोणतीही भूमिका नाही, असे सूत्रांनी सांगितले.

दरम्यान, एनआरएआयच्या वतीने अध्यक्ष कालिकेश नारायणसिंग देव यांनी मनू भाकर हिच्या प्रकरणावर करण्यासाठी क्रीडा मंत्रालयाला पत्र लिहिले आहे.

या वर्षाच्या सुरूवातीस, भाकरला समाजमाध्यमावर पोस्ट केल्यानंतर वाद निर्माण झाला. मनू भाकर खेल रत्न पुरस्कारासाठी पात्र आहे का असा प्रश्न विचारत आहे. समीक्षकांनी ते अयोग्य मानले आणि भाकरला ते हटविण्यास प्रवृत्त केले.

नामनिर्देशित खेळाडूंच्या यादीतून तिच्या नावाची अनुपस्थितीमुळे तिच्या समर्थकांमध्ये निराशा वाढली आहे.

पॅरिसमधील २२ वर्षीय मनूची कामगिरी ही अनेक वर्षे दृढनिश्चय आणि चिकाटीची कळस होती, विशेषत: २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये तिच्या पिस्तूल बिघडल्यामुळे पदक मिळाले नाही, परंतु पॅरिसमध्ये तिने जबरदस्त कामगिरी केली व टीकाकारांना शांत केले.

यावर्षी मनू भाकरची कामगिरी ऑलिम्पिक व्यासपीठापुरते मर्यादित नव्हती. तिने राष्ट्रकुल व आशियाड क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकांची कमाई केली. तिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत २०१८ च्या राष्ट्रकुलमध्ये सुवर्णपदक पटकावले व स्पर्धा विक्रम नोंदविला आणि २०२२ च्या आशियाडमध्ये महिलांच्या २५ मीटर पिस्तूल संघाच्या स्पर्धेत विजय मिळविला.

केवळ १६ व्या वर्षी मनू भाकर २०१८ मध्ये आयएसएसएफ विश्वचषकात सुवर्णपदक जिंकणारी सर्वात तरुण भारतीय नेमबाज ठरली होती. *(वृत्तसंस्था)*

# जिजामाता प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**



महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे सोलापूर संचलित जिजामाता प्राथमिक शाळा व जिजामाता बालक मंदिर तुळशीदासनगर कोंडी येथे क्रीडा स्पर्धा सप्ताहास सुरवाद झाली. याचे उद्घाटन मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पालक शिक्षक संघाचे रामचंद्र चव्हाण, शहाजी भोसले, दत्तात्रय अधटराव आदी उपस्थित होते. या सप्ताहात कबड्डी,खो-खो, लंगडी हे सांघिक खेळ व लिंबू चमचा, संगीत खुर्ची, बूक बॅलन्स,आदी वैयक्तिक स्पर्धा होणार आहेत. बाल जत्रेने सांगता होणार आहे. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे व क्रीडागंणाचे पूजन करण्यात आले व विद्यार्थी खेळाडूना क्रीडा शपथ देण्यात आली. बालवर्गातील मुलांनी यावेळी प्राण्यांचे मुखवटे घालून विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले.





# सेंट थॉमस, सेंट जोसेफची विजयी सलामी

## १५ वर्षाखालील मुलींच्या ''अस्मिता'' खेलो इंडिया फुटबॉल स्पर्धा

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

केंद्रीय क्रीडा मंत्रालय, स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया अस्मिता खेलो इंडिया उपक्रम अंतर्गत १५ वर्षाखालील मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत सलामीच्या सामन्यात सेंट थॉमस स्कूलने विमल कन्या प्रशालेचा दुसऱ्या सामन्यात सेंट जोसेफ स्कूलने पोलीस पब्लिक स्कूलचा पराभव केला. वालचंद शिक्षण समूहाच्या क्रीडा संकुलात ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन व वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आयोजित या साखळी फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियाचे बॉक्सिंग कोच सोनू टाक व कायदेसल्लागार गोकुळ बिनू यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, सोलापूर शहर व जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ किरण चौगुले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी स्पर्धेत सहभागी बटरफ्लाय स्कूलच्या आरती मलजी, पोलीस पब्लिक स्कूलचे संदेश पवार ,विमल कन्या प्रशालेचे सुरज ढमाळ, सेंट जोसेफ स्कूलचे सनी भोसले, लिटिल फ्लावर स्कूलचे पाटील, सेंट थॉमस स्कूलचे राजेंद्र गायकवाड या क्रीडा शिक्षकांचा तसेच पंचप्रमुख पंकज जाधव यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार राहुल हजारे यांनी केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची निदर्शने

## गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचा केला निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**



केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचे निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी पक्षाचे अध्यक्ष सुधीर खरटमल, माजी महापौर जनार्दन कारमपुरी, मनोहर सपाटे, प्रदेश उपाध्यक्ष भारत जाधव, प्रवक्ते ॲड.यू. एन.बेरीया, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड, सरचिटणीस चंद्रकांत पवार, युवक प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, सरफराज शेख, माजी नगरसेविका पूनम बनसोडे, अजित बनसोडे, लता ढेरे, शेखर शेरखाने, आदींची उपस्थिती होती.

यावेळी शहर अध्यक्ष खरटमल म्हणाले, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तातडीने राजीनामा द्यावा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केलेल्या वक्तव्याची माफी मागावी, आमचा खरा देव हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरच आहेत. कारण हा देशच त्यांच्या संविधानावर चालतो हे अमित शहा यांनी लक्षात घ्यावे असे सांगितले.

प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड म्हणाले, अमित शहा तुम्ही देशाचे गृहमंत्री केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे आहात, तुमची वागणूक म्हणजे एका गटरीतील प्राण्यासारखी आहे, म्हणूनच आम्ही तुमच्या चेहऱ्याला त्या प्राण्याचे स्वरूप देऊन तुमचा निषेध नोंदवत आहे.

प्रवक्ते यु.एन. बेरीया यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, भारतरत्न डॉ.बाबासाहेबांचा अपमान आम्ही खपवून घेणार नाही. देशातील मनोवादी वृत्ती हटली पाहिजे. तरच देश

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानासाठी काँग्रेसचा सन्मान मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**



देशाचे केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वक्तव्याने विविध संघटना, माथाडी कामगार यांच्या आंदोलन मोर्चानंतर आता काँग्रेस भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या सन्मानासाठी मैदानात उतरली आहे. काँग्रेसभवन समोर जोडेमार आंदोलन करण्याचा प्रयत्न केल्यानंतर आता, खासदार प्रणिती शिंदे यांनी आंदोलनात आघाडी घेतली आहे. डॉ. आंबेडकर यांच्याबद्दल अपमानजनक वक्तव्याचा जाहीर निषेध करण्यासाठी काँग्रेसच्या वतीने डॉ. आंबेडकर चौकातून सन्मान मोर्चा काढला. या मोर्चामध्ये खासदार प्रणिती शिंदे यांनी आपल्या हातामध्ये बाबासाहेबांची प्रतिमा घेऊन जोरदार निदर्शने केली व केंद्रीय गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. दरम्यान, या सन्मान मोर्च्यात काँग्रेस कार्यकर्त्यांनी आपल्या हातामध्ये डॉ. आंबेडकर यांची प्रतिमा घेतली होती. यावेळी '' जय भीम चा नारा देत अमित शहा माफी मागा अमित शहा यांनी राजीनामा घ्यावा'' अशी घोषणाबाजी करण्यात आली. डॉ. आंबेडकर चौकातून निघालेला हा मोर्चा जुना एम्प्लॉयमेंट चौक, सात रस्ता मार्गे नवीन जिल्हाधिकारी कार्यालयावर थडकला. यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. या मोर्चाचे नेतृत्व खासदार प्रणिती शिंदे यांनी केले. या मोर्चात शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर संजय हेमगड्डी, माजी स्थायी समिती सभापती रियाज हुंडेकरी, माजी नगरसेवक विनोद भोसले, सेवादल यंग ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष सुदीप चाकोते, भिमाशंकर टेकाळे, देवा गायकवाड, माजी नगरसेवक प्रवीण निकाळजे, मधुकर आठवले, अशपाक बळोरगी, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, महिला अध्यक्ष प्रमिला तूपलवंडे, आशा म्हेत्रे, वाहिद बिजापुरे, बसवराज म्हेत्रे, श्रीशैल रणधीरे, संतोष सोनवणे, जितू वाडेकर, तिरुपती परकीपंडला, केशव इंगळे, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे आदी सहभागी होते.

# राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आज जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त सोलापुरातील जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात उद्या मंगळवार, दि. २४ रोजी सकाळी १० वाजता ग्राहक संरक्षण कायद्याची ग्राहकांमध्ये जागृती व्हावी यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. याचे उद्घाटन आणि माहिती पत्राचे प्रकाशन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर आहेत. दरम्यान, या कार्यक्रमानिमित्त याच सभागृहात एका माहिती प्रदर्शनाचेही आयोजन केले असून, ते प्रदर्शन सायंकाळी ४ वाजेपर्यंत चालणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली. या कायद्याने सहा प्रकारचे हक्क ग्राहकाला मिळाले. यामध्ये सुरक्षेचा हक्क, माहितीचा हक्क निवड करण्याचा हक्क, म्हणणे मांडण्याचा हक्क, तक्रार करण्याचा हक्क : ग्राहक शिक्षणाचा हक्क आदी 'जागो ग्राहक जागो..'सारखे उपक्रम केले जातात.

जागो ग्राहक जागो

# सिंहगड इन्स्टिट्यूटच्या १८४ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**



नितीन राठोड



रिध्दी शेट्टी



वैभव त्रिमल

केगाव येथील एन.बी. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आपली ट्रेनिंग ॲड प्लेसमेंटची अखंड परंपरा अबाधित ठेवण्यात यश मिळवले आहे. शैक्षणिक वर्ष चालू असतानाच ट्रेनिंग व प्लेसमेंटमधून १८४ विद्यार्थ्यांची निवड झाली असल्याचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी सांगितले.

वर्षभरात अंतिम वर्ष पदवी विद्यार्थ्यांसाठी सतत विविध कंपन्यांचे कॅम्पस ट्रेनिंग ॲड प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले जाते. यामध्ये यूएमसी कंपनी, क्वालिटी किऑस्को , पायसिस्ट, कॅपजेमिनी, आयओटेक सोल्युशनस , कॉग्निझंट, आयवा प्रायव्हेट लिमिटेड अशा विविध कंपनीत चांगल्या सॅलरी पॅकेजवर प्लेसमेंटची संधी मिळाली आहे. तसेच क्युसपायडरस कंपनीत, किरण अकॅडमी, आयफोरसी, सिम्बायोसिस कन्सल्टन्सी या ठिकाणी विद्यार्थ्यांची ट्रेनिंग करता निवड झाली आहे. ट्रेनिंग व्यवस्थित पूर्ण केल्यानंतर त्यांना पुढे प्लेसमेंटची संधी मिळणार आहे. सरत्या शेवटी या डिसेंबर महिन्यात सोलापूरच्या एलएचपी मोटार्स कंपनीचा प्लेसमेंट ॲड ट्रेनिंग कॅम्पस ड्रायव्हचे आयोजन केले होते. त्यांचा निकाल येण्यास आणखी अवधी आहे. पुढील वर्षी जानेवारी २०२५ मध्ये सुद्धा अशा प्रकारे नामांकित कंपन्यांचे प्लेसमेंट ॲड ट्रेनिंग चे कॅम्पस ड्रायव्हचे आयोजन केले जाणार असल्याचे ट्रेनिंग ॲड प्लेसमेंट अधिकारी प्रा. विकास मराठे यांनी सांगितले.

मागील शैक्षणिक वर्षांत अंतिम वर्ष पदवी मध्ये शिकत असलेल्या १२२ विद्यार्थ्यांची याच दरम्यान प्लेसमेंटसाठी निवड झाली होती. यात बीएनवाय मेलॉन, टीसीएस, व्होडाफोन- आयडिया, अल्ट्राटेक सिमेंट, वालचंदनगर इंडस्ट्रीज, कल्याणी , भारत फोर्ज, भारत फोर्ज, एलएचपी (सोलापूर), टाटा भूषण, कायनेटिक इलेक्ट्रिक मोटार्स, गुबी कंस्ट्रक्शन, कोठारी ॲग्रिटेक प्रायव्हेट लिमिटेड, यूएम सी टेक लॅब्स- कन्सल्टन्सी, हिरा ॲटोमोशन (पुणे), दिशा कन्सलटन्सी, प्रिसिजन कॅम शॉप्ट (सोलापूर) अशा विविध कंपन्यांत विद्यार्थ्यांची निवड झाली होती. सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर. टी. व्यवहारे, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. विकास मराठे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वैरागच्या शिवाजीनगर परिसरात एकाच रात्रीत चोरीच्या चार घटना

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि २३ डिसेंबर-**

वैराग येथील शिवाजीनगर परिसरात एकाच रात्रीत चार ठिकाणी चोऱ्यांचे प्रकार घडले असून दोन ठिकाणाहून साडेआठ तोळे सोने चोरट्यांनी लंपास केले आहे. याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यामध्ये चोरी झालेल्या दोघांनी फिर्याद नोंदवली असून वारंवार वाढणाऱ्या चोऱ्यांमुळे पोलिसांसमोर आव्हान निर्माण झाले आहे.

शिवाजीनगर येथील संजय अरुण आतकरे हे आपल्या मूळ गावी वाळूज येथे जागरण गोंधळाच्या कार्यक्रमासाठी गेल्यानंतर तेथेच राहिले त्यामुळे त्यांच्या बंद घराचे कुलूप अज्ञात इसमानी तोडून घरातील लोखंडी कपाटामध्ये ठेवलेले साडेसहा तोळे सोने लंपास केले आहे. त्यांच्या शेजारी असणाऱ्या साहिल जयचंद्र साबळे यांच्या घरात देखील कोणीही नसल्याचे पाहून बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे एक लाख पाच हजार रुपयांची सोन्याची दागिणे चोरीस गेली आहेत. चोरट्यांनी एवढ्यावरच न थांबता माढा रोडवरील एक खताचे दुकान आणि फोटोशॉपच्या दुकानाचे शटर उचकटून हात साफ करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यातून काहीही चोरी गेली नसल्याचे कळते आहे. दरम्यान एकाच रात्री चार ठिकाणी चोऱ्या झाल्यामुळे वैराग मधील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे. या चोऱ्यांचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव हे करीत आहेत

CMYK

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २४ डिसेंबर २०२४ |

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com



# शेख हसीना यांना आमच्याकडे सोपवा

**बांगलादेश अंतरिम सरकारची मागणी**

◆ **ढाका, २३ डिसेंबर**

माजी पंतप्रधान शेख हसीना यांना आमच्याकडे सोपवा, अशी मागणी बांगलादेशच्या अंतरिम सरकारने सोमवारी भारताकडे केली आहे. या मागणीसाठी बांगलादेशने भारताला राजनयिक संदेश पाठवला.

शेख हसीना यांना सोपवण्याबाबत बांगलादेश सरकारने औपचारिकपणे भारत सरकारकडे मागणी केली आहे, असे बांगलादेशातील परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सल्लागार डॉ. तौहीद हुसैन यांनी सांगितले. बांगलादेश सरकारने भारत सरकारला 'नोट व्हर्बल' पाठवले आहे. यात देशातील न्यायालयीन प्रक्रियेचा सामना करण्यासाठी शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी करण्यात आली, असे हुसैन यांनी मंत्रालयात झालेल्या पत्रपरिषदेत सांगितले.

बांगलादेशात हिंसाचार उसळल्यानंतर शेख हसीना ५ ऑगस्ट रोजी भारताच्या आश्रयाला आल्या. ढाका येथील आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने हसीना आणि कित्येक माजी कॅबिनेट मंत्री, सल्लागार आणि सैन्य तसेच इतर अधिकाऱ्यांच्या विरोधात मानवतेच्या विरोधातील गुन्हे आणि हिंसाचारासाठी अटक वॉरंट जारी केले आहे.

आम्ही भारताला राजनयिक संदेश पाठवला आहे. न्यायालयीन प्रक्रिया पार पाडण्यासाठी शेख हसीना यांचे प्रत्यार्पण करावे, अशी मागणी यात केली आहे, असे विदेश प्रकरणांचे सल्लागार तौहीद हुसैन यांनी पत्रकारांना सांगितले. शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणासाठी परराष्ट्र मंत्रालयाने एक पत्र पाठवले असल्याचे यापूर्वी सकाळी गृह विभागाचे सल्लागार जहांगीर आलम यांनी सांगितले होते.

प्रत्यार्पणाबाबत आम्ही परराष्ट्र मंत्रालयाला पत्र पाठवले आहे. ही प्रक्रिया सुरू आहे. बांगलादेश आणि भारतात प्रत्यार्पणासाठी पूर्वीपासूनच करार आहे आणि या कराराच्या अंतर्गत शेख हसीना यांना बांगलादेशात आणले जाऊ शकते, असे आलम यांनी सांगितले. ◀*(वृत्तसंस्था)*

### हसीनांची युनूस सरकारवर टीका

» शेख हसीना यांनी अलिकडेच मोहम्मद युनूस सरकारच्या विरोधात टीका केली. देशविरोधी शक्तींनी बेकायदेशीररीत्या सत्ता बळकावल्याचा आरोप त्यांनी केला. फॅसिस्ट युनूस यांच्या नेतृत्वातील लोकशाहीविरोधी समूहाला लोकांप्रती कोणतीही जबाबदारी नाही. त्यांनी केवळ सत्ता बळकावली आहे आणि नागरिकांच्या कल्याणाची कामे बंद केली, असे शेख हसीना यांनी म्हटले होते. ■

# वडापावच्या किंमती वाढणार

### सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागणार

◆ **मुंबई, २३ डिसेंबर**

सर्वसामान्यांच्या सर्वांत आवडीचा पदार्थ असलेल्या वडापावमुळे खिशाला कात्री लावावी लागणार आहे. आता सामान्यांचा आवडता वडापाव महागणार आहे.

वडापावच्या किमती १ ते २ रुपयांनी महागण्याची शक्यता आहे. पावाचे दर वाढल्यास याचा परिणाम वडापावच्या किमतींवरही दिसू शकतो. तेल, बेसन, पाव महाग झाल्याने वडापाव महागण्याची शक्यता आहे. सर्वसामान्यांच्या मनाच्या जवळ असलेल्या वडापावलाही महागाईची झळ बसणार आहे.

२४ डिसेंबरपासून पावाचे दर वाढवण्याचा निर्णय बेकरी असोसिएशनने घेतला. त्याची झळ सर्वसामान्यांच्या वडापावलाही बसण्याची शक्यता आहे. तेल कांद्यापाठोपाठ पावही महागल्यास वडापाव १ ते २ रुपयांनी महाग होऊ शकतो अशी माहिती वडापाव विक्रेत्यांनी दिली आहे.

सध्या दुकानात साधारणपणे एक वडापाव १४ ते १५ रुपयांना मिळतो. याची किंमत आता आता २० रुपयांपर्यंत पोहोचू शकते. साधे वडापावविक्रेते एक वडापाव १२ रुपयांना विकतात. हा वडापाव १४ ते १५ रुपयांना मिळू शकतो. ◀*(वृत्तसंस्था)*



### का वाढताहेत किमती?

२०२३ पर्यंत पावासाठी लागणाऱ्या मैद्याच्या ५० किलोचे पोते १२०० ते १४०० रुपयांना मिळत होते. त्याचा दर आता १६०० रुपयांच्या घरात पोहोचला आहे. पावाच्या भट्टीसाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमतीदेखील वाढल्या आहेत. डिझेल दरवाढीचा परिणाम सर्वच स्तराला बसला आहे. यामुळे वाहतूक महागली आहे. आणि पर्यायाने सर्वच गोष्टी महागत चालल्या आहेत. या सर्वांमुळे पावाच्या उत्पादनापासून ते विक्रीपर्यंत खर्चात वाढ झालेली दिसून येत आहे. ■

# वायुदलाची क्षमता वाढीसाठी उच्चस्तरीय समिती

**नवी दिल्ली, २३ डिसेंबर**

चीन आणि पाकिस्तानची वाढती वायुशक्ती आणि भारतीय वायुदलातील विमानांच्या कमतरतेच्या पृष्ठभूमीवर वायुदलाची क्षमता वाढवण्यासाठी संरक्षण सचिव राजेशकुमार सिंह यांच्या नेतृत्वात एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. स्वदेशी संरचना, विकास आणि अधिग्रहण योजनांच्या माध्यमातून वायुदलाची क्षमता वाढवण्याचे उद्दिष्ट संरक्षण मंत्रालयाने ठेवले आहे. मागील महिन्यात दिल्लीत वायुदलाच्या कमांडर्सच्या संमेलनादरम्यान भारतीय वायुदलाने संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्यासमोर सादरीकरण केले होते. या परिषदेत संरक्षण मंत्रालयाच्या उच्च अधिकाऱ्यांना भविष्यातील लढाऊ विमानांच्या गरजा तसतेच आगामी काळात दोन्ही आघाड्यांवर निर्माण झालेल्या धोक्याचा सामना करण्यासाठी लष्कराच्या क्षमतेतील अंतर भरून काढण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले. या उच्चस्तरीय समितीत संरक्षण उत्पादन सचिव संजीवकुमार, संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात् डीआरडीओचे प्रमुख डॉ. समीर व्ही. कामत आणि वायुदलाचे उपप्रमुख एअर मार्शल टी. सिंग यांचा समावेश असेल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# ठाण्यात आरोपीने फेकली न्यायाधीशांवर चप्पल

**ठाणे, २३ डिसेंबर**

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील सत्र न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान खून प्रकरणातील आरोपीने न्यायाधीशांवर चप्पल फेकली. पोलिसांनी सोमवारी या घटनेची माहिती दिली. सुदैवाने आरोपीने भिरकावलेली चप्पल न्यायाधीशांना न लागता डेस्कसमोरील लाकडी चौकटीवर आदळली आणि बेंचवर पडली.

ही घटना शनिवारी दुपारी कल्याण न्यायालयात घडली. आरोपीविरुद्ध प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करण्यात आला.

महात्मा फुले पोलिस ठाण्यातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपी किरण संतोष भरम याला त्याच्याविरुद्धच्या खून खटल्याच्या सुनावणीसाठी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. जी. वाघमारे यांच्यासमोर हजर करण्यात आले होते.

अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपीने न्यायाधीशांना आपला खटला अन्य न्यायालयात वर्ग करण्याची विनंती केली. न्यायाधीशांनी आरोपीला त्याच्या वकिलामार्फत अर्ज करण्यास सांगितले.

यानंतर त्यांच्या वकिलाचे नाव पुकारले, मात्र ते हजर नव्हते. त्यामुळे न्यायालयाने आरोपीला बाजू मांडण्यासाठी अन्य वकिलाचे नाव देण्यास सांगितले व पुढची तारीख दिली. त्यावेळी आरोपीने खाली वाकून त्याची चप्पल काढून न्यायाधीशांच्या दिशेने फेकली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकरणी विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# अपघातात दोघांचा मृत्यु; कारचालकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ डिसेंबर-**

दि. १७ डिसेंबर रोजी पाथरी शिवारातील कुसळंब-येरमाळा रस्त्यावर भरधाव कारने मोटारसायकलला दिलेल्या धडकेत दोनजणांचा दुर्दैवी मृत्यू तर एकजण गंभीर जखमी झाला. या घटनेत हयगयीने वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कारचालकावर गुन्हा दाखल झाला आहे.

हनुमंतराव शेषेराव शिंदे (रा. सिरसदेवी, ता. गेवराई, जि. बीड) या कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातात सारीका चव्हाण (वय ३२) हिचा जागीच तर महामुनी काळे (रा. वालवड, ता. भूम, जि. धाराशिव) याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. रवी चंद्रवंशी (रा.नायगाव, ता. हवेली) गंभीर जखमी झाला आहे. नितीन सिध्दीकर चव्हाण (रा. गुंडेगाव, ता. जि. अहमदनगर) यांनी बार्शी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादीची पत्नी सारीका चव्हाण व मेहुणा महामुनी काळे हे मोटारसायकलने (एम. एच. १६/डी. एफ. १३२०) येरमाळ्याकडे जात असताना पाथरी गावाजवळ कार (एम. एच. २३/ए. डी. ७०९०) चालक हनुमंतराव शेषेराव शिंदे (रा. सिरसदेवी, ता. गेवराई, जि. बीड) याच्या वाहनाने रॉंग साईडवर येऊन जोरदार धडक दिली होती. या अपघातात मोटारसायकलवरील सारीका चव्हाण जागीच ठार झाली, तर महामुनी काळे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.



सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# ग्रामीण जनतेचा खर्च कशावर?

अन्न हा नेहमीच भारतीय समाज आणि अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. अवघ्या दशकभरापूर्वीपर्यंत देशातील दारिद्र्यरेषा माणसाला एका दिवसात किती कॅलरीजची गरज आहे आणि त्यासाठी किती खर्च करावा लागेल या आधारे ठरवली जात होती. यामुळेच जुन्या सर्वेक्षणातील खर्चाचे आकडे मुख्यतः अन्नावर केंद्रित होते. १९६० च्या दशकात, कुटुंबाच्या वार्षिक खर्चाच्या तीन चतुर्थांश खर्च फक्त अन्नावर होत असे. तथापि, लोकांकडे खर्च करण्यासाठी पैसा येऊ लागला. ते अन्नावर कमी आणि इतर गोष्टींवर जास्त खर्च करू लागले. हा बदल भारतातील शहरी भागात १९९० च्या अखेरीस दिसून आला. त्या काळात लोक अन्नापेक्षा इंधन, भाडे, शिक्षण, आरोग्य, प्रवास इत्यादींवर जास्त खर्च करू लागले होते; मात्र आता हा बदल ग्रामीण भारतातही पाहायला मिळत आहे. पहिल्यांदाच ग्रामीण भागात लोक जेवणाऐवजी इतर गोष्टींवर जास्त खर्च करू लागले आहेत. ताज्या आकडेवारीनुसार, भारतात अन्नावर होणारा खर्च आता ग्रामीण आणि शहरी लोकांच्या मासिक खर्चाच्या निम्म्याहून कमी आहे. गेल्या काही दशकांमध्ये हा वाटा झपाट्याने घसरला आहे. एका अहवालात भारतीय घरांच्या उपभोग खर्चाची तपशीलवार माहिती दिली आहे. हा अहवाल स्पष्ट करतो की, ही जगभरातील एक सामान्य प्रवृत्ती आहे. कारण लोकांचे उत्पन्न वाढते. ते शारीरिक श्रमापासून दूर जातात आणि त्यांचा अन्नावरील खर्च कमी होतो. याचा अर्थ असा की, लोक अधिक कमावू लागतात, तेव्हा ते अन्नावर कमी खर्च करतात. कारण त्यांच्याकडे इतर गोष्टींवर खर्च करण्यासाठी पैसे असतात.

उदाहरणादाखल अमेरिका आणि जर्मनीसारख्या विकसित देशांकडे पाहता येते. या देशांतील लोक त्यांच्या एकूण खर्चापैकी केवळ १५ टक्के अन्नावर खर्च करतात. याचे कारण म्हणजे तेथील लोक अधिक कमावतात आणि त्यांच्याकडे अन्नाशिवाय इतर अनेक गरजांसाठी पैसा असतो. सांख्यिकी मंत्रालयाने भारतीय कुटुंबांच्या घरगुती खर्चासंदर्भात एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार २०११-१२ च्या तुलनेत ग्रामीण भागातील मासिक खर्चातला खाण्यापिण्याचा खर्च ५३ टक्क्यांवरून ४६.४ टक्क्यांवर आला आहे. शहरी भागाबद्दल बोलायचे झाले तर या काळात अन्नधान्याचा वाटा ४२.६ टक्क्यांवरून ३९.२ टक्क्यांवर आला आहे. शहरी भागात अन्नाऐवजी अखाद्य पदार्थांचा वाटा ५७.४ टक्क्यांवरून ६०.८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. ग्रामीण भागात हा वाटा ४७ टक्क्यांवरून ५३.६ टक्क्यांवर पोहोचला आहे. लोक आता प्रवासावर जास्त खर्च करू लागले आहेत. शहरी भागात लोक दर महिन्याला वाहतुकीवर सरासरी ५५५ रुपये खर्च करतात तर ग्रामीण भारतात हा खर्च २८५ रुपये आहे. याशिवाय ग्रामीण भारत पान, तंबाखू आणि मादक पदार्थांवर जास्त खर्च करतो. २०२२-२३ मध्ये पान, तंबाखू आणि मादक पदार्थांवर दरडोई मासिक खर्च १४३ रुपये होता. १९९९-२००० मध्ये शहरी भागातील खर्चामध्ये वाहतूक खर्चाचा १०.६ टक्के हा वाटा २०२२-२३ मध्ये वाढून १४.१ टक्के झाला आहे. त्याच वेळी ग्रामीण भारतात हा वाटा आणखी वेगाने वाढला. मागील दोन दशकांमध्ये ग्रामीण भारतात सातत्याने वाढलेला खर्च टेलिव्हिजन, मोबाईल फोन, गृहोपयोगी उपकरणे इत्यादी उपभोग्य वस्तूंवर होत आहे. ग्रामीण भारत आता मनोरंजनावर पूर्वीपेक्षा दुप्पट खर्च करतो.

लोक अधिक कमावू लागले, त्यांच्याकडे अन्नाव्यतिरिक्त इतर गोष्टींवर खर्च करण्यासाठी पैसे येत आहेत. त्यामुळे अन्नावरील खर्चाचा वाटा कमी झाला आणि लोक भाडे, शिक्षण, आरोग्य, प्रवास, मनोरंजन इत्यादी जीवनावश्यक वस्तूंवर खर्च करू लागले. पूर्वी बहुतेक लोक हाताने काम करायचे (जसे की शेती, बांधकाम इ). त्यात शरीराला जास्त कॅलरीजची आवश्यकता असते. आता बहुतेक लोक ऑफिस किंवा मशीनवर काम करताना शारीरिक श्रम कमी करतात. त्यामुळे जास्त सकस अन्न खाऊन कॅलरी खर्च करण्याची गरज कमी झाली आहे. याचा परिणाम असा झाला की, अन्नावरील खर्च कमी झाला. लोक श्रीमंत होत गेले, तसतसा लोकांनी आपला आहार बदलला. तो फक्त भात किंवा रोटीपुरता मर्यादित राहिला नाही. आता त्यांनी फळे, भाज्या, दुग्धजन्य पदार्थ, मांस आणि इतर पौष्टिक पदार्थांवर खर्च करायला सुरुवात केली आहे. हे महाग असले, तरी लोकांनी त्यांचा आहारात समावेश करण्यास सुरुवात केली आहे. भारतातील सरकारी योजनांतर्गत गरीब कुटुंबांना स्वस्त धान्य (तांदूळ, गहू इत्यादी) मिळत आहे. त्यामुळे त्यांचा अन्नावरील खर्च कमी झाला आहे. परिणामी अन्नावरील एकूण खर्चही कमी झाला आहे. शहरी भागातील लोक पॅकेज्ड आणि प्रोसेस्ड फूडवर जास्त खर्च करू लागले आहेत. याशिवाय बाहेरच्या जेवणाची सवय वाढली आहे. या गोष्टी महाग असतात.

'नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिस' (एनएसएसओ) ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ग्रामीण भारतातील सरासरी दरडोई वापर खर्च (वस्तू आणि सेवांवर घरगुती खर्च-एमपीसीई) ३७७३ रुपये आहे. या खर्चाचा मोठा हिस्सा खाद्यपदार्थांवर जातो. २०२२-२३ च्या सर्वेक्षणानुसार, दरडोई उपभोग खर्चातील खर्च दोन प्रमुख भागांमध्ये विभागला आहे. तांदूळ, गहू, फळे, भाज्या, कपडे, शिक्षण, आरोग्य, भाडे, मनोरंजन, वाहतूक आदींचा त्यात समावेश होतो. सिक्कीममधील ग्रामीण भागात सरासरी 'एमपीसीई' ७,७३१ रुपये आहे आणि त्यातील एक मोठा भाग अन्नावर खर्च केला जातो. कारण सिक्कीममध्ये अन्न खर्चाचा वाटा जास्त आहे तर छत्तीसगडच्या ग्रामीण भागात, सरासरी एमपीसीई २४६६ रुपये आहे. हा खर्च इतर राज्यांपेक्षा कमी आहे. येथे अन्न खर्च तुलनेने जास्त असेल; कारण कमी उत्पन्नाच्या बाबतीत अन्नावरील खर्चाचा वाटा जास्त असतो. १९९९-२००० ते २०२२-२३ या काळात भारतातील ग्रामीण आणि शहरी भागात दरडोई उपभोग खर्चात (एमपीसीई) लक्षणीय वाढ झाली आहे. ग्रामीण भारतातील सरासरी 'एमपीसीई' १९९९-२००० मध्ये ४८६ रुपये होता. तो २००४-०५ मध्ये ५७९ रुपयांपर्यंत वाढला. २००९-१० मध्ये १०५४ रुपये तर २०११-१२ मध्ये १४३० रुपये आणि २०२२-२३ मध्ये ३७७३ वर पोहोचला. याचा अर्थ गेल्या काही वर्षांमध्ये ग्रामीण भागातील लोक अन्न आणि गैरखाद्य बाबींवर अधिक खर्च करू लागले आहेत.

शहरी भागातही उपभोगात वाढ दिसून आली आहे. शहरी भारताचा सरासरी 'एमपीसीई' १९९९-२००० मध्ये ८५५ रुपये होता. तो २००४-०५ मध्ये ११०५ रुपये, २००९-१० मध्ये १९८४ रुपये, २०११-१२ मध्ये २६३० रुपये तर २०२२-२३ मध्ये ६४५९ रुपये इतका वाढला. शहरी भागात ही वाढ ग्रामीण भागापेक्षा जास्त होती. हे दर्शवते की, शहरी लोक प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य आणि इतर सुविधांवर जास्त खर्च करीत आहेत. चांगल्या दर्जाच्या अन्नाचा अभाव असल्याने ग्रामीण भागात फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ आणि मांस, अंडी आणि कडधान्ये या प्रथिनयुक्त अन्नावरील खर्च कमी असू शकतो, कारण ते महाग आहेत. त्यांच्या कमतरतेमुळे पौष्टिकतेची कमतरता होऊ शकते; जी विशेषतः लहान मुले आणि वृद्धांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. यामुळे वाढत्या वयाबरोबर मानसिक आणि शारीरिक विकासात अडथळा येतो. पौष्टिक आहार न घेतल्यास त्यांच्यामध्ये मधुमेह, हृदयरोग, उच्च रक्तदाब आणि पचनसंस्थेचे आजार यासारख्या दीर्घकालीन आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. अशा रोगांच्या उपचारावरील खर्च वाढू शकतो आणि गरीब कुटुंबांसाठी तो अतिरिक्त भार बनू शकतो. विशेषतः मुलांमध्ये पोषणाच्या अभावामुळे शारीरिक आणि मानसिक विकासाला विलंब होतो. कमकुवत रोगप्रतिकारक शक्तीमुळे ते सहज आजारी पडू शकतात. शिवाय मुलांच्या शिक्षणात आणि ज्ञान संपादनातही घट होऊ शकते. त्यांच्या मानसिक विकासात पौष्टिक आहार महत्त्वाची भूमिका बजावत असतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# श्रीलंका आणि भारतविरोधी कारवाया

श्रीलंकेच्या संसदेत २२५ सदस्य असतात. यापैकी १९६ सदस्य जिल्हा मतदारसंघातून निवडले जातात. प्रत्येक मतदारसंघातून एकापेक्षा जास्त सदस्य (समजा ५) निवडायचे असतात. अशा मतदारसंघांना बहुसदस्यीय मतदारसंघ (मल्टिसीट कॉन्स्टिट्युएन्सी) असे नाव आहे. प्रत्येक पक्षाला (समजा तीन पक्ष आहेत) एकूण मतदानापैकी (समजा १००) प्रत्येक पक्षाला जेवढी मते मिळतील त्या मतांच्या प्रमाणात त्या पक्षाला जागांचे वाटप केले जाते. समजा अ पक्षाला ५० टक्के, ब पक्षाला ३० टक्के आणि क पक्षाला २० टक्के मते मिळाली आणि एकूण जागा १० आहेत तर जागा अनुक्रमे ५, ३, २ अशाप्रकारे अ, ब व क पक्षांना मिळतील. अशीच वाटणी सर्व मतदारसंघांच्या बाबतीत होईल. आता उरल्या २९ जागा. यांची वाटणी करण्यासाठी संपूर्ण देशभरात मिळून कोणत्या पक्षाला किती टक्के मते मिळाली हे पाहून त्या टक्केवारीच्या प्रमाणात २९ जागांचे वाटप करण्यात येईल.

या पद्धतीनुसार हिशेब होऊन निरनिराळ्या पक्षांना मिळालेल्या जागा अशा आहेत.

अ) जनता विमुक्ती पेरामुनाप्रणीत नॅशनल पीपल्स पॉवर आघाडीला एकूण ६२ टक्के म्हणजेच ६८ लाख मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून १४१ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून १८ अशा १५९ जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत १५६ जागा जास्त मिळाल्या.

ब) विरोधी पक्ष असलेल्या समागी जन बलावेगया या पक्षाला एकूण १८ टक्के मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून ३५ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून ५ अशा ४० जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत १४ जागा कमी मिळाल्या.

क) इलन्काई तमिळ अरासू कात्ची या सर्वांत मोठ्या तमिळ पक्षाला एकूण २.३ टक्के मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून ७ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून १ अशा ८ जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत ८ जागा जास्त मिळाल्या.

ड) मावळते अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांच्या न्यू डेमोक्रॅटिक फ्रंटला एकूण ४.५ टक्के मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून ३ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून २ अशा ५ जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत ५ जागा जास्त मिळाल्या.

इ) आणि माजी अध्यक्ष महिंदा राजपक्षे यांच्या श्रीलंका पाडुजन पेरामुना पक्षाला एकूण ३.१ टक्के मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून २ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून १ अशा ३ जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत ९७ जागा कमी मिळाल्या. उरलेल्या जागा डझनावारी पक्ष आणि अपक्षात वाटल्या गेल्या आहेत.

या निवडणुकीच्या अगोदर श्रीलंकेत अध्यक्षपदाची निवडणूक पार पडली होती. त्या निवडणुकीत स्वतंत्र उमेदवार, विद्यमान अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, समागी जन बलवेगया पक्षाचे उमेदवार आणि विरोधी पक्षनेते साजित प्रेमदासा आणि डावीकडे झुकलेल्या सिंहली वर्चस्ववादी एनपीपीचे चीनसमर्थक मार्क्सवादी उमेदवार अनुरा कुमारा दिसानायके यांच्यात लढत झाली. कुणाही एका उमेदवाराला मतदानाच्या पहिल्या फेरीत ५० टक्क्यांचा जादुई आकडा गाठता आलेला नव्हता. पहिल्या फेरीत अनुरा कुमारा दिसानायके (ऊर्फ एकेडी) वय वर्ष ५५ यांना ४२.३६ टक्के म्हणजेच सुमारे ५६ लाख, साजित प्रेमदासा यांना ३२.७२ टक्के म्हणजेच सुमारे ४३ लाख, तर रानिल विक्रमसिंघे यांना १७.२५ टक्के म्हणजेच सुमारे २३ लाख मते मिळाली व ते तिसरे ठरल्यामुळे बाद झाले. पुढे दिसानायके आणि साजित प्रेमदासा यातच पुढचा पसंतिक्रम वाटला गेला आणि दिसानायके विजयी झाले. अख्खा युरोप आज उजवीकडे वळू पाहात असताना श्रीलंकेने स्वीकारलेला हा उरफाटा वाम मार्ग आश्चर्य वाटावा असा आहे.

नुकत्याच अध्यक्षपदी निवडून आलेल्या अनुरा कुमारा दिसानायके यांनी अध्यक्षीय निवडणुकीपाठोपाठ आता पार्लमेंटच्या निवडणुकीतही नेत्रदीपक यश मिळवून दाखविले आहे. अशाप्रकारे देशाच्या राजकारणावर त्यांनी आपली पकड चांगलीच पक्की केली आहे. दिसानायके हे मूळचे मार्क्सवादी विचारांचे कट्टर पुरस्कर्ते राहिलेले आहेत. एकेकाळी त्यांचा जनता विमुक्ती पेरामुना (जेव्हीपी) हा पक्ष सुद्धा सिंहली वर्चस्ववादी राजकारण करीत असे. पण श्रीलंकेत भडकलेला भयंकर वांशिक हिंसाचार काहीही साध्य करू शकला नाही याची त्यांना जाणीव झाली. अनेक सिंहली नेत्यांनाही असाच साक्षात्कार झाला. दिसानायके त्यांच्या पक्षाने तर शांततेच्या मार्गाने व लोकशाही पद्धतीने कार्य करण्याची घोषणा करून ती अमलात आणली.

दिसानायके यांनी स्थापन केलेल्या आघाडीला २०२४ च्या निवडणुकीत १५९ जागा मिळाल्या. याचा अर्थ असा होतो की तमिळ भाषक मतदारांनीही या आघाडीला समर्थन दिले आहे. डाव्या विचारसरणीच्या एनपीपीने श्रीलंकेतील उत्तरेकडे असलेल्या जाफना जिल्ह्यात विजय मिळवून इतिहास घडवला आहे. कारण जाफना भागात तमिळांची संख्या जास्त आहे. दिसानायके यांचा पक्ष देशाच्या दक्षिणेकडील भागातील एक प्रमुख सिंहली पक्ष आहे. दक्षिणेकडील सिंहली पक्षाने उत्तरेतील तमिळबहुल भागात असे यश प्रथमच प्राप्त केले आहे. या पक्षाला एकेकाळी आक्रमक सिंहली-बौद्ध राष्ट्रवादी मानले जायचे. पण श्रीलंकेतील भाषावाद कमी होतो आहे. आता सिंहली आणि तमिळ यातील दुरावा कमी होत गेला आणि सर्वसमावेशकतेच्या धोरणाचा अवलंब झाला तर ती फार मोठी सकारात्मक बाब ठरेल. श्रीलंकेच्या नवीन पार्लमेंटमध्ये निर्माण झालेले पक्षांचे बल बघितले की, श्रीलंका डावीकडे वळू पाहते आहे, हे स्पष्ट होते. याला भारताचा आक्षेप असण्याचे कारण नाही. फक्त नवीन राजवट चीनच्या इशाऱ्यावर नाचणारी असू नये, अशी मात्र भारताची अपेक्षा आहे.

वर्षभरापूर्वी दिसानायके यांनी भारताला भेट दिली होती. त्यावेळी श्रीलंकेत निवडणुका व्हायच्याच होत्या. या दोन देशांत मैत्रीचे संबंध असावेत यावर त्यांनी तेव्हा भर दिला होता. त्यांचा हा मुद्दा शंभर टक्के बरोबर होता आणि आहे. पण त्यासाठी श्रीलंकेलाच आपले चीनच्या तालावरचे नाचणे थांबवावे लागेल. श्रीलंका भारताचा शेजारी देश आहे. त्याचा उपयोग भारतविरोधी कारवायासाठी होऊ नये हे तेव्हा त्यांना मान्य होते. आता सत्तेवर आल्यावरही आपली प्रत्यक्षात हीच भूमिका असेल, असे आश्वासन त्यांनी नुकतेच पुन्हा एकदा दिले आहे.

९४२२८०४४३०

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# संगणक युगात क्वांटम घडविणार क्रांती

जशी जशी प्रगतीची दारे उघडत गेली, त्याच प्रमाणामध्ये मानवाच्या गरजाही वाढत गेल्या. त्यानंतर संगणकाच्या दुनियेत सुपर संगणकाने प्रवेश केला अन् पुन्हा एक नवीन क्रांतीचे युग सुरू झाले. त्यानंतर या संगणकाच्याही काही मर्यादा असल्याने त्याही पलीकडे जाऊन काही वेगळा शोध लावण्याची जगामधील शास्त्रज्ञांची होड लागली. या शोधामध्ये गुगलच्या हाती एक अफाट शक्ती लागली असून, त्यामुळे जग पुन्हा एकदा संगणकाच्या घडणाऱ्या क्रांतीसाठी सज्ज झाले आहे. गुगलने क्वांटम कॉम्प्युटिंगसाठी विलो नावाची चिप तयार केली आहे.

आजमितीस जगामध्ये अस्तित्वात असलेल्या सर्वाधिक सुपरफास्ट संगणकाला जे गणित सोडवायला करोडो वर्ष लागतील तेच गणित हे चिप काही क्षणांत सोडवेल असा दावा गुगलने केला आहे. क्वांटम कॉम्प्युटिंगच्या क्षेत्रामधील हा एक प्रचंड मोठा शोध असून, तयार करण्यात आलेल्या सर्वाधिक चांगला प्रोसेसर मानला जात आहे. क्वांटम कॉम्प्युटिंग म्हणजे भौतिकशास्त्रामधील मूलभूत कणाच्या तत्त्वांचा वापर करून एक शक्तिशाली संगणक तयार करण्याचा प्रयत्न होय. हा संगणक एवढा शक्तिशाली असेल की, तो मानवाच्याही कल्पनेबाहेर असणार आहे. मागील दहा वर्षांपासून गुगलची एक चमू यावर संशोधन करीत आहे. तब्बल दहा वर्षांनंतर सुपर संगणकावर मात करणारे नवीन तंत्रज्ञान गुगलच्या हाती लागले आहे. सध्या जगामध्ये जे सर्व संगणक प्रचलित आहे, ते सर्व बायनरी कोडवर आधारित आहेत. त्यामध्ये फक्त ० आणि १ चा वापर केला जातो. त्यांना बिट्स म्हटले जाते. परंतु, गुगलच्या विलो चिपमध्ये क्युबिट्सचा वापर केला गेला आहे. त्यामध्ये क्वांटम मेकॅनिक्समधील तत्त्वांचा वापर करून ० आणि १ यांचा एकाचवेळी अथवा वेगवेगळा वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे सध्या अस्तित्वामध्ये असलेल्या सुपर संगणकाला सुद्धा शक्य नसलेल्या गोष्टी अवघ्या काही मिनिटामध्ये करण्याची किमया हे सगणक करू शकते, असा गुगलचा दावा आहे. क्वांटम कॉम्प्युटिंगचे वैशिष्ट्य असलेल्या सुपर पोझिशनमध्ये क्युबिट्स आपल्या दोन आधारभूत अवस्थांच्या लिनियर कॉम्बिनेशनमध्ये अस्वित्वात राहू शकतात. क्वांटम संगणक तयार करणे ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नक्कीच नाही. या संगणकाचा आकार एखाद्या ऑक्टोपससारखा विचित्र असून, हा संगणक उणे २५८.१५ एवढ्या थंड तापमानावर ठेवावा लागतो. अंतराळामध्ये असणाऱ्या तापमानापेक्षाही हे तापमान कमी आहे. या संगणकामध्ये क्युबिट्सचा वापर केला जात असल्यामुळे कमी क्युबिट्समध्ये भरपूर माहिती साठविली जाऊ शकते. तसेच ती अधिक वेगानेही प्रोसेस केली जाऊ शकते. हे क्युबिट्स ट्रॅप्ड आयन्स, फोटॉक्स किंवा अणूच्या अर्ध कणांपासून बनलेले असू शकतात.

क्वांटम संगणकामध्ये याच सूक्ष्म कणांचा वापर केला जातो. हे क्युबिट्स अतिशय वेगवान असले तरी ते फार संवेदनशील आहेत. त्यामुळे या संगणकामध्ये अल्गोरिदम चालविताना चुका होण्याचे प्रमाण सर्वाधिक होते. संशोधनातला हा सर्वाधिक मोठा अडथळा असला तरी विलो चिप विकसित करताना प्रोसेसिंगचा वेग वाढवून चुकांचे प्रमाण कमी केल्याचे गुगलने म्हटले आहे. क्वांटम संगणकामध्ये जेवढे क्युबिट्स जास्त तेवढे चुकांचे प्रमाण कमी असल्याचेही गुगलने जाहीर केले आहे. क्वांटम संगणकामुळे अतिशय गुंतागुंतीच्या व क्लिष्ट गोष्टी समजून घेता येतील. भौतिकशास्त्रामधील जी गुंतागुंतीची समीकरणे सोडविण्यासाठी आजपर्यंत जगात साधनेच उपलब्ध नव्हती, ती चुटकीसरशी सोडविता येतील. या संगणकामुळे नवीन औषध शोधण्यासाठीच्या संशोधनालाही वेग येऊ शकतो. इलेक्ट्रिक कारच्या चांगल्या बॅटरीपासून तर न्यूक्लिअर रिॲक्टरपर्यंत सर्व आव्हानांसाठी त्याची मदत होण्याचा अंदाज गुगलचे अभियांत्रिकी विभागाचे उपाध्यक्ष हार्टमट नेव्हन यांनी म्हटले आहे. रॅण्डम सर्किट सॅम्पलिंग नावाची प्रक्रिया करून विलो चिपचा वेग आणि अचूकता सुपर संगणकाच्या तुलनेत तपासून पाहण्यात आली आहे. जगामधील अडचणी सोडविण्याची क्षमता क्वांटम संगणकामध्ये येण्यासाठी कदाचित अजून बरीच वर्षे लागू शकतात. या क्वांटम संगणकाचा वापर चुकीच्या गोष्टीसाठी होण्याची भीतीही शास्त्रज्ञांनी वर्तविली आहे. आपला डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी आर. एस. ए. एनक्रीप्शन केले जाते. सुपर संगणक किंवा साध्या संगणकाला हे एनक्रीप्शन भेदता येत नाही. परंतु, एनक्रीप्शन भेदण्यासाठी या क्वांटम संगणकाचा वापर केला जाऊ शकतो, अशी भीतीही तज्ज्ञांना वाटत आहे.

९८८१७१७८५६

## प्रासंगिक

श्यामकांत पात्रीकर

# दिरंगाईने ग्राहक न्याय वंचित!

२४ डिसेंबर १९८६ रोजी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी व राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांनी ग्राहक संरक्षण कायद्यावर स्वाक्षरी केली. त्यामुळे दरवर्षी भारतात २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करतात. त्यानंतर संसदेने पारित केलेल्या क्रांतिकारी ग्राहक संरक्षण कायद्याला मंजुरी दिली आणि भारतीय ग्राहक चळवळीत नवचैतन्याची लाट आली.

**ग्राहक कायद्याची गरज :** १९७२ च्या दुष्काळानंतर भारतातील सर्वसामान्य माणसाची परिस्थिती बिकट होती. भाववाढ, अन्नधान्याची टंचाई, भेसळ याद्वारे ग्राहकाची लूट सुरू होती. १९७८ च्या निवडणुकीत ग्राहकांनी त्यांचे मागणीपत्रकच जाहीर केले. त्यात ग्राहकांसाठी स्वतंत्र न्यायालये, ग्राहक संरक्षण कायदा आणि स्वतंत्र ग्राहक कल्याण मंत्रालयाची मागणी करण्यात आली होती. अनेक न्यायमूर्ती आणि कायदेतज्ज्ञांशी विचारविनिमय करून एक मसुदा तयार करण्यात आला. केंद्र सरकारने हा मसुदा कायद्यात रूपांतरित करावा, ही आग्रही मागणी ग्राहक संघटनांनी केली. शेवटी २४ डिसेंबर १९८६ रोजी हा मसुदा 'ग्राहक संरक्षण विधेयक' म्हणून राष्ट्रपतींच्या सहीने मंजूर झाला. तत्पूर्वी, एप्रिल १९८५ मध्ये युनायटेड नेशन्सने ग्राहक संरक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली होती. त्यात संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांना ग्राहक कायदा करण्याची सूचना केली गेली होती. ग्राहकांच्या शोषणमुक्तीसाठी कुठल्याही राजकीय पक्षाचा आधार न घेता, कोणताही बंद, उपोषण, धरणे, तोडफोड न होता संसदेत पारित झालेला हा एकमेव कायदा होय. त्यामुळे तो ग्राहक कायदा चळवळीतील एक मैलाचा दगड ठरलाय! ३१ कलमे असलेल्या या ग्राहक संरक्षण कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट होते, बाजारात ग्राहकांची होणारी फसवणूक, शोषण यापासून सर्वसामान्य ग्राहकांचे संरक्षण करायचे. तसेच ग्राहकांच्या सहा हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हेही या कायद्याचे उद्दिष्ट होते. या उद्दिष्टपूर्तीसाठी या कायद्यात एकीकडे जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ग्राहक संरक्षण परिषदांची तरतूद केली, तर दुसरीकडे याच तीन स्तरांवर ग्राहकांच्या तक्रार निवारणासाठी ग्राहक आयोगांची (ग्राहक न्यायालयांची) निर्मिती केली गेली. निवारणाची यंत्रणा ही सोपी, सुटसुटीत आणि जलद असेल, असेही उद्दिष्ट ठरवून तक्रार निवारण हे सर्वसाधारणपणे तीन ते पाच महिन्यांत होईल, असेही निश्चित करण्यात आले. प्रचलित न्याय प्रक्रियेत जसा कायद्याचा कीस काढला जातो, तो न काढता सरळ, सोप्या, सुलभ पद्धतीने तक्रार निवारण व्हावे, यासाठी न्यायिक अधिकाऱ्याशिवाय समाजातील दोन प्रतिष्ठित व्यक्तींची ग्राहक आयोगांवर नेमणूक करण्याचीही तरतूद करण्यात आली. दिवाणी आचारसंहिता आणि भारतीय एव्हिडन्स ॲक्ट या तक्रार निवारणाला लागू असणार नाही, असेही या कायद्यात स्पष्ट करण्यात आले. इतकेच काय, तर या आयोगासमोर बाधित ग्राहक वकील न देता स्वतः किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत बाजू मांडण्याची



तरतूदही करण्यात आली. थोडक्यात, ग्राहकांच्या हातात अल्लादिनचा दिवा दिला गेला. साहजिकच सर्वच ग्राहक संघटनांनी या ग्राहक संरक्षण कायद्याचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. साधारणपणे १९८८ च्या सुमारास सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे देशात हळूहळू सर्वत्र ग्राहक न्यायालये कार्यरत झालीत. त्यानंतरची पाच, दहा वर्षे हा ग्राहक चळवळीचा सुवर्णकाळ ठरला. ग्राहकांच्या अनेक तक्रारींचे जलद आणि सोप्या पद्धतीने निवारण होताना दिसू लागले. दुसरीकडे अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर ग्राहक हितैषी निर्णय येऊ लागले. या सर्वांचा परिणाम म्हणजे 'ग्राहक' म्हणून एक चेहरा आपल्याला मिळाला. बाजारातील 'गिऱ्हाईकाचा ग्राहक' झाला. रेल्वे, महानगर टेलिफोन निगम, गृहनिर्माण संस्था असो वा विमा कंपन्या अथवा वीज कंपनी असो, या सर्व कंपन्या ग्राहक संरक्षण कायद्यात अंतर्भूत असून, त्यांच्या सेवांमध्ये त्रुटी अथवा निष्काळजीपणा आढळल्यास ग्राहकाला त्यांच्याविरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्यात दाद मागता येईल, असा स्पष्ट निर्वाळा या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने दिला. इतकेच नव्हे, तर जिथे एखाद्या सार्वजनिक अथवा सरकारी कंपनीला, ग्राहकाला कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे नुकसान भरपाई देण्याचे आदेश झाले, तर ती नुकसानभरपाई संबंधित कर्मचारी/अधिकाऱ्याकडून वसूल करण्यात यावी, असेही स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने या ऐतिहासिक निर्णयात दिलेले आहेत. ग्राहक चळवळीच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा असा पथदर्शी निर्णय म्हणायला हवा. या निर्णयाची दखल सर्व सरकारी आस्थापना आणि सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना घ्यावीच लागली आणि त्यांनी त्यांच्या ग्राहकविषयक धोरणात आमूलाग्र बदल करून ग्राहक सेवा ग्राहकाभिमुख करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली. ग्राहक संरक्षण कायद्याचे हे फार मोठे यश मानले जाते. वैद्यकीय सेवा या ग्राहक संरक्षण कायद्यात अंतर्भूत आहेत की, नाही, याबाबतही मोठा कायदेशीर विवाद उभा राहिला होता. यावर आपण वैद्यकीय सेवा ग्राहक कायद्यात अंतर्भूत आहेत, अशी सुस्पष्ट भूमिका घेऊन मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीमच राबवली. यथावकाश सर्वोच्च न्यायालयाने 'इंडियन मेडिकल असोसिएशन विरुद्ध व्ही. पी. शांता' या केसमध्ये आपल्याच भूमिकेवर शिक्कामोर्तब केले आणि वैद्यकीय सेवा आणि डॉक्टर्स हे ग्राहक संरक्षण कायद्यात अंतर्भूत आहेत, असे स्पष्ट केले. इतकेच नव्हे, तर सरकारी अथवा पालिकेच्या कोणत्याही इस्पितळात एखाद्या रुग्णाने मोफत सेवा घेतली असेल, तरीही त्या इस्पितळात एखादा पेइंग वार्ड असेल, तर मोफत सेवा घेणाऱ्या रुग्णाला लाभार्थी ग्राहक म्हणून ग्राहक संरक्षण कायद्याअंतर्गत अशा इस्पितळाविरुद्ध त्याला मागता येऊ शकेल, असा क्रांतिकारी आदेशही सर्वोच्च न्यायालयाने या निमित्ताने दिला. नुकत्याच एका निर्णयाद्वारे सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायमूर्तींच्या न्यायासनाने या निर्णयाचा पुनरुच्चार केलेला आहे. दरम्यानच्या काळात बाजारपेठांमध्ये अनेक बदल होत गेले. तंत्रज्ञानात क्रांतिकारी बदल झाले. ई-कॉमर्स आणि ऑनलाईन खरेदी, ऑनलाईन पेमेंट्स हे परवलीचे शब्द बनू लागले. त्यामुळे साहजिकच ग्राहकांना नव्या संधी उपलब्ध होत गेल्या. त्याचबरोबर ग्राहकांपुढे नवनवीन आव्हानेही उभी राहिली. सोयी जशा वाढल्या तशाच गैरसोयी आणि धोकेही वाढले.

आणि त्यामुळेच हा सर्व विचार करून संसदेने २०१९ मध्ये अधिक व्यापक असा नवा ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ पारित केला आणि जून २०२० पासून तो प्रत्यक्षात ३१ कलमांचा जुना ग्राहक संरक्षण कायदा जाऊन १०७ कलमांचा नवा ग्राहक संरक्षण कायदा अंमलात आला.

ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ आणि २०१९ मुळे ग्राहकांना त्यांचे अधिकार निश्चितच मिळाले. त्यामुळे ग्राहक जागृतीही बऱ्यापैकी झाली, असे म्हणायला हरकत नाही. पण प्रत्यक्षात जेव्हा ग्राहकांवर अन्याय होतो, त्याची फसवणूक होते, तेव्हा ग्राहक न्यायालय या ग्राहकाला खरोखरच अल्पावधीत सोप्या, सुटसुटीत पद्धतीने न्याय देऊ शकतो का, याचे उत्तर आजही नकारार्थी सापडते.

**प्रशासकीय औदासीन्य :** ग्राहक संरक्षण कायदा झाला परंतु त्याची अंमलबजावणी मात्र जवळपास दुर्लक्षित असल्याने ग्राहक आयोगांवर कोणाचाच वचक नसल्याचे लक्षात आले आहे. प्रकरणे प्रलंबित असून, ग्राहक संरक्षण कायद्याच्या उद्दिष्टालाच छेद गेला आहे. राष्ट्रीय ग्राहक दिन सर्वत्र मोठ्या प्रमाणात साजरा होणे आवश्यक असताना प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

९८८१७१७८४६

### वाचनालयातील पुस्तकांना वाचकांची प्रतीक्षा

वाचन हे मानवी मनाचे टॉनिक आहे. एकदा वाचनाची आवड निर्माण झाली की ती आवड व्यक्तीला आपोआप पुस्तकांकडे घेऊन जाते. एक चांगले पुस्तक हातात आले की ते पुस्तक पूर्ण वाचून झाल्याशिवाय चैन पडत नाही. एकानंतर एक चांगली व दर्जेदार पुस्तके वाचली की व्यक्तीची वैचारिक पातळी वाढते. पुस्तके वाचनाचा छंद जीवनाला कलाटणी देतो. मोबाईलच्या चक्रव्यूहात अडकून जीवनाचा सत्यानाश



करण्यापेक्षा आजच्या तरुणांनी वाचनाचा छंद जोपासला पाहिजे. ग्रंथालयातील पुस्तके आजच्या तरुणांची आतुरतेने वाट पाहत आहेत. सुदैवाने मला माझ्या कॉलेज जीवनात पुस्तके वाचनाचा छंद जडला होता. माझ्या वाचन छंदाचे बीज शालेय जीवनात पेरण्यात आले होते. स्वांतत्र्यसैनिक कालिदासराव देशपांडे आणि विज्ञानाचे शिक्षक गणेशराव गुळवे गुरुजी यांनी मला अवांतर वाचनाचे महत्त्व पटवून दिले होते.

रामजी सुभेदार यांनी आर्थिक परिस्थिती बिकट असूनही पुस्तके विकत घेऊन ती पुस्तके डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाचायला दिली आणि जगातील अन्य भाषांतील अनेक ग्रंथ वाचून बाबासाहेब जागतिक कीर्तीचे ज्ञानी बनले. त्यांनी पुस्तकांसाठी घर बांधले. हे वाचकांसाठी खरोखर प्रेरणादायी आहे. आजच्या काळात गावोगावी ग्रंथालये आहेत. त्यातील कपाटांमध्ये खूप पुस्तके आहेत. पण पुस्तके वाचणारे वाचक संख्येने फार कमी आहेत. ती पुस्तके वाचकांची आतुरतेने वाट पाहत आहेत. म्हणून आजच्या तरुणांनी पुस्तके वाचनाचा छंद जोपासला पाहिजे, वाचन चळवळ टिकवून ठेवण्यासाठी पुस्तके वाचली पाहिजेत.

**बबन गुळवे**/९५४५४४२६४८

## वाचक पत्रे

### देवाने दिलेले आधार कार्ड अपडेट करा

आम्ही भारतातील जे जीवन जगत आहोत ते भारत सरकारने आणि देवाने आपल्याला दिले त्या आधार कार्डवर! आपल्याजवळ आधार कार्ड नसेल तर, आपण असून नसल्यासारखे आहोत. आणि देवाने जर आपल्याला विविध प्रकारे आधार दिला नसता, त्याचे अदृश्य कार्ड आपल्याकडे नसते तर आपले काय झाले असते, काही सांगता येत नाही.

आपली नाममात्र ओळख भारत सरकारचे आधार कार्ड करून देते परंतु खरी ओळख नाही करून देत. आपले खरे कर्म त्यात दिसून येत नाही. परंतु देवाकडे जे आपले आधारकार्ड असते, त्यात आपले चांगले वाईट कर्म लिहिले असतात. त्यामुळे आपली ओळख त्या देवाला माहीत असते. दर दहा वर्षांनी आपले आधार कार्ड सरकार अपडेट करावयास सांगते. आपले नाव किंवा इतर काही बदल झाला असेल तर किंवा चेहरा किंवा बोटाचे ठसे बदलले असेल तर आधार कार्डचे नवीनीकरण करणे आवश्यक असते. ते केले नाही तर आपली बँक किंवा इतर सरकारी कामे होत नाहीत. आपली सर्व आर्थिक आणि सरकारी या आधार कार्डशी जोडली असतात. आधार कार्ड भारताचे जरी असले तरी काही मोठे लोक भारताविरुद्ध बोलतात तेव्हा त्याचे नवल वाटते. कारण आपले कर्म या आधार कार्डशी जोडलेले नसतात. परंतु देवाने आपले आधार कार्ड तयार केले असते, त्या कार्डाशी आपले चांगले वाईट कर्म जोडले असतात आणि त्यानुसार आपल्याला चांगली किंवा वाईट फळे प्राप्त होत असताते. हे देवाचे कार्ड आपल्याला रोज अपडेट करावे लागते. सुखी, शांत आणि पवित्र जीवन जगण्यासाठी आपले भारत सरकारचे आधार कार्ड राष्ट्रभक्तीशी आणि देवाचे आधार कार्ड ईश्वरभक्तीशी पूर्णपणे जोडले जाणे गरजेचे आहे. त्याशिवाय आपले आणि आपल्या भावी पिढीचे जीवन कधीच पूर्णपणे समृद्ध होऊ शकणार नाही एवढे मात्र निश्चित.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

### मंत्रिपदाचा कालावधी अडीच वर्षे नको

१५ डिसेंबरला महाराष्ट्र राज्याच्या महायुतीच्या २३४ विजयी आमदारांपैकी ३९ आमदारांचा मंत्री म्हणून शपथविधी नागपुरात संपन्न झाला. या ३९ मंत्र्यांमध्ये भाजपा १९, शिवसेना ११ व राष्ट्रवादी काँग्रेसचे ९ मंत्री झाले आहेत. ज्या आमदारांना मंत्रिपद मिळाले नाही, त्यांना पण मंत्रिपदाचा लाभ मिळण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी मिळालेले मंत्रिपद अडीच वर्षे करण्यात येईल असे सुचविले आहे. या सूत्राने पण निवडून आलेल्या सर्व आमदारांना मंत्रिपदाची संधी मिळणार नाही. ५ वर्षे करावयाची कामे अडीच वर्षांत पूर्ण न झाल्यास आधीच्या मंत्र्यांची जबाबदारी राहणार नाही. त्यामुळे हा अडीच अडीच वर्षे मंत्रिपद देण्याचा विचार न करता इतर आमदारांना महामंडळांचे संचालक अथवा तत्सम पदे देण्यात यावी असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### श्री सिद्धेश्वर हायस्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**

श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा झाला. यावर्षीच्या स्नेहसंमेलनाचा पर्यावरण हा मुख्य विषय होता. वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष पद श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्षस्थानी धर्मराज काडादी, शिक्षण संकुलाचे विश्वस्त डॉ. राजशेखर येळीकर हे होते तसेच प्रमुख अतिथीपदी पोलीस उपायुक्त दिपाली काळे, माजी मुख्याध्यापिकाअंजली तिवारी यांनी भूषविले तसेच अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक योगेश राऊत, पर्यवेक्षिका नीता तमशेट्टी, ज्येष्ठ शिक्षिका रेणुका अरोरा पालक शिक्षक संघाच्या प्रमुख धनश्री काटकर सिद्धेश्वर इंग्लिश मीडियमच्या सांस्कृतिक विभागप्रमुख विजया बिराजदार विद्यार्थी प्रतिनिधी आयुष जाधव व अक्षरा पाटणकर उपस्थित होते. सूत्रसंचालन दहावीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सादर केले. आदर्श विद्यार्थिनी म्हणून समृद्धी कोळेकर व आदर्श विद्यार्थी म्हणून सुरज अंबूरे यांची निवड करण्यात आली. पुरस्कार प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरणही याप्रसंगी करण्यात आले. सांस्कृतिक विभाग सदस्य विजयालक्ष्मी सुरपुरे, श्रुती कुलकर्णी, प्रतिमा ठाकूर, कविता बिराजदार यांचे सहकार्य लाभले.



### प. पू गुरुदेव समंतभद्र महाराज यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

चतुरबाई श्राविका विद्यालय आणि महावीर हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने प. पू गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज यांच्या १३३वी जयंतीनिमित्त बसवेश्वर रक्त पेढी यांच्या सहकार्यातून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. भारतीय जैन संघटनेचे मराठवाडा विभागाचे विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन वि ज्योती विभुते यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी स्मरणिका सुतार, कृष्णा उगडे, श्रावणी शिंदे, तृप्ती, प्रीती, देवराज कैयावले, अरशान चाऊस या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून समंतभद्र महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. रक्तदान हे श्रेष्ठ दान का आहे या विषयी महत्त्व सांगितले. यावेळी चतुरबाई श्राविका विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रुपाली चेंडके, महावीर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका उज्वला पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता घोंगडे यांनी केले.

## निधन वृत्त...

### चौडप्पा उदगिरी



**सोलापूर, दि. २३ डिसेंबर -**

श्री सिद्धेश्वर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक बालोद्यान प्राथमिक विद्यालयाचे अधीक्षक चौडप्पा काशिनाथ उदगिरी सर (वय ९०) यांचे अल्पशा आजाराने रविवार, दि. २२ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुली व मुलगा, नातवंडे असा परिवार आहे.

### वत्सला भोसले

**सोलापूर, दि. २३-**

वैष्णवी नगर, जुळे सोलापूर येथील रहिवासी वत्सला भोसले (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.



### भरत वाघ

**अकलूज, दि. २३ डिसेंबर-**

गिरझणीचे माजी सरपंच व उत्कृष्ट मल्ल भरत साहेबराव वाघ (वय ७२) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. सहकार महर्षी कारखान्याचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंड असा परिवार आहे. गिरझणी, वाघवस्ती येथील त्यांच्या शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



# सोलापुरात मोबाईल चोरीच्या चार घटना

### दुचाकीवर येऊन मोबाईल पळवला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

कोणीतरी अज्ञात दोन इसमांनी दुचाकीवर पाठीमागून येऊन फिर्यादी मोहन विनायक पवार (वय-२०,रा.वसुंधरा नगर,विनायक नगर जवळ) यांचा आठ हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसका मारून जबरदस्तीने ओढून चोरून नेला आहे.ही घटना २२ डिसेंबर रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास सुनील नगर वी आर एल ऑफिस जवळ घडली.याप्रकरणी मोहन पवार यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार पाटील हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने खिशातून पळवला मोबाईल

अज्ञात चोरट्याने फिर्यादी दिगंबर प्रकाश इप्पलपल्ली (वय-३६,रा.कोंडा नगर,अक्कलकोट रोड) हे पुंजाळ मैदान शांती चौक येथे झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील बारा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे.ही घटना ४ नोव्हेंबर रोजी घडली.याप्रकरणी दिगंबर इप्पलपल्ली यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

### मोटरसायकलवरून आलेल्या इसमांनी पळविला मोबाईल

पाथरूड चौक येथे तीन अज्ञात इसमांनी मोटरसायकलवरून येऊन कानाला लावलेला सहा हजार रुपये किमतीचा मोरपंखी रंगाचा विवो कंपनीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना आठ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी राजेंद्र मल्लय्या पल्लाटी (वय-५०, रा. २७७-एक बी नवीन विडी घरकुल) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोह.सरतापे हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने पळविला मोबाईल

अश्विनी हॉस्पिटलकडून शीतलादेवी मंदिरकडे जाणाऱ्या रोडवर फोनवर बोलत जाताना मोटरसायकलवरून आलेल्या अज्ञात इसमांनी आकाशी रंगाचा विवो कंपनीचा दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना ११ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी सविता युसेफ झोंबाडे (वय-३३, रा. सिद्धार्थ सोसायटी, अलकुंटे चौक) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# 'विकसित भारत'साठी वचनबद्धता मजबूत

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

पाचव्या वार्षिक 'संभव समिट' मध्ये ॲमेझॉनने 'विकसित भारत' साठी आपली वचनबद्धता मजबूत करणाऱ्या अनेक उपक्रमांची घोषणा केली.ॲमेझॉन या ई-कॉमर्स क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने मंगळवारी भारतातून २०३० पर्यंत एकूण यूएस ८० अब्ज डॉलर निर्यात करण्याचे वचन दिले आहे. हे २०२५ पर्यंत यूएस २० अब्ज डॉलरच्या सध्याच्या लक्ष्यापेक्षा खूप जास्त आहे. ॲमेझॉनचे इमर्जिंग मार्केट्सचे वरिष्ठ उपाध्यक्ष अमित अग्रवाल यांनी कंपनीच्या वार्षिक संभव समिटमध्ये ही घोषणा केली.ते म्हणाले की ॲमेझॉन हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार,लाखो भारतीय छोटे व्यवसाय,थेट-ते- ग्राहक ब्रँड आणि प्रमुख भागधारकांसोबत काम करत आहे.

**श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**ई-निविदा सुचना**

गोशाळेतील गाईसाठी पशुखाद्य पुरवठा करणेकामी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याची सर्व माहिती **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र. ०२१८६-२२४४६६)

## करमाळा नगरपरिषद, करमाळा

जा.क्र.मिळकत/साशा/१६२३/२०२४ दि. २३/१२/२०२४

**जाहिर फेर लिलाव प्रसिध्दीकरण**

याद्वारे सर्व नागरिकांना कळविणेत येते की, करमाळा नगरपरिषद मालकीचे दुकान गाळ्यांचा जाहिर फेर लिलाव वार बुधवार, दि. ०१/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. नगरपरिषदेच मिळकत विभागात आयोजित करणेत आला आहे. तरी इच्छुकांनी खाली दर्शीवल्याप्रमाणे बोली बयाणा रककम भरुन लिलावात भाग घ्यावा, बोली रक्कमे शिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. बोली बयाणा रक्कम भरणेची मुदत दि. ३१/१२/२०२४ रोजी दुपारी ५.०० वा. पर्यंत राहील लिलावाच्या शर्ती व अटी मिळकत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. लिलाव मंजूर व अथवा ना मंजूर करणेचा अधिकार कोणतेही कारण न देता न.प.ने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | शॉपींग सेंटरचे नाव | गाळा नं. | अनामत रक्कम | लिलाव बोलीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कै. देशभक्त ना.म. जगताप शॉ. कॉम्प्लेक्स बी.-२बी | ४४ | २,००,०००/- | ५,०००/- |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर | ५०, ५१, ५२, ५८ | ३५,०००/- | ५,०००/- |
| ३ | न.प. दवाखाना शॉपिंग सेंटर | ३, ४, १३, १४, १५, १६, १७ | १०,०००/- | २,०००/- |
| ४ | मिनी शॉपिंग सेंटर | २ | २५,०००/- | ५,०००/- |
| ५ | कै. देशभक्त ना.म. जगताप शॉपिंग सेंटर | ३२ | १,२१,०००/- | ५,०००/- |
| ६ | कै. देशभक्त ना.म. जगताप शॉपिंग सेंटर थिएटर समोरील | ८ | १,११,०००/- | ५,०००/- |

सही/-
मुख्याधिकारी
करमाळा नगरपरिषद

Classifieds

**पाहिजेत**

सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासासाठी सोलापूर शहर व ग्रामीण मध्ये
9850702170

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास विशेषतः मौजे वैराग, घाणेगाव व तालुका बार्शी परिसरातील लोकांना याद्वारे जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, रामहरी दादासाहेब गिरी, राहणार घाणेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर हे या जाहीर नोटीसीद्वारे काळवितात की ते घाणेगाव येथील त्यांचे हॉटेल पासून वैरागकडे त्यांचे दुचाकी वाहन क्रमांक एम. एच. १३ डी सी ७६७९ या गाडीला घाणेगाव येथील जमिनीसंबंधी आवश्यक ती सर्व कागदपत्रे पिशवीत होते तेव्हा ते घेऊन ता. ३०/११/२०२४ रोजी निघाले होते ते त्यांच्या दुचाकी वाहनास अडकवलेल्या पिशवीत मौजे घाणेगाव येथील गट जमीन नंबर २४१ पैकी बिनशेती प्लॉट या जागेचे खरेदी विषयक दस्त खरेदी दस्त क्र. २०२४/२०१९ चा दिनांक १६/१२/२०१९ रोजी वैराग दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदलेला पूर्व हक्कदार यांचे नावे खरेदी असलेला तो मी माझ्या खरेदीखताचे वेळी ताब्यात घेतलेला मूळ दस्त, तसेच चालू ७/१२ उतारा, आधार कार्डच्या व पॅन कार्ड यांच्या छायांकित प्रती, वगैरे कागदपत्रे सदर यासह बॅगमध्ये सोबत ठेवले होते आणि त्यांनी वैराग येथील स्टँडजवळ आल्यावर सदरचे वाहन त्यांनी बाहेर लावले. त्यांनी गाडीवरून उतरल्यावर कागदपत्रे शोधत असताना सदरची वाहनास अडकविलेली त्यांची बॅग मिळून आली नाही. त्यांनी सदर बॅगचा शोध घेतला असता ती आढळून आलेली नाही. सदर बॅगमध्ये महत्वाची कागदपत्रे होती. त्यास्तव वर नमूद त्यांचे कागदपत्रासह असलेली बॅग ज्या कोणास सापडली असेल अगर विसरली असेल अशी समजूत करून कोणी व्यवस्थित ठेवली असेल तर संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसाच्या आत कागदपत्रासहीत ती बॅग आमचे पत्त्यावर आणून द्यावी व आमच्या अशिलास सहकार्य करावे. सदर बॅग आणून देणारे व्यक्तीचे आमचे अशील धन्यवाद मानून जरूर ते बक्षीस देतील, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली. ता. २३/१२/२०२४,

सही/-
श्री. नंदकिशोर नारायण पाटील
बी.ए. (ऑ), एलएल. बी. ॲडव्होकेट
लक्ष्मीनारायण निवास, शिवाजीनगर,
मु.पो. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर.
मोबाइल नंबर ९६५७६९३०५५
रामहरी दादासाहेब गिरी,
घाणेगाव, ता. बार्शी, जि.
सोलापूर. मो. नं. ९६८९२९३४५९

**जाहीर समन्स**

रे.मु.नं.२६/२००७
निशाण नं.१२४

**माढा येथील मे.सि.ज.ज्यु.डी. साहेब यांचे कोर्टात**
**(मा.श्री.जी.व्ही. गांधे सो कोर्ट)**

महारुद्र शंकर भादुले - वादी
विरुध्द
विश्वनाथ मारुती चोपडे वगैरे - प्रतिवादी

ज्याअर्थी यातील खालील प्रतिवादी हे दावेत दिलेल्या पत्त्यावर राहत नाही असा बेलिफ रिपोर्ट आलेनंतर वादी तर्फे दिलेले निशाण नंबर १२१ वरील आदेशाप्रमाणे जाहीर समन्स बजावणेचा आदेश झालेवरुन प्रतिवादी नंबर २ (इ) यांना या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, प्रतिवादी नंबर २ (इ) निता नंदकुमार चव्हाण रा. गुरसाळे, ता. पंढरपूर जि. सोलापूर या प्रतिवादीस या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वादीनी आपले विरुध्द डिक्लरेशन मिळून निरंतरची ताकीद मिळणेसाठी वरील दावा केलेला आहे.

त्यास आपले म्हणणे /कैफियत दाखल करणेसाठी पुढील नेमलेली तारीख १०/०२/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर व्हावे, तसेच आपला राहता पत्ता, मोबाईल नंबर सादर करावा. वरील तारखेस आपण गैरहजर राहिलेस आपले काही म्हणणे नाही असे समजून पुढील योग्य ते आदेश केले जातील.

हे जाहीर समन्स आज रोजी दि.२३/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द केले.

सही/-
(श्री.पी.एस.जगताप)
क.लि
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
माढा.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरुन
सही/-
(श्री.डी.एन.अडसुळे)
सहा. अधीक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, माढा.

**जाहीर नोटीस**

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३३५/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

१. लक्ष्मण प्रभू करंडे - अर्जदार
रा. सासुरे ता बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील एस टी जाधव)
विरुध्द
२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रा. पं. सासुरे - गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील प्रभू माधव करंडे, रा. सासुरे ता बार्शी, जि सोलापूर यांचा मौजे सासुरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १८ जुन १९५१ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ ( सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे वडील प्रभू माधव करंडे यांचा दिनांक १८ जुन १९५१ रोजी मौजे सासुरे, ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी,
बार्शी

# जादा पैशाचे आमीष दाखवून 30 लाख रुपयांचा गंडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर -**

सर्वसामान्यांसाठी रिटेल क्षेत्रात यशाचा आणि लाखोंच्या कमाईचा एक्सलेंन्ट मार्ग अशी जाहिरात प्रसिद्ध करून महिन्यात लाखो रुपये मिळतील असे जादा पैशाचे आमीष दाखवून ३० लाख रुपयांचा गंडा घातला.

याप्रकरणी मनीषा विष्णू मोंढे (वय-५१,रा. १११ ब अत्रोळीकर नगर भाग दोन, होटगी रोड) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून सचिन मलिक पाटील (रा.औरंगाबाद) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात माहिती अशी की, संशयित आरोपी सचिन पाटील यांनी दि. २३ मे २०२२ रोजी एका वर्तमानपत्रात सर्वसामान्यांसाठी रियल क्षेत्रात यशाचा आणि लाखोंच्या कमाईचा एक्सलेंन्ट मार्ग या विषयांकित जाहिरात प्रसिद्ध करून महिन्यात लाख रुपये मिळतील असे आमीष दाखवून स्टॉकिस्ट म्हणून फिर्यादीचे मोंढे इंटरप्राईजेस या फर्मचे सिद्धेश्वर वस्तीगृह, भवानी पेठ या ठिकाणीचे गोडाऊन नूतनीकरणासाठी सुमारे १३ लाख रुपये खर्च करण्यास भाग पाडले. तसेच २३ मे २०२२ ते दोन सप्टेंबर २०२२ या कालावधीत फिर्यादीकडून फर्निचरसाठी व माल पाठविण्यासाठी ३० लाख रुपये घेऊन त्यापैकी दहा लाख रुपयांचा माल पाठवून दिला. ठरल्याप्रमाणे परत घेऊन गेले नाही. त्यांच्याकडे उर्वरित राहिलेल्या २० लाख रुपयांची मागणी केली असता ते परत दिले नाहीत. तसेच संशयित आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून व्यवसाय जादा नफ्याचे अमिष दाखवून फिर्यादीकडून ३० लाख रुपये घेतले व ते परत न देता फसवणूक केले. या घटनेचा पुढील तपास पोसई शिंदे हे करीत आहेत.

अुत्तम सेवा

मंगळवार
दि. २४ डिसेंबर २०२४

## नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **स्टेट बँक ऑफ इंडिया, SBI** | | | |
| | लिपीक (१३,७३५ पदे) | पदवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २८ पर्यंत | ०७/०१/२५ |
| २) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC (गट-ब) (मुदतवाढ)** | | | |
| | १) कर निरीक्षक (२०९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | ०६/०१/२५ |
| | २) कक्ष अधिकारी (५५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) पोलिस उपनिरीक्षक (२१६ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३१ पर्यंत | |
| ३) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC (गट-क) (मुदतवाढ)** | | | |
| | १) लिपीक (७८६ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ०६/०१/२५ |
| | २) कर सहाय्यक (४८२ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| | ३) तांत्रिक सहाय्यक (०९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| | ४) नगरपाल (१७ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| | ५) उद्योग निरीक्षक (३९ पदे) | पदवी/पदविका (इंजिनियरींग)/B.Sc | ३८ पर्यंत | |
| ४) | **जनता सहकारी बँक लि. सोलापूर** | | | |
| | ट्रेनी क्लार्क | पदवी (५०%) गुणांसह उत्तीर्ण असावे व संगणक साक्षरता आवश्यक | ३५ पर्यंत | ३१/१२/२४ |
| ५) | **दि. न्यू इंडिया एश्योरन्स कं. लि. मुंबई** | | | |
| | सहाय्यक (५०० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ०१/०१/२५ |
| ६) | **राष्ट्रीय संरक्षण व नौदल अकॅडमी** | **NDA** | | |
| | NDA & NA (४०६ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | १९ पर्यंत | ३१/१२/२४ |
| ७) | **संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा, CDS** | | | |
| | CDS-I 2025 (४५७ पदे) | पदवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ३१/१२/२४ |
| ८) | **नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ वायरॉलॉजी, पुणे (अॅप्रेंटिस करण्याकरीता)** | | | |
| | अॅप्रेंटिस (३१ पदे) | ITI (इले/प्लंबर/ए.सी./पासा/मोटार/कार्पेंटर/आय.टी.) उत्तीर्ण असावे | -- | २६/१२/२४ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ९) | **समाजकल्याण आयुक्तालय, पुणे** | **(मुदतवाढ)** | | |
| | १) अधीक्षक- महिला (९२ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | ३१/१२/२४ |
| | २) अधीक्षक- सर्वसाधारण (६१) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) समाजकल्याण निरीक्षक (३९) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ४) वरिष्ठ निरीक्षक (०५ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ५) लघुलेखक (२२ पदे) | दहावी व टायपिंग-स्टेनो उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| १०) | **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.** | MAHAGENCO | ३८ पर्यंत | २६/१२/२४ |
| | १) तंत्रज्ञ - ३ (८०० पदे) | ITI (इले/ वायरमन/मशिनिस्ट/फिटर/ इलेक्ट्रॉ/ आय.टी./वेल्डर/इन्स्ट्रू/ बॉयलर/स्विचबोर्ड/पॉवर) उत्तीर्ण | | |
| ११) | **भारतीय सर्वोच्च न्यायालय, SCI** | | | |
| | १) पर्सनल असिस्टंट (३३ पदे) | पदवी व इंग्रजी शॉर्ट हॅन्ड व टायपिंग | ३० पर्यंत | २५/१२/२४ |
| | २) सिनिअर पर्सनल असि(४३ पदे) | पदवी व इंग्रजी शॉर्ट हॅन्ड व टायपिंग | ३० पर्यंत | |
| १२) | **बृहन्मुंबई महानगरपालिका, BMC** | **(मुदतवाढ)** | | |
| | १) कनिष्ठ अभियंता(३८० पदे) | दहावी उत्तीर्ण व डिप्लोमा (सिव्हील/ इलेक्ट्रॉ/ऑटो/प्रोडा/इले. पॉवर/इनस्ट्रू/ इलेक्ट्रॉ अॅन्ड टेली) व MSCIT | ३८ पर्यंत | ३१/१२/२४ |
| | २) दुय्यम अभियंता (३१० पदे) | B.E (सिव्हील/इलेक्ट्रॉ/ऑटो/प्रोडा/ इले. पॉवर) व MSCIT उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| १३) | **बॉम्बे मर्कंटाईल को. ऑप बँक** | | | |
| | १) प्रोबेशनरी ऑफिसर (६० पदे) | पदवी (५०%) गुणासह उत्तीर्ण असावे | ३५ पर्यंत | २५/१२/२४ |
| | २) ज्यु. एक्झिकेटीव्ह असि. (७५ पदे) | पदवी (५०%) गुणासह उत्तीर्ण असावे | | |
| १४) | **बॉर्डर सिक्युरिटी फोर्स BSF** | **(फक्त खेळाडूसाठी भरती)** | | |
| | कॉन्स्टेबल GD (२७५ पदे) | पदवी व संबंधित क्रिडा पात्रता | २३ पर्यंत | ३०/१२/२४ |
| १५) | **भारतीय तटरक्षक दल** | | | |
| | असि. कमांडंट GD (११० पदे) | बारावी (गणित/फिजिक्स) व पदवी | २५ पर्यंत | ३०/१२/२४ |
| | असि. कमांडंट टेक्नि (३० पदे) | BE (मेकॅ/मरिन/मेटा/ॲरो/इले/ इलेक्ट्रॉ/ टेली/इन्स्ट्रू/पॉवर) उत्तीर्ण | २५ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org



# आपलं सोलापूर

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
मंगळवार, २४ डिसेंबर २०२४

''सरणावरती आज आमुची पेटताचं प्रेते! उठतील त्या ज्वालांतून भावी क्रांतीचे नेते!!''

# महापुरुषांचे पुतळे अन् विचारांनी समृध्द हुतात्मा नगरी!


## शहरात विविध ठिकाणी पूर्णाकृतींसह एकूण ३४ पुतळे!

## माजी पंतप्रधानांसह चार माजी मुख्यमंत्र्यांचे पुतळे लक्षवेधक!

## प्रेरणादायी तीन स्मारकांसह ऐतिहासिक बलिदान चौक

**सोलापूर शहराचा क्रांतिकारी शहर म्हणून जगभरात नावलौकिक आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश राजवटीत पारतंत्र्यात याच शहरात चार दिवस स्वातंत्र्य उपभोगण्यात आले. नवी पेठ येथील तत्कालीन नगरपालिकेच्या इमारतीवर पारतंत्र्यात राष्ट्रीय निशान फडकवण्यात आले होते.क्रांतिकारी आणि आक्रमक असा स्वातंत्र्याचा लढा या सोलापूर शहरात झाला. यामुळे ब्रिटिशांचे इंग्लंडमधील तख्तही हादरले होते. यामुळेच सोलापुरात मार्शल लॉ पुकारण्यात आला. चार स्वातंत्र्य सेनानींना फाशी देण्यात आली. त्यामुळेच सोलापूर ही क्रांती अन् प्रेरणाभूमी म्हणून ओळखली जाते. सोलापूरच्या या प्रेरणाभूमीत विविध महापुरुषांचे पुतळे सर्वांना प्रेरणा आणि ऊर्जा देत आहेत. स्वातंत्र्य सेनानी, माजी पंतप्रधान, माजी मुख्यमंत्री, यांच्या पुतळ्यांनी हे शहर वैचारिक दृष्ट्या समृद्ध झाले आहे. सोलापूर शहर महापुरुषांचे पुतळे अन् विचारांनी नटलेलं आहे. ''सरणावरती आज आमुची पेटतांच प्रेते! उठतील त्या ज्वालांतून भावी क्रांतीचे नेते !!'' हा प्रेरक संदेश हे पुतळे देत आहेत. सर्वांसाठी दिशादर्शक ठरत आहेत.**

### माता रमाई व डॉ. बाबासाहेबांचा पुतळा उभारणीचे काम गतीने!



शहरातील सम्राट चौक जवळील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणी तसेच परिसर सुशोभीकरणाचे काम गतीने सुरू आहे. सुशोभीकरणामुळे या उद्यानाचा लूक बदलणार आहे. १५० लोकांची बैठक व्यवस्था असलेले अँम्पी थिएटर करण्यात येत आहे तसेच लॉन, कारंजे यासह विविध माध्यमातून परिसर नयनरम्य होणार आहे. उद्यान सुशोभीकरणाचे काम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत १ कोटी २८ लाख रुपये निधीतून करण्यात येत आहे.

### छत्रपती शिवराय आणि डॉ. आंबेडकर यांचे विविध चार ठिकाणी पुतळे



सोलापूर शहरांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध ठिकाणी चार पुतळे सर्वांना प्रेरणा देत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचे छत्रपती शिवाजी महाराज चौक एसटी स्टँड जवळ, जिल्हा परिषद रंगभवन जवळ, नवी पेठ नजीकच्या शिवस्मारक येथे आणि सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यालयासमोर असे चार ठिकाणी पुतळे आहेत. तसेच विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे पार्क स्टेडियम जवळ डॉक्टर आंबेडकर चौक, डॉक्टर आंबेडकर उद्यान सम्राट चौक (नव्याने उभारण्यात येत आहे), मिलिंद नगर येथील अस्थीविहार प्रेरणाभूमी आणि भाग्योदय हाऊसिंग सोसायटी आदी चार ठिकाणी आहेत. तर लोकमान्य टिळक यांचे शहरातील टिळक चौक, हिराचंद नेमचंद वाचनालय, जुळे येथील टिळक महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ इमारत आदी तीन ठिकाणी पुतळे उभारण्यात आले आहेत. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा महापालिका आवार आणि विजापूर रोडवरील इंदिरानगर येथे असे दोन पुतळे आहेत. सात रस्ता आणि महापालिका आवार असे दोन ठिकाणी माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे पुतळे उभारले आहेत. मानवतावादी डॉक्टर द्वारकानाथ कोटणीस यांचे सिव्हिल हॉस्पिटल आणि कोटणीस स्मारक या दोन ठिकाणी पुतळे आहेत.

### प्रेरणादायी दहा घटनांचे भित्तिशिल्प






येथील चार हुतात्मा पुतळा आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा परिसर सुशोभीकरण करण्यात आल्याने हे ठिकाण आता अतिशय प्रेरक आणि ऊर्जादायी असेच बनले आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आणि सोलापुरातील स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी घटनांचे एकूण दहा भित्तीशिल्प लावण्यात आले आहेत. सोलापूर शहरातील पार्क स्टेडियम जवळ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट आणि कार्याचे दर्शन घडविणारे पाच भित्तिशिल्प पुतळ्याच्या मागील बाजूस साकारण्यात आले आहेत तसेच सोलापुरातील मे १९३० मधील स्वातंत्र्य लढ्याच्या घटनांचे पाच भित्तीशिल्प बसविण्यात आले आहे असे एकूण दहा विविध घटनांचे दर्शन घडविणारे भित्तिशिल्प इथे लावण्यात आले आहेत. पुणे येथील शिल्पकार शहाणे यांनी हे भित्तिशिल्प साकारले आहेत. चार हुतात्मा पुतळ्यांसमोर कविवर्य ग. दि. माडगूळकरांच्या कवितेचा शिलालेखही उभारण्यात आला आहे.

### सोलापुरातील स्वातंत्र्य लढ्यातील या क्रांतिकारी घटनांचे दर्शन !



येथील चार हुतात्मा पुतळ्यांच्या मागील भिंतीवर सोलापुरातील मे १९३० मधील स्वातंत्र्य लढ्यातील विविध घटनांचे भित्तीशिल्प लावण्यात आले आहेत. यामध्ये पारतंत्र्यात तत्कालीन नगरपालिकेवर राष्ट्रीय निशाण फडकविण्यात आलेला प्रसंग, तुळजापूर वेस येथील आंदोलन, त्यानंतर अधिक उग्र आंदोलन झाल्यानंतर मंगळवार पेठ पोलीस चौकी पेटविल्याची घटना, याप्रकरणी चार स्वातंत्रसेनींना अटक आणि न्यायालयातील प्रसंग, येरवडा जेलमध्ये चार हुतात्म्यांना फाशीची घटना या विविध पाच भित्तीशिल्पातून साकारण्यात आल्या आहेत. क्रांतिकारक घटनांचे ऊर्जादायी आणि प्रेरक असे हे भितिचित्र सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

### नवी पेठ जवळील प्रेरणादायी शिवस्मारक !



शहरामध्ये नवी पेठ जवळ शिवस्मारक हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आदर्श जीवन कार्याची प्रेरणा देत आहे. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रेरक पुतळा आहे. येथे भित्तीशिल्प साकारण्यात आली आहेत. हे शिवस्मारक सर्वांना मार्गदर्शक आणि ऊर्जादायी ठरत आहे.

### विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी



शहरातील मिलिंद नगर ,थोरला राजवाडा येथे विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी आहे. या ठिकाणी डॉ. आंबेडकर आंबेडकर यांचा पदस्पर्श लाभला. २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महार वतनदार परिषदेसाठी या ठिकाणी आले होते. क्रांतिकारी संदेश यावेळी त्यांनी या परिषदेत दिला होता. याच ठिकाणी अस्थिविहार प्रेरणाभूमी उभारण्यात आली आहे. येथे डॉ. आंबेडकर यांचा अस्थिकलश व पुतळा आहे. त्याचबरोबर डॉ. आंबेडकर यांच्या जीवन कार्य आणि सोलापूर भेटीच्या प्रसंगाचे भित्तीशिल्पही साकारण्यात आले आहे.

### मानवतावादी डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक



सोलापूर शहरात स्टेशन रोडवर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथे मानवतावादी डॉक्टर द्वारकानाथ कोटणीस यांचे स्मारक सर्वांना प्रेरणा देत आहे. या ठिकाणी चीनच्या राष्ट्राध्यक्षांनी पाठविलेले पत्र तसेच डॉक्टर कोटणीस यांच्या विविध वस्तूंचा संग्रह आहे. चीन आणि भारत यांच्या ऋणानुबंध आणि दृढ मैत्री संबंधाचा एक प्रतीक असलेले हे प्रेरक स्मारक आहे.

### स्वातंत्र्य लढ्यातील प्रेरणास्थान बलिदान चौक



सोलापुरात दि. ६ ते १२ मे १९३० दरम्यान स्वातंत्र्यासाठी आक्रमक असे आंदोलन आणि लढा उभारण्यात आला. याच दरम्यान तुळजापूर वेस परिसरात आक्रमक आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनावेळी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी गोळीबार केला. यामध्ये शंकर शिवदारे हे शहीद झाले. त्यानंतर अधिक उग्र आंदोलन झाले. स्वातंत्र्य सेनानींनी मंगळवार पेठ पोलीस चौकी, गोल चावडी पेटवली होती. दरम्यान, सोलापुरातील चार स्वातंत्र्य सेनानींना फाशी देण्यात आली. या क्रांती लढ्याचे स्मरण म्हणून तुळजापूर वेस येथे बलिदान चौकात हुतात्मा स्तंभ उभारण्यात आला.

### भाग्योदय सोसायटीतील डॉ. आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा

सोलापूर शहरात पारसी विहिरी समोरील भाग्योदय हाऊसिंग सोसायटी येथील भीमसैनिक अजय भालेराव यांच्या निवासस्थानी विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७ फुटी पूर्णाकृती प्रेरक पुतळा उभारण्यात आला आहे. मेटल विथ रेन फोर्स ग्लास फायबर पासून हा पुतळा बनविण्यात आला आहे. तीन लाख रुपये खर्च यासाठी झाला.

### शहरात विविध भागांमध्ये हे आहेत पूर्णाकृती पुतळे



सोलापूर शहरात विविध भागांमध्ये विविध महापुरुषांचे पूर्णाकृती व अश्वारूढ पुतळे आहेत. यामध्ये घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा श्री बसवेश्वर महाराज, राणी लक्ष्मीबाई, वीर महाराणा प्रताप, डॉ. द्वारकानाथ कोटणीस, स्वातंत्र्यवीर सावरकर , माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील आणि अन्य उभ्या पुतळ्यांचा समावेश आहे.







### सोलापूर शहरातील महापालिका कार्यक्षेत्रात असलेले ३४ पुतळे...

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर- पार्क स्टेडियम जवळ,
- महात्मा गांधी- रेल्वे स्टेशन चौक,
- सिकची पुतळा- रेल्वे स्टेशन समोर,
- साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे- स्टेशन रोड,
- महात्मा ज्योतिबा फुले- सुपर मार्केट,
- छत्रपती शिवाजी महाराज - एसटी स्टँड जवळ,
- कर्मवीर भाऊराव पाटील- सम्राट चौक,
- कै. जाजू- बाळी वेस,
- लोकमान्य टिळक- टिळक चौक,
- हभप लक्ष्मण महाराज- तरटी नाका पोलीस चौकी जवळ,
- महात्मा श्री बसवेश्वर महाराज- कोंतम चौक,
- चार हुतात्मा पुतळा- पार्क स्टेडियम जवळ ,
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर - पार्क स्टेडियम जवळ,
- कै. कन्ना- कन्ना चौक,
- कै.वडेपल्ली- भद्रावती चौक,
- कै. साळुंखे- रविवार पेठ बस डेपो,
- माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक- नेहरूनगर ,
- माजी पंतप्रधान इंदिरा गांधी- इंद्रभुवन परिसर, महापालिका,
- आप्पासाहेब वारद - इंद्रभुवन परिसर, महापालिका,
- माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण- सात रस्ता,
- वीर महाराणा प्रताप- सात रस्ता,
- स्वातंत्र्यवीर सावरकर- मार्कंडेय उद्यान,
- हुतात्मा स्तंभ- बलिदान चौक तुळजापूर वेस,
- डॉ. द्वारकानाथ कोटणीस- सिव्हिल हॉस्पिटल,
- नेताजी सुभाषचंद्र बोस- सुभाष उद्यान,
- छत्रपती संभाजी महाराज - जुना पुना नाका,
- माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण- डफरीन चौक,
- माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील- सिव्हिल चौक,
- डॉ. द्वारकानाथ कोटणीस- कोटणीस स्मारक - अण्णाभाऊ साठे चौक,
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर- न्यू बुधवार पेठ,
- माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण- महापालिका परिसर,
- राणी लक्ष्मीबाई- धर्मवीर संभाजी तलाव परिसर,
- डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर- दत्त चौक,
- स्वातंत्र्य सेनानी तुळशीदास जाधव - मेकॅनिक चौक

### सहकार महर्षींचेही आहेत पुतळे

सोलापूर शहर-जिल्ह्यात सहकार चळवळ वाढली. त्याचे स्मरण म्हणून सहकार महर्षींचेही पुतळे उभारण्यात आले. शहरामध्ये सोलापूर जिल्हा परिषदेसमोर सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात सहकार महर्षी वि. गु. शिवदारे, माजी आ. बाबुराव चाकोते, सहकार महर्षी ब्रह्मदेव माने यांचेही पुतळे उभारण्यात आले आहेत.

### पुतळ्यांच्या स्ट्रक्चरल ऑडिटसाठी महापालिकेची प्रक्रिया सुरू

सिंधुदुर्गातील घटनेनंतर सोलापूर शहरातील उभ्या पुतळ्यांच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा विषय ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील ३४ पुतळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी महापालिका प्रशासनाने पॅनेलवरील पाच स्ट्रक्चरल इंजिनिअर्सची नियुक्ती केली आहे.पुतळ्यांची मजबुती तपासण्यासाठी महापालिका प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे.शहरातील सर्व पुतळे मजबूत आहेत तरीही महापालिका तपासणी करीत आहे. सोलापूर शहरातील हे पुतळे कधी उभारण्यात आले यासह इतर माहिती घेण्यात येत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीत याच शहरात चार दिवस स्वातंत्र्य उपभोगण्यात आलं. क्रांतिकारी आणि आक्रमक असा स्वातंत्र्याचा लढा या सोलापूर शहरात झाला. यामुळे ब्रिटिशांचं इंग्लंडचं तख्तही हादरले होते. यामुळेच सोलापुरात मार्शल लॉ पुकारण्यात आला. सोलापूर ही क्रांती अन् प्रेरणाभूमी म्हणून ओळखली जाते. या शहराला लोकमान्य टिळक , महात्मा गांधी, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महापुरुषांचा पदस्पर्श लाभला. तत्कालीन पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांनीही या शहराला भेटी दिल्या. आदर्श महापुरुष, स्वातंत्र्य सेनानी तसेच माजी पंतप्रधान, मुख्यमंत्री, समाज सुधारक यांचे पुतळे या सोलापुरात पाहायला मिळतात. सर्वच महापुरुषांचे जयंती उत्सव सोलापूर शहरांमध्ये उत्साही वातावरणात दिमाखदार पद्धतीने साजरे केले जातात. जयंती उत्सवाची भव्य दिव्य मिरवणूक काढली जाते. सोलापुरातील विविध जयंती मिरवणुकांचा जगभरात डंका आहे. उत्सव प्रिय शहर म्हणूनही सोलापूरची ओळख आहे.

सोलापूरात महापालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी पूर्णाकृतींसह एकूण ३४ पुतळे सर्वांना वैचारिक दृष्ट्या मार्गदर्शक ठरत आहेत.

त्याचबरोबर इतर शासकीय, निमशासकीय आणि शैक्षणिक तसेच खाजगी परिसरातही महापुरुषांचे पुतळे उभारण्यात आले आहेत. यामुळे महापुरुषांच्या पुतळ्यांचे शहर म्हणून एक पर्यटन स्थळही सोलापूर शहर सर्वांना आकर्षित करत आहे. शहरातील विविध चौक हे महापुरुषांच्या पुतळ्यांनी नटलेले आहेत.

सोलापूर शहराच्या मुख्य प्रवेशद्वारातच छत्रपती संभाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. किल्ल्याची प्रतिकृतीसह छत्रपती संभाजी महाराज चौक दिमाखदार असा सुशोभित करण्यात आला आहे. यामुळे सोलापूरचे भौगोलिक आणि वैचारिक सौंदर्य अधिक खुलले आहे. त्याचबरोबर काही ठिकाणी समाज सुधारक आणि राजकीय नेत्यांचेही पुतळे उभारण्यात आले आहेत.

● किरण बनसोडे : मो.९४०५४३६१४१



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### संतोष देशमुख हत्येप्रकरणी बार्शीच्या तहसीलदारांना निवेदन

**बार्शी, दि. २४ डिसेंबर-**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात संसकल मराठा समाज बार्शी,विविध संघटना व देशमुखी परिवार यांच्यावतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. संतोष देशमुख यांची अपहरण करुन निर्घृणपणे हत्या ९ डिसेंबर रोजी करण्यात आली होती. तरीदेखील यातील आरोपींना अद्याप अटक झालेली नाही. यातील आरोपींना लवकरात लवकर अटक करा, मुख्य सूत्रधार वाल्मिकी कराड याला बेड्या ठोका व कठोरात कठोर शिक्षा आरोपींना झाली पाहिजे. या केसमध्ये विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नेम णूक करा, असे निवेदन बार्शीचे तहसीलदार यांना देण्यात आले. अद्यापपर्यंत फरार असलेले आरोपींना तात्काळ अटक केली नाही तर येणाऱ्या काळात तीव्र आंदोलन उभे केले जाईल, असेही सांगण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. घोडके यांनी निवेदन वाचून दाखवले व ॲड. गणेश हांडे, विजय राऊत यांनी भावना व्यक्त केल्या.



### तीर्थ येथील रामलिंगेश्वर प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. द. सोलापूर ) येथील श्री रामलिंगेश्वर प्रशालेत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात आला. वळसंग पोलीस स्टेशनचे सपोनि अनिल सनगल्ले यांनी उद्घाटन केले. सपोनि सनगल्ले म्हणाले की, ग्राम ीण भागातील विद्यार्थ्यांना इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये खेळण्याकरता मैदान उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. भीमाशंकर बिराजदार यांचे कौतुक करत ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळामध्ये निपुण असतात. त्यांच्यात जिद्द, चिकाटी आणि परिश्रम करण्याची क्षमता असते. अशा विद्यार्थ्यांना इतक्या मोठ्या प्रमाणात खेळाचे मैदान व साहित्य उपलब्ध केल्यास मुलांच्या कलागुणांना वाव मिळत असतो. अशातूनच क्रीडा क्षेत्रामध्ये ग्रामीण भागातील मुले चमकत असतात. मी स्वत: पण कबड्डीतला उत्कृष्ट खेळाडू होतो व अनेक बक्षीस व पारितोषिके घेतली आहेत, असे सांगितले. याप्रसंगी प्राचार्य सुधीर सोनकवडे, मल्लिनाथ बंदीछोडे, पोकॉ भीमाशंकर कलकुटे, नागराज पाटील, सचिन गुजा, अमर पाटील, सिद्धाराम पाटील, स्वामी, तांदळे, महेश पट्टणशेट्टी, गुरुशांत बिराजदार, बाबासाहेब धोडमिसे उपस्थित होते.



### मैदानी स्पर्धेत सांगोला महाविद्यालयाचे यश

**सांगोला, दि.२३ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या वतीने श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, सोलापूर येथे पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेमध्ये सांगोला महाविद्यालयातील विद्यार्थिनी प्रियंका बंडोपंत सावंत हिने थाळीफेक मध्ये प्रथम क्रमांक मिळवत विद्यापीठ संघामध्ये निवड झाली. त्याचबरोबर सानिका श्रीकांत बाबर हिने उंच उडी व लांब उडीमध्ये व्दितीय क्रमांक मिळवला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, प्रा.पी.सी.झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ड.उदय घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना डॉ. सुरेश भोसले, प्रा. जगदीश चेडे व जिमखाना कमिटीचे सर्व सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले.

### कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेतर्फे बहुभाषा कविसंमेलन

**विजयपूर, दि. २३ डिसेंबर-**

कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेतर्फे रविवारी जिल्हा कराम सापच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभानिमित्त बहुभाषा कविसंमेलनाचे आयोजित करण्यात आले आहे.

शहरातील सेटलाईट बसस्थानकसमोरील हॉटेल भवानी सभागृहात होणाऱ्या या संमेलनात मराठी, कन्नड, हिंदी, उर्दू आणि गुजरातीसह विविध भाषिक कवी सहभागी होणार आहेत. उद्घाटन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे उपाध्यक्ष गुरय्या रे. स्वामी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी कलबुरगी करामसाप कार्यवाह प्रभाकर सलगरे, बागलकोट करामसाप अध्यक्षा कवी सुधा बेटगेरी, चिक्कोडी अध्यक्षा कवी लता माने-संकेश्वर, कवी प्रकाश राजपूत यांच्यासह कवी सहभागी होणार आहेत. अध्यक्षस्थानी करामसाप विजयपूर जिल्हाध्यक्ष दीपक शिंत्रे भूषविणार आहेत. यावेळी डॉ. सदाशिव पवार, कन्हैया पेठकर, प्रा. गंगाधर गेंड, सुधाकर शिंदे, डॉ. एस. जे. जहागिरदार, रुपा हिबारे, प्रा. रेखा अध्यापक, प्रा. रेवती कट्टी, प्रा. उल्का जाधव उपस्थित राहणार आहेत.

करामसाप
कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद कलबरगी

# निंबर्गीतील शेतकऱ्याच्या शेतातील तुरीचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

**केंद्रीय कृषी मंत्र्यांनी दिले गंगाधर बिराजदार यांना दिल्लीत भेटण्याचे आमंत्रण; नवीन वाणातून उत्पादन**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २३ डिसेंबर-**

पुणे कृषी महाविद्यालय येथे कृषी दिनानिमित्त आयोजित केलेल्या कृषी मेळाव्यात दक्षिण सोलापूर तालुक्यातील निंबर्गी येथील गंगाधर बिराजदार यांनी त्यांच्या शेतात उत्पादन घेतलेल्या गोदावरी जातीच्या तुरीची माहिती महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी घेतली. यावेळी मान्यवरांनी बिराजदार यांच्या तुरीच्या पिकाचे कौतुक केले. दिल्ली येथे येऊन मंत्रालयात भेटण्यास सांगितले.

बिराजदार यांनी आपल्या शेतात गोदावरी या नवीन तुरीच्या वाणाची लागवड करून तुरीचे विक्रमी उत्पादन घेतले आहे. सुधारित तंत्रज्ञान वापरून तुरीच्या एका झाडावर साधारण १,२०० ते १,४०० शेंगा लागल्या आहेत. यासाठी यातून साधारणपणे एकरी १४ ते १५ क्विंटल उत्पादन मिळेल असे सांगितले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग यांनी या उत्पादनाची सविस्तर माहिती बिराजदार यांच्याकडून घेतली. अशा युवा शेतकऱ्यांकडून नक्कीच सर्व नवयुवा शेतकऱ्यांनी प्रेरणा घ्यावी असे सांगितले. तुरीचे उत्पादन घेताना कृषी विज्ञान केंद्राचे लालासाहेब तांबडे, अमोल शास्त्री, कृषी सहाय्यक अशोक राठोड यांचे मार्गदर्शन लाभल्याचे बिराजदार यांनी सांगितले. बिराजदार यांना यापूर्वीही तुरीचे विक्रमी उत्पादनामुळे राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. तसेच बेदाणा उत्पादनाबद्दल दिल्ली येथे गतवर्षी राष्ट्रीयस्तरावर पुरस्कार प्राप्त झाला आहे.



**शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करण्याचा छंद**

लहानपणापासून शेती करण्याचा आवड असल्याने पारंपारिक शेतीबरोबर नवनवीन प्रयोग करून अधिक उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करीत आहे. द्राक्षे व तूर या पिकांबद्दल केंद्र व राज्य सरकारकडून गौरविण्यात आला आहे. नवनवीन प्रयोग करून तरूणांमध्ये शेतीबद्दल आवड करण्याचा मानस आहे.

-गंगाधर बिराजदार,
प्रगतशील शेतकरी, निंबर्गी

# विद्यार्थ्यांनी विविध कलेची जोपासना करावी : जयसिंह

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २४ डिसेंबर-**

प्रत्येकाने आयुष्यात एक तरी कला जोपासली पाहिजे. प्रताप क्रीडा मंडळ मागील ४४ वर्षापासून ग्रामीण भागातील कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. या माध्यमातून आजपर्यंत अनेक कलाकार घडले असून त्यांनी अकलूजचे नाव राज्य-राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहचवले असल्याचे प्रताप क्रीडा मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

स्मृतीभवन शंकरनगर येथे प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त घेतलेल्या शालेय मुला-मुलींच्या राज्यस्तरीय समूहनृत्य स्पर्धेप्रसंगी ते बोलत होते. मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा होत आहेत. यावेळी दिपकराव खराडे-पाटील, ॲड. नितीन खराडे-पाटील, सुमित्रा पतसंस्थेचे चेअरमन महादेव अंधारे, निशा गिरमे, नारायण फुले, रामचंद्र गायकवाड, उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सिने नृत्यदिग्दर्शक सागर राऊत, सीनेअभिनेते कुणाल मराठे, नृत्यदिग्दर्शक आशिष देसाई, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धा प्रमुख संजय गळीतकर, प्रा. डॉ.विश्वनाथ आवड, दिलीप शिर्के, नामदेव काळे उपस्थित होते.



स्वरूपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या, या स्पर्धेतून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढल्याचे दिसून येते. गीताची निवड, त्याचे सादरीकरण, मांडणी कशी असावी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. परीक्षक सागर राऊत यांनी मार्गदर्शन केले.

**स्पर्धेचा गटवार निकाल**

गट २ रा- पाचवी ते सातवी (ग्रामीण गट) प्रथम बाणलिंग विद्यालय, फोंडशिरस, द्वितीय श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील प्रशाला, नातेपुते, तृतीय गणेश विद्यालय, पिंपळनेर, चतुर्थ कृष्णानंद विद्यामंदिर पाटीलवस्ती, पाचवा (विभागून)- जि. प. प्राथमिक शाळा वेळापूर, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय वेळापूर. शहरी गट : प्रथम महर्षी प्रशाला, यशवंतनगर, द्वितीय जिजामाता कन्या प्रशाला, अकलूज, तृतीय सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज, आठवी ते दहावी : ग्रामीण गट ब : प्रथम श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील विद्यालय, मांडवे, द्वितीय माध्यमि क आश्रमशाळा, मोरोची, तृतीय (विभागून), पार्वतीबाई ननवरे हायस्कूल, खंडाळी व श्रीनाथ विद्यालय, लोंढे मोहितेवाडी, चौथा श्री समर्थ रामदास विद्यामंदिर, शिवथर.

**आठवी ते दहावी ग्रामीण गट-अ**

प्रथम क्रमांक सदाशिवराव माने विद्यालय, माणकी, द्वितीय श्री सावतामाळी विद्यालय, माळेवाडी, तृतीय श्री बाणलिंग विद्यालय, फोंडशिरस, चौथा श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील कन्या प्रशाला, नातेपुते, पाचवा श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील विद्यालय, कोथरुड.

# म्हैसगावच्या ओंकार शुगरचा ३,००१ दर जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २३ डिसेंबर-**

ओंकार शुगर कॉर्पोरेशन्स प्रा.लि. युनिट-६ म्हैसगांव ता. म ाढा या साखर कारखान्याचा गळीत हंगाम व्यवस्थितरीत्या सुरु झालेला आहे. मा. चेअरमन श्री. बाबुराव बोत्रे-पाटील साहेब यांनी गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये गळीतास येणाऱ्या ऊसास प्रती मे. टन दर रुपये ३००१ व गळीतास येणाऱ्या ऊसाचे प्रमाणामध्ये दिवाळी सणाकरीता मोफत साखर देणार असल्याचे जाहीर केले.

यामध्ये गळीतास येणाऱ्या उसास पहिला हप्ता रुपये २,८०० व नंतर दिवाळी सणाकरीता रुपये २०१ असे एकूण रुपये प्रती मे. टन ३,००१ ऊस दर देणार असल्याचे सांगितले. कारखानदारी चालवत असताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे व ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार यांचे वेळेवर पेमेंट करणार आहे. त्याचबरोबर कामगारांचा वेळेवर पगार, कारखान्याचे व्यापारी वर्ग व मालपुरवठादार यांची वेळेवर देणी देणार असून कर्जरुपी घेतलेल्या बँकेंचीही आज वेळेवर परतफेड करत असल्याने आज महाराष्ट्रात अल्पावधीतच ओंकार ग्रुप नावलौंकीकाला आले आहे. ओंकार ग्रुपची बाजारामध्ये उत्तम प्रकारची पत निर्माण झालेली असल्याने त्यामुळे अर्थरुपी मदत करायला बँका नेहमीच सहकार्य करतात.

कारखान्याचे जनरल मॅनेजर राम चंद्र गोविंद मखरे यांनी प्रास्ताविक करुन ऊस दर बाजार भाव जाहीर करुन शेतकऱ्यांना निवेदन दिले. यावेळी वर्क्स मॅनेजर-रविराज भोसले, केन मॅनेजर-सुनिल बंडगर, डिस्टीलरी मॅनेजर अनिल शेळके, प्रोडक्शन मॅनेजर अशोक खाडे व शेतकरी वर्गामधून दिलीप उबाळे, सतिश पाटील, शिवाजी राऊत, महादेव उबाळे, केशव गवळी, शिवाजी कोकरे, सतिश पवार, जोतिराम पवार, पांडुरंग जाधव, सुनिल कांबळे, दीपक केचे, संजय माने, सतिश हेगडकर, रोहितास ढोरे, रफीक कोरबू उपस्थित होते.

## दहिटणेच्या उपसरपंचपदी विकीबाबा चौधरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील दहिटणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी विकीबाबा चौधरी यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीवेळी आपल्या दहीटण ग्रामपंचायत



अध्यक्ष अधिकारी तथा सरपंच नितीन मोरे, विस्तार अधिकारी पंचायत समिती निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पंचायत समितीचे विस्तार अधिकारी आय. एम. पठाण, ग्रामपंचायत अधिकारी पी. एल. पवार, सरपंच नितीन मोरे, माजी सरपंच दौलत मोरे, माजी डेप्युटी सरपंच दिगंबर राजेगावकर, माजी कार्यकारी सरपंच चन्नविर बोधले, श्रीकांत चौधरी, पंडित मोरे, तंटामुक्त अध्यक्ष ताहिर शेख, धनाजी कांबळे, सतोष चौधरी उपस्थित होते.




## द. ह. कवठेकर प्रशालेस जीडीबी इंटरनॅशनल, पुण्याच्या रोटरी क्लबच्या वतीने मोफत रंग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ डिसेंबर-**

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द.ह.कवठेकर प्रशाला या शाळेस जीडीबी इंटरनॅशनल आणि पुण्याच्या रोटरी डिस्ट्रिक ३१३१ यांच्या माध्यम ातून संपूर्ण इमारतीच्या खोल्यास सुमारे तीन लाख ५० हजार रुपयांचा मोफत रंग उपलब्ध करून देण्यात आला.

याकामी जीडीबी पेंट्स अँड कोटिंग्स या आंतरराष्ट्रीय कंपनीने आपल्या सी.एस.आर. फंडातून रंग उपलब्ध करून दिला. पंढरपूर तालक्यातील अजून काही शाळांना देखील रंग उपलब्ध करून देण्यात येत आहे. याकामी रोटेरीअन धनंजय राजूरकर व चंद्रशेखर राजूरकर यांच्या पुढाकारातून रंगकामासाठी द. ह. कवठेकर प्रशालेची निवड केली. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या म ाजी गव्हर्नर मंजू फडके, ममता कोल्हटकर, मीनल देशपांडे, सचिन देशपांडे, धनंजय राजूरकर आणि एसएसआय पेंटच्या श्रुती कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

अनेक वर्षानंतर प्रशालेचे रंगकाम झाल्याने प्रशालेचा चेहरा बदलला असून वर्गातील वातावरण अधिक उत्साहवर्धक व पुरेसे प्रकाशमान झाल्यामुळे त्याचा अध्यापनावर अनुकूल परिणाम झाला असल्याची माहिती मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी यांनी दिली. संस्थेचे मानद सचिव एस. आर. पटवर्धन, अध्यक्ष नानामालक कवठेकर, चेअरमन वीणा जोशी, मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील, संस्थेचे प्रविण उत्पात यांनी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या सर्व सदस्यांचे ऋण व्यक्त केले.

## चंदशेखर विद्यालयात होणाऱ्या स्काऊट-गाईडच्या जिल्हा मेळाव्याची तयारी पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २३ डिसेंबर-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील चंद्रशेखर विद्यालयाच्या शैक्षणिक प्रांगणामध्ये जिल्हास्तरीय कब बुलबुल स्काऊट-गाईडचा जिल्हा मेळावा २६ ते २९ डिसेंबर या कालावधीत जि. प. शिक्षण विभाग, प्राथमिक, माध्यमिक व भारत स्काऊट-गाईड जिल्हा संस्था याच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून त्याची तयारी पूर्ण झाल्याची माहिती मेळावा संयोजक जिल्हा प्रशिक्षण आयुक्त शंकर यादव यांनी दिली.



यादव यांनी हा मेळावा चंदुशेखर विद्यालयाच्या भव्य प्रागणामध्ये होणाऱ्या मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद व खा. धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, संदीप कोहीनूरकर, वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे-ठोके, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, आबासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. राम दास देशमुख, कर्मयोगीचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, महाळुंग-श्रीपूर नपचे मुख्याधिकारी सतीश चव्हाण, क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार, नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा लक्ष्मी चव्हाण, शुभांगीताई देशमुख, डॉ. सुधीर पोफळे, जितेंद्र साळुंखे, पत्रकार मनोज गायकवाड, यशराज देशमुख, प्राचार्य पांडुरंग बनसोडे, मुख्याध्यापिका सुरेशा जाधव, प्राचार्य सुर्यवंशी उपस्थित राहणार आहेत. या कालावधीत रेड फ्लॉवर, कलख, शेकोटी, शोभायात्रा, ग्रॅन्ड कॅम्प फायर असे विविध कार्यक्रम घेणार असून ११ तालुक्यांतून सुमारे दोन हजार विद्यार्थी सहभाग घेणार आहेत. आबासाहेब देशमुख ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. देशमुख यांनी स्काऊट-गाईडचा जिल्हा मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्व सोयी, सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे सांगितले.

# रेणूक शिवाचार्य महास्वामींचे अध्यात्मिक कार्य प्रेरणादायी

**गुरूनाथ म्हेत्रे: मंद्रुपमध्ये रेणूक शिवाचार्य महास्वामीजींची द्वितीय पुण्यस्मरण**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २४ डिसेंबर-**

मंद्रुप येथील शिवयोगेश्वर मठाचे मठाधिपती रेणूक शिवचार्य महास्वामी यांनी लिंगायत धर्माच्या प्रचार व प्रसारासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. लिंगायत धर्मप्रसार व जगदगुरूंचे धार्मिक कार्यक्रम असल्यास महास्वामी यशस्वी करायचे. मंद्रुप येथील शिवयोगेश्वर मठाच्या वैभवात भर टाकण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. पाचही जगदगुरूंचे जवळचे ते होते. अध्यात्मिक क्षेत्रात कार्य अविस्म रणीय असल्याचे प्रतिपादन माजी सभापती गुरुनाथ म्हेत्रे यांनी केले.

मंद्रुप येथील रेणूक शिवाचार्य महास्वामींजी यांच्या द्वितीय पुण्यस्मरण अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माळकवठे मठाचे श्री पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी, नागणसूरचे श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी, गुड्डापूरचे गुरूपाद शिवाचार्य, मंद्रुपचे निरंजन देवरु, माजी सरपंच पिरप्पा म्हेत्रे, ग्रामपंचायत सदस्य शिवपुत्र जोडमोटे, राष्ट्रवादी ज्येष्ठ नागरिक तालुकाध्यक्ष शिवानंद हिरेमठ, वेदमूर्ती बसवराज हिरेमठ, संगम नाथ हिरेमठ, गुरुनाथ जोडमोटे, राम जोडमोटे, होनमुर्गी सोसायटीचे चेअरमन बसवराज हसापुरे, होनमुर्गी माजी उपसरपंच राजकुमार कोळी, विश्वनाथ हिरेमठ, सतीश मेंडगुदले, गौरीशंकर मेंडगुदले, गंगाधर हिरेमठ, मरुळाराध्य हिरेमठ, मंजुनाथ हिरेमठ, ग्रामसेवक शैलेश मुंजे, नागेश जोडमोटे, भीमाशंकर घाटे, राम जकुणे, धानपा मेंडगुदले, बाबुराव हक्के, संतोष शिंगाडे, रामचंद्र वाडकर, सुरेश मेंडगुदले, राजकुमार वाडकर, मल्लिनाथ शास्त्री, राजकुम ार उंबरजे, अप्पासाहेब मेंडगुदले, अक्षय वाडकर, सुभाष जोडमोटे, सुरेश जोडमोटे, महादेव जकुणे उपस्थित होते. यावेळी महाप्रसाद वाटप करण्यात आले.



**मल्लिकार्जून मंदिरात अभिवादन**

रेणूक शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांचे द्वितीय पुण्यस्मरणनिमित्त कपिलसिद्ध मल्लिकार्जुन युवक सेवा संघाच्या वतीने श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिर येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य शिवपुत्र जोडमोटे, निलेश जोडमोटे, शेखर स्वामी, रेवणसिध्द जोडमोटे, सातप्पा जोडमोटे, सिध्दलिंग जोडमोटे, रमेश जोडमोटे, महादेव जोडमोटे यांच्यासह सर्व जोडमोटे परिवारातील सदस्य उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### बँक ऑफ महाराष्ट्रच्या स्वयं सहायता गट क्रेडिट लिंकिंग कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

सोलापूर झोन: स्वयं सहायता गट (SHG) क्रेडिट लिंकिंग कार्यक्रम नियोजन भवन धाराशिव येथे यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमाला २२० हून अधिक महिला सदस्य, तसेच MSRLM व MVIM संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.११ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत सुरू असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या स्वयं सहायता गट क्रेडिट लिंकिंग अभियानाअंतर्गत सोलापूर झोनने ४२५ गटांच्या खात्यांसाठी एकूण १८ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. यापैकी २१ डिसेंबर २०२४ पर्यंत १३.३० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले असून उर्वरित रक्कम ३१ डिसेंबरपूर्वी वितरित केली जाणार आहे. बँक ऑफ महाराष्ट्रचे सोलापूर झोनचे विभागीय व्यवस्थापक संजीव कुमार यांनी गटातील सदस्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी बचत, क्रेडिट लिंकिंग, कर्जाच्या वेळेवर परतफेडीचे महत्त्व आणि सामाजिक सुरक्षा योजनांच्या लाभांविषयी माहिती दिली.

### शिक्षकांच्या राज्य निबंध स्पर्धेत नूमविच्या नर्मदा कनकी प्रथम

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**



यशवंतराव चव्हाण सेंटर, शिक्षण विकास मंच यांच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या राज्य निबंध स्पर्धेत नू.म.वि. मराठी शाळेच्या नर्मदा नरेश कनकी या प्रथम आल्या. या निबंध स्पर्धेसाठी अशैक्षणिक कामे नसतील तर शिक्षक म्हणून आत्तापेक्षा अधिक मी काय-काय करू शकेन? आणि शिक्षकांना कोणत्या गोष्टीचे स्वातंत्र्य हवे आणि का? या दोन विषयावर घेण्यात आलेल्या या स्पर्धेत त्यांनी हे यश मिळविले. या स्पर्धा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ.वसंत काळपांडे आणि धनवंती हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ रविवार ५ जानेवारी रोजी शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण सेंटर आयोजित पंधराव्या शिक्षण परिषदेत मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबईत होणार असल्याचे शिक्षण विकास मंचचे मुख्य समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी यांनी सांगितले.



### राजकुमार सुरवसे यांच्याकडून मंत्री प्रताप सरनाईक यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

राज्याच्या परिवहन मंत्रीपदी निवड झाल्यानंतर परिवहन मंत्री प्रतापशेठ सरनाईक यांचा येथील सुर्या ग्रुपचे संस्थापक राजकुमार सुरवसे यांच्याकडून नागपूर येथे सत्कार करण्यात आला. यावेळी राजन चिंचोरे आणि सुरवसे मित्र परिवार उपस्थित होता. विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाल्यानंतर ठाणे जिल्ह्यातील ओवळा माजीवाडा मतदारसंघातून निवडून आलेले सरनाईक यांना कॅबीनेट मंत्री म्हणून निवडण्यात आले.

### शिवनगी येथे २२ वर्षीय विवाहित तरुणीने औषध पिवून केली आत्महत्या

**मंगळवेढा, दि. २३ डिसेंबर-**

शिवनगी येथील नवतरुण २२वर्षीय विवाहितेने डाळींब बागेतील तणनाशक मारण्याचे औषध पिवून आत्महत्या केल्याची घटना घडली असून याची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे. पोलीसांनी दिलेली माहिती अशी, शिवशंकर सुर्यकांत बंडगर (वय २७, रा. शिवनगी) हे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी म्हणून मंगळवेढा पोलीस ठाणेत काम करीत आहे. त्यांचा भाऊ हणमंत याचे लग्न २०१६मध्ये झाले असून मयत मधुमती हणमंत बंडगर हे त्यांच्या दोन मुलासह जुन्या घरी रहावयास आहेत. त्यांच्यात घरगुती कारणावरुन नेहमी वाद होत असे. त्यांची सामाईक डाळींब बागाईत शेती असून त्यांच्याकडे औषधे कायम घरी असत. २२ डिसेंबरला दुपारी २ वाजता खबर देणारे मंगळवेढा येथे असताना लहान भावाचा फोन आला. मयत मधुमती हिने औषध पिले आहे. तिला उमदी (जि. सांगली) येथे म्हेत्रे हॉस्पिटल घेवून गेले. खबर देणारे हॉस्पिटलमध्ये आल्यावर मयत मधुमती ही शुध्दीवर दिसली. त्यावेळी तिच्यावर उपचार चालू होते. आई शिवम्मा हिच्याकडे मधुमतीने औषध पिणेबाबत विचारपूस केली असता तिने नवरा बायकोच्या झालेल्या घरगुती वादामुळे डाळींब बागेतील तण मारण्याचे औषध पिले असल्याचे सांगितले. तेथील डॉक्टरांनी पुढील उपचाराकरिता संजिवीनी हॉस्पिटल मंगळवेढा येथे घेवून जावा असे सांगितल्याने मयत मधुमती हिस खाजगी वाहनाने आणून तेथे दाखल केले. येथील डॉक्टरांनी तपासून ती पहाटे ४.३० वाजता मयत झाल्याचे सांगितले. तद्नंतर मयताचे प्रेत घेवून शिवनगी येथे घरी आलो. डाळींब बागेतील तण मारण्याचे औषध पिल्याने ती मयत झाली असावी असे शिवशंकर बंडगर यांनी दिलेल्या खबर मध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### ख्रिसमस वंडरलँड सर्वात मोठा नाताळ सोहळा

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

फिनिक्स मार्केटसिटी पुणे,नाताळच्या जादूची पखरण करण्यास सज्ज आहे.१४ डिसेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ दरम्यान,फिनिक्स मार्केटसिटी घेऊन येत आहे ख्रिसमस वंडरलँड,जिथे सणाचा उत्साह,आनंद आणि अविस्मरणीय अनुभवांची मेजवानी मिळणार आहे.चमचमणाऱ्या ४० फूट उंच ख्रिसमस ट्रीसह,मनमोहक कॅरोल गाणी,लाइव्ह शो,रोमांचक खेळ,आणि आकर्षक ख्रिसमस मार्केटमुळे प्रत्येकाला या ठिकाणी आनंद लुटता येणार आहे.

# उजनी पर्यटन विकास आराखड्यातील बोटींची निविदा दोन दिवसात निघणार!

**● उजनी पर्यटन प्रकल्प उभारणीद्वारे अनेकांना रोजगार ● जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**





जिल्ह्यासह राज्यातील पर्यटन विकासाला चालना देण्याबरोबरच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण परिसरातील २८२ कोटी ७५ लाख रुपयांच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याला सप्टेंबर २०२४ मध्ये म्हणजे निवडणूक आचारसंहितेच्या अगोदरच मंजुरी मिळाली होती. याच्या प्रत्यक्ष कामाला आता लवकरच सुरूवात होणार असून, प्रारंभी या जलाशयात चालविण्यात येणाऱ्या विविध स्वरूपाच्या प्रवाशी बोटींची निविदा येत्या २ दिवसात काढण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. २३) दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना दिली.

उजनीच्या या विकास आराखड्याला मंत्रीमंडळ स्तरानंतर शिखर समितीनेही मान्यता दिली असल्याने जिल्ह्यातील अनेक युवकांना रोजगार प्राप्त होणार असल्याचेही संकेत त्यांनी दिले. उजनी एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याला मान्यतेसाठी गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली होती. आराखड्यात धार्मिक पर्यटनासाठी २५ कोटी, जल पर्यटनासाठी १९०.१९ कोटी, कृषी पर्यटनासाठी १९.३० कोटी, विनयार्ड पर्यटनासाठी ४८.२६ कोटी रुपयांची तरतूद आहे. सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यांतर्गत कोयना हेळवाक वन झोनच्या वाढीव ६७.८५ कोटी रुपयांच्या कामासह लोणार सरोवर विकास आराखड्यांतर्गत मंजूर कामांवरील वाढीव ६४.८३ कोटी रुपयांच्या मागणीला सुध्दा तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीने मान्यता दिली होती. या कामासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही विशेष लक्ष दिले होते. यामुळे सोलापूरकरांचे हे उजनी पर्यटनाचे स्वप्न लवकरच मार्गी लागून राज्यातील पर्यटन विकासालाही गती मिळणार आहे. यातून सोलापूरच्या हजारो युवकांना या उजनी पर्यटन स्थळी रोजगाराची संधीही उपलब्ध होणार आहे.

#### जिल्हावासियांचे अनेक वर्षाचे स्वप्न होणार साकार

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सुक्ष्म अभ्यास केला आणि आ. संजयमामा शिंदे यांच्या सहकार्यातून हा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे ध्येय ठेवले होते. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी वारंवार बैठका, मॅपिंग करून सुक्ष्म आराखडा केला होता. हा आराखडा शासन दरबारी ठेवल्यानंतर माजी आ. संजयमामा शिंदे यांनी राजकीय वजन वापरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून या प्रस्तावाला गती दिली होती आणि आता शिखर समितीने मान्यता दिल्याने येत्या काही दिवसात या प्रकल्पाला सुरूवात होणार असल्याने सोलापूर जिल्हावासियांनी अनेक वर्षांपासून पाहिलेले स्वप्न साकार होणार आहे.



# रसिक श्रोत्यांनी घेतला 'बकेट लिस्ट'चा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**


मेंडोलीन, गिटार, सिंथेसायजर, व्हायोलिन, मेलोडिका, माऊथ ऑर्गन अशा भन्नाट इन्स्ट्रुमेंट्सवरील जुन्या हिंदी चित्रपटगीतांची मैफिल असणाऱ्या 'बकेट लिस्ट' या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद रसिक श्रोत्यांनी घेतला. विजापूर रोड सोरेगांव येथील ब्रिजधाम आश्रमात 'सार' ग्रुपच्या वतीने हा कार्यक्रम पार पडला.

राजन कंपली यांनी गिटारवर 'हसता हुआ नूरानी चेहरा, आजा आयी बहार' तसेच मेंडोलिनवर 'गुलाबी आँखें, चुरा लिया है तुमने' वाजवत रसिकांची दाद मिळवली. व्हायोलिनवरील 'सायोनारा' ने त्यांनी 'बकेट लिस्ट' या मैफिलीचा गोड समारोप केला. आदित्य गाडगीळ यांनी आपल्या निवेदनातून या जुन्या हिंदी चित्रपटगीतांच्या निर्मितीमागील किस्से उलगडले. ब्रिजधाम आश्रमाचे संस्थापक फोफलिया यांनी सर्व कलाकारांचे कौतुक केले. यावेळी प्रा. डॉ.अभय गौर, प्रा. माने, निवृत्त पोलिस अधिकारी सुहास माने, रामचंद्र सामल, बीना जोशी, पुष्पा सांगळे, अशोक तांबोळी, स्मिता जेऊरकर,डॉ. मीनल जेऊरकर, मुकुंद भडंगे, अभिजित भडंगे, प्रा. वैभव कुलकर्णी, विजय जाधव, रवी कोळी, गौरव कुलकर्णी उपस्थित होते.

# अखेर कांद्याचा वांदा मिटला; बाजार समितीत कांदा लिलावास सुरुवात

**● बाजार समितीत कांदा दर अव्वल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ डिसेंबर**



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचे पडसादानंतर माथाडी कामगारांनी आंदोलन मागे घेतल्यानंतर सोमवारी कांदा लिलाव सुरळीत झाला. पहाटे पाच वाजता कांद्याचा काटा, त्यानंतर सकाळी दहा वाजता कांद्याचे लिलाव पार पाडण्यात आले. या लिलावात कांद्याला किमान ३०० ते कमाल ४५२५ तर सर्वसाधारण १८०० रुपये प्रति क्विंटल इतका दर मिळाला. बाजार समितीत एकूण ४७२ ट्रक मधून सुमारे ४७ हजार २१६ क्विंटल कांदा विक्रीसाठी दाखल झाला होता.

कामबंद आंदोलनामुळे शेतकऱ्यांचा कांदा दोन दिवस बाजार समितीमध्ये पडून होता. प्रशासक मोहन निंबाळकर यांनी माथाडी कामगार व्यापारी यांची संयुक्त बैठक घेऊन कारवाई करण्याचा इशारा दिल्यानंतर कामगारांनी बंद मागे घेतला. शेतकऱ्यांनी बाजारपेठेत विक्रीसाठी आणलेला कांदा उतरवणे, कांद्याचा काटा करणे, लिलाव करून लोडिंग करणे या काम काजासह सुरुवात झाली. पहाटे पाच वाजता कामगार रुजू झाले. दुपारपर्यंत ८० टक्के तर उर्वरित २० टक्के कांदा रात्री व्यापाऱ्यांकडे पाठवण्यात आला.

वातावरणात बदल झाल्याने, आभाळ येऊन कांदा खराब होऊ नये या भीतीपोटी शेतकरी बाजारपेठेत कांदा मोठ्या प्रमाणात आणत आहेत. इथून पुढे आवक वाढेल दर मात्र स्थिर राहतील अशी शक्यता आहे.

**- सादिक बागवान, अडत व्यापारी कृषी उत्पन्न बाजार समिती**

सध्या राज्यात सोलापूर बाजार समितीमध्ये कांद्याला सर्वाधिक दर मिळत आहे. लाल कांद्याला ३ हजार रुपये दर मिळत आहे. तर गर्वा कांद्याला ४५२५ रुपये इतका उच्चांकी दर मिळत आहे. लहान कांद्या देखील दोन हजार रुपयापर्यंत दर मिळत आहे. सर्व बाजार समितीमधील माहिती संकलित केली असता, सध्या राज्यामध्ये हा दर अव्वल मानला जात आहे.

**- दत्तात्रेय सूर्यवंशी, सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती**

कांदा लिलावात कांद्याला कमी दर मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु कांद्याला चांगला दर मिळाला आहे. लहान कांद्याला मागणी असल्यामुळे दर योग्य मिळाला.

**- शशी पाटील, कांदा उत्पादक शेतकरी**



# जुनी पेन्शन मिळण्यासाठी प्रयत्न करू

**पद्मशाली शिक्षण संस्थेच्या सत्कार कार्यक्रमात आ. देवेंद्र कोठे यांचे आश्वासन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

शंभर वर्षापूर्वी समाज तेलंगणातून सोलापुरात व देशाच्या विविध भागात स्थायिक झाले. समाजासाठी शाळा सुरु केल्या. परंतू शाळा टिकविणे व त्याचे विस्तारीकरण करणेही फार मोठी अभिमानास्पद गोष्ट आहे. माझे आजोबा तात्यांनी मला सांगितले होते की, समाजातील मुलांना पश्चिम भागातील शाळामध्ये प्रवेश मिळत नव्हता. त्यामुळे समाजाला शाळा सुरु कराव्या लागल्या. आज या संस्थेत पदवी पर्यंतचे शिक्षणाची सोय आहे.

यापुढे मेडिकल कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेज सुरु करण्यासाठी तुम्ही प्रयत्न करावा व मी तुमच्याबरोबर आहे, आता मोठे स्वप्न बघू, त्यासाठी प्रयत्नही करु, मेडिकल कॉलेज सुरु केलं तर आज समाजाची त्यासाठी लागणारे श्री मार्कंडेय रुग्णालयही आहे. दोघांमध्ये समन्वय असेल तर काहीही होऊ शकतं. त्यासाठी मी काम करुन घेईन. बऱ्याच काळापासून मागणी असलेली शिक्षकांसाठी जुनी पेन्शन योजनेसाठीही प्रयत्न करेन, असे आश्वासन आमदार देवेंद्र कोठे यांनी व्यक्त केले.

पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघातून निवडून आलेले नूतन आमदार देवेंद्र राजेश कोठे यांच्या समाजकार्याची अभिव्यक्ती, त्यांच्या कार्याची पोच पावती म्हणून सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम हे अध्यक्षस्थानी होते. सचिव दशरथ गोप यांच्या हस्ते सत्कारमूर्ती आमदार कोठे यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, विश्वस्त सर्वश्री. पांडुरंग दिड्डी, दिनेश यन्नम, नागनाथ गंजी, श्रीधर चिटयाल, व्यंकटेश आकेन, मधुकर कट्टा, संगीता इंदापुरे, गणेश गुज्जा, श्रीनिवास जोग, रमेश बोध्दूल, नरेश श्रीराम, अंबादास गज्जम, निलेश सरगम, मुख्याध्यापक युवराज मेटे, गीता सादूल, शारदा गोरटयाल, श्रीनिवास चिप्पा, अजिता पिल्लाई, रसिका किल्लेदार, पुलकेशी संगा, व्यंकटेश पोटाबत्ती, नागेश खुने, मंजुळा कुडक्याल, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, बाळकृष्ण गोटीपामूल, उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम, मधुकर धर्मसाले, आदी उपस्थित होते. विश्वस्त श्रीधर चिटयाल यांनी आभार मानले.

# डॉ.आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना कार्यान्वित

**● योजनेबाबत श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनात केली जातीय जनजागृती**
**● शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेण्याचे कृषीविभागाचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या अनुदानात शासनाकडून भरघोस वाढ करण्यात आली आहे. या दोन्ही योजनेतून पात्र लाभार्थ्यांना नवीन विहीर खोदण्यासाठी यापूर्वी अडीच लाखाचे अनुदान देण्यात येत होते. आता त्यामध्ये वाढ करण्यात आली आसून, ते अनुदान चार लाख रुपये करण्यात आले आहे. जुनी विहीर दुरुस्तीसाठी यापूर्वी ५० हजाराचे अनुदान देण्यात येत होते. ते आता एक लाख करण्यात आले आहे. यापूर्वी या दोन्ही योजनेतील लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा दीड लाख रुपये, तर दोन विहिरीतील अंतर ५०० फुटापेक्षा जास्त नसावे या दोन्ही अटी शासनाने ३ डिसेंबर रोजी काढलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना काढून शिथिल केल्या आहेत.

दरम्यान, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना ही अनुसूचित जमाती (आदिवासी) प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी राबविली जाते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ही अनुसूचित जाती (नवबौध्द प्रवर्गातील) शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येते. या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया निरंतर सुरू राहणार आहे.



#### योजनेसाठी हे शेतकरी पात्र असतील

- लाभार्थी शेतकरी हा अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती- नवबौद्ध प्रवर्गातील असणे आवश्यक.
- शेतकऱ्याकडे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे बंधनकारक.
- शेतकऱ्याच्या नावे जमीन धारणेचा सातबारा दाखला व आठ अ उतारा असणे आवश्यक.
- लाभार्थ्यांचे आधारशी संलग्न बँक खाते असणे आवश्यक, दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य.
- लाभार्थी शेतकऱ्याकडे किमान ०.४० हेक्टर व कमाल सहा हेक्टर इतकी एकत्रित जमीन असणे आवश्यक.

**शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम :** नवीन सिंचन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण, इनवेल बोरिंग, वीज जोडणी आकार, डिझेल विद्युत पंप संच, सोलार पंप, एचडीपीई पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, तुषार सिंचन पूरक अनुदान, ठिबक सिंचन पूरक अनुदान, बैल ट्रॅक्टर चलित यंत्रसामग्री, परसबाग, विंधन विहीर.

**श्रीसिद्धेश्वर कृषी प्रदर्शनात उभारले स्टॉल :** शेतकरी कल्याणाच्या या दोन्ही योजनांसाठी पात्र लाभार्थ्यांनी संपूर्ण कागदपत्रांसह शासनाच्या महाडीबीटी या शासकीय पोर्टलच्या संकेतस्थळावर अर्ज करावेत. योजनेसंदर्भात काही अडचणी- शंका असल्यास अधिक माहितीसाठी पंचायत समिती स्तरावर तालुका कृषी अधिकारी तर जिल्हा स्तरावर सोलापूर जिल्हा परिषद कृषी विभागाशी संपर्क साधावा. तसेच श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनात या योजने संबंधी जनजागृती करण्यासाठी स्टॉल्स उभारले आहे. येथे शेतकऱ्यांनी या संदर्भात माहिती घ्यावी असे, आवाहन करण्यात येत आहे.

**- हरिदास हावळे, कृषी विकास अधिकारी सोलापूर जिल्हा परिषद**

**पात्र शेतकऱ्यांना करणार जनजागृती :** अनुसूचित जाती जमाती व नवबौद्ध घटकातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासनाच्या वतीने बिरसा मुंडा कृषी क्रांती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन या दोन्ही योजना राबविण्यात येत आहेत. या कल्याणकारी योजनेचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांनी घ्यावा. यासाठी जिल्हास्तरावर व तालुका स्तरावरून पात्र शेतकऱ्यांना प्रबोधन करण्याच्या सूचना जिल्हा कृषी विकास अधिकारी व तालुका कृषी विकास अधिकारी यांना दिल्या आहेत.

**- संदीप कोहिनकर, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर**

# २६ डिसेंबरपासून दिव्यांगांना सहाय्यक उपकरणांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**

इंडियन ऑइल कॉर्पोरेशन व भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम मुंबई (अलिम्को) यांच्या वतीने सोलापूर शहर व जिल्ह्यातील दिव्यांगांना सहाय्यक उपकरणांचे मोफत वाटप करण्यात येणार असून त्यासाठी २६ ते २८ डिसेंबरपर्यंत कर्णिकनगर येथील नॅबच्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रात सकाळी दहा ते दुपारी चार वाजेपर्यंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

दिव्यांगांनी या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांनी केले आहे. जिल्हा परिषद समाजकल्याण कल्याण विभाग व नॅब संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांनी या शिबिराचे आयोजन केले असून अंध, कर्णबधिर,अस्थिव्यंग प्रवर्गातील ३०० लाभार्थ्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार सहाय्यक उपकरणाचे मोफत वाटप करण्यात येणार आहे कागदपत्रे असतील तरच तपासणी करण्यात येईल.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आंतरभारती स्नेहमिलन मेळाव्याचे उद्या आयोजन

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

आंतरभारती शाखा सोलापूरच्या वतीने बुधवार दि. २५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता नागेश करजगी ऑर्चिड स्कूल जुनी मिल कंपाऊंड सोलापूर येथे आंतरभारती स्नेहमिलन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष प्राचार्य सुभाष शास्त्री यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मेळाव्याचे उद्घाटन महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आंतरभारती ट्रस्टचे अध्यक्ष पांडुरंग नाडकर्णी हे भूषवणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू इरेश स्वामी हे उपस्थित राहणार आहेत तर आंतरभारती ट्रस्टच्या उपाध्यक्ष संगीता देशमुख, कार्याध्यक्ष अमर हबीब, सचिव डी. एस. कोरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

याप्रसंगी उदगीरचे शिवलिंग मठपती यांचा सत्कार करण्यात येणार आहे. दुपारच्या सत्रात स्वातंत्र्य चळवळीत सोलापूरचे योगदान या विषयावर श्रीकांत येळेगावकर हे मार्गदर्शन करणार आहेत. द्वितीय सत्रात सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. यावेळी शहरातील काही शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. त्यानंतर खुले अधिवेशन होऊन या मेळाव्याचा समारोप करण्यात येणार असल्याचेही यावेळी प्राचार्य शास्त्री यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस अरुण धुमाळ, सुनील व्हसाळे, प्राचार्य प्रेमचंद मेने , डॉ. अमिता जावळे आदी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...




### संध्या धर्माधिकारी यांच्या 'रकमा' या कथा संग्रहाला द्वितीय पुरस्कार

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

मराठा मंदिर साहित्य शाखा मुंबई ही मराठी साहित्य विश्वाला समर्पित अशी चळवळ आहे. या शाखेच्या वतीने प्रतिवर्षी नवोदित साहित्यिकांच्या प्रथम प्रकाशित साहित्यकृतीला यथोचित पुरस्काराने गौरविण्यात येते. येथील ग्रामीण कथा लेखिका संध्या सूर्यकांत धर्माधिकारी यांच्या 'रकमा' या ग्रामीण कथा संग्रहाला कॅलेंडर वर्ष २०२३साठी प्रथम प्रकाशनाचा द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी जेष्ठ साहित्यिक व मनोविकार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी, मराठा मंदिर कार्याध्यक्ष नितीन विचारे, प्रदीप विचारे, उपकार्याध्यक्ष दिपक देशमुख, दिलीप चव्हाण आदी मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. सौ. धर्माधिकारी यांच्या रकमा या कथासंग्रहला मिळालेला हा नववा राज्यस्तरीय पुरस्कार आहे.

### लाईट बिल देण्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

जुळे सोलापूर येथे लाईट बिल देण्याच्या कारणावरून आकाश चव्हाण यांनी मारहाण केल्याने रोहित रमेश साळुंखे (वय-२७, रा. कल्याण नगर भाग ३, जुळे सोलापूर) हा जखमी झाला. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

### इसमाकडून विषारी द्रव्य प्राशन

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

अज्ञात कारणावरून डास मारण्याचे लिक्विड प्राशन केल्याने दीपक विश्वनाथ गायकवाड (वय-५५, रा. कोंतम चौक, धाकटा राजवाडा) यांना त्रास होऊ लागला. त्यांना उपचारासाठी सिव्हिलमध्ये दाखल केले.

### अज्ञात कारणावरून तरुणाने प्राशन केले लिक्विड

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

अज्ञात कारणावरून अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील विवेक स्टील फर्निचर सत्यविजय मंगल कार्यालय येथे लिक्विड पिल्याने सलमान हमीबा (वय-२७, रा. एमआयडीसी) याला त्रास होऊ लागला. त्याला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

### किराणा दुकानातील उधारीच्या वादातून मारहाण

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

पापनास येथील किराणा दुकानात मागील मालाच्या उधारीच्या वादातून दशरथ सोनवणे यांनी मारहाण केल्याने इम्रान शेख (वय २४, रा. पापनास तीर्थ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

### शेतीच्या वादातून मारहाण

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

मोहोळ तालुक्यातील कातेवाडी येथे शेतीच्या वादातून विकास साळुंखे व इतर एकाने मिळून मारहाण केल्याने मुक्ताबाई प्रताप साळुंखे (वय १९, रा. कातेवाडी, ता. मोहोळ) या जखमी झाल्या. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

### गरम पाणी पडल्याने जखमी

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

गरम पाणी अंगावर पडल्याने दिव्या राजू कासनेद (वय-८,रा.दहिटणेवाडी,ता.अक्कलकोट) ही भाजली. तिला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

### शिवगंगा नगर येथून टिप्पर पळवला

**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

पारशी विहीर लगत असलेल्या शिवगंगा नगर भाग १ येथे या फिर्यादी जफर अमिन शेख (वय-२९,रा.मुस्लिम पाच्छा पेठ) यांचा टाटा कंपनीचा टिप्पर क्रमांक एमएच.४२.बीएफ.०४४५ हा वरील ठिकाणी वरील ठिकाणाहून कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. ही घटना २२ डिसेंबर रोजी घडली.याप्रकरणी जफर शेख यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# पहिल्याच अधिवेशनात चमकले नवखे आमदार

## कोठे, जानकर, पाटील, खरे, देशमुखांनी मांडले प्रश्न तालुक्यातील समस्यांकडे वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

**नुकतेच नागपूर येथे पार पडलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सोलापूर शहर-जिल्ह्यातील नवख्या आमदारांनी आपल्या मतदारसंघातील महत्वाच्या समस्या मांडून पहिल्याच अधिवेशनात आमदारकीची चमक दाखवली आहे. विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदाच निवडून आलेल्या आमदारांनी मतदारसंघाच्या विकासाचे प्रश्न मांडल्याने मतदारांमधून देखील आता त्यांच्या बद्दलच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मतदारसंघाच्या विकासाबाबत नवखे आमदार किती अलर्ट राहून काम करतील, याकडे सर्वांचेच लक्ष लागलेले आहे.**







सोलापूर शहर मध्य मतदारसंघातून भाजपाचे देवेंद्र कोठे, मोहोळ मतदारसंघातून शरद राष्ट्रवादीचे राजू खरे, माढ्यातून शरद राष्ट्रवादीचे अभिजित पाटील, माळशिरसमधून शरद राष्ट्रवादीचे उत्तम जानकर आणि सांगोल्यातून शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख हे सोलापूर जिल्ह्यातील पाच आमदार यंदा पाहिल्यांदाच विधानसभेत पोहचले आहेत. पाचपैकी जानकर वगळता उर्वरित चार आमदार युवा आहेत. यंदा पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी अनेक दिग्गजांना घरी बसवले तर अनेक नवख्यांना विजयी केले आहे.

नागपूर येथे १६ ते २१ डिसेंबर या कालावधीत पार पडलेल्या यंदाच्या पहिल्याच हिवाळी अधिवेशनात सोलापुरातील नवख्या आमदारांनी आपल्या मतदारसंघातील नागरी समस्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. भाजपाचे देवेंद्र कोठे यांनी सोलापूरकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला हात घातला. उजनी ते सोलापूर समांतर दुहेरी जलवाहिनीच्या रखडलेल्या कामाबाबत सभागृहाचे लक्ष वेधले. उजनी धरणात शंभर टक्के पाणी भरलेले असतानाही सोलापूरकरांना चार ते पाच दिवसातून एकदा म्हणजेच आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा होतो. उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम महापालिका प्रशासनाच्या अकार्यक्षमतेने रखडले असल्याचेही परखड मत कोठे यांनी विधिमंडळ सभागृहात मांडले. कोठे यांच्या या प्रश्नामुळे सोलापूरकरांना किमान एक दिवसाआड तरी पाणीपुरवठा लवकरच होईल, अशी अपेक्षा तूर्तास बाळगण्यास हरकत नाही. पण जोपर्यंत महापालिका आयुक्त आणि प्रशासनाच्या मनात येत नाही तोपर्यंत हे शक्य देखील नाही ही देखील वस्तुस्थिती आहे.

मोहोळचे आ. राजू खरे यांनी पहिल्याच अधिवेशनात अनगर अपर तहसील कार्यालय रद्द करण्याची मागणी केली. विशेष म्हणजे यंदाची मोहोळ विधानसभेची निवडणुक प्रामुख्याने या मुद्द्याभोवती फिरली होती. तर राजू खरे हे लक्ष्मीपूत्र असल्याने त्यांच्याा गंगेत अनेकांनी हात धुवून घेतल्यामुळे देखील खरे यांचे आमदारकीचे स्वप्न पूर्ण झाल्याची चर्चा तालुक्यातून सुरु आहे. तरी देखील खरे यांनी मोहोळचा महत्वाच्या प्रश्नाकडे विधिमंडळ सभागृहाचे लक्ष वेधले. सभागृहात प्रवेश करतानाही खरे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा घेवूनच प्रवेश केला.

माढ्याचे आ. अभिजित पाटील यांनी पहिल्याच अधिवेशनात जिव्हाळ्याचा मराठा आरक्षणाचा प्रश्न, तालुक्यात एमआयडीसी उभारणीची मागणी, सीना-माढा उपसा सिंचनात तालुक्यातील उर्वरित गावांचा समावेश करावा, ऊसाला चांगला भाव आणि शेतीमालाला एमएसपी मिळण्याचीही मागणी करत आ. पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

माळशिरसचे आ. उत्तम जानकर यांनी मारकडवाडी येथे बॅलेट पेपरवर चाचणी मतदानाचा प्रयोग करण्याचा प्रयत्न करून संपूर्ण देशाचेच लक्ष वेधून घेतले होते. परंतु प्रशासनाने परवानगी नाकारल्याने हा प्रयोग होवू शकला नव्हता. विधिमंडळ अधिवेशनात देखील आ. जानकरांनी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याच्या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधल्याचे दिसून आले.

सांगोल्याचे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगोला तालुक्यातील समस्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधताना तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि गुंडगिरी याकडेही सरकारचे लक्ष वेधले. विशेष म्हणजे कायम दुष्काळी अशी ओळख असलेल्या सांगोला तालुक्यात अवैध वाळू उपसा होत असल्याने आश्चर्य व्यक्त झाले. चारा छावणीची थकीत बिले मिळण्यासह तालुक्यातील नागरी समस्यांकडे देखील आ. देशमुखांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

जिल्ह्यातील पाच नवख्या आमदारांनी पहिल्याच अधिवेशनात चुणूक दाखवल्याने ते मतदारांच्या चर्चेचे विषय झालेले दिसत आहेत. तर अनुभवी आमदारांना देखील आता आपल्या मतदारसंघातील विकास कामांसाठी आवाज उठवावा लागणार आहे. कारण नवखे आमदार सभागृहात तालुक्यातील समस्या मांडतात तर मग अनुभवी आमदारांचे मौन का? अशीही तुलना होणार आहे. सोलापूर शहर-जिल्ह्याचा विकास होण्यासाठी जिल्ह्यातील ११ आमदारांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविण्याची गरज असल्याचे नागरिक बोलत आहेत. आता आमदारांच्या कामाचा मतदार लेखा-जोखा करणार हे मात्र नक्की.

### जिल्ह्यातील रखडलेले प्रकल्प

उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी, शहरातील दोन आणि जिल्ह्यातील काही उड्डाणपूल, उपसा सिंचन योजनेची रखडलेली कामे, पंढरपूर विकास आराखडा. नमामी चंद्रभागा, उजनीतील पाणी पिण्यासाठी धोकादायक, उजनी धरणावरील पर्यटन, श्री विठ्ठल मंदिर कॉरिडोर, ११ तालुक्यातील सर्व गावांपर्यंत पाणी पोहचवणे आणि सिंचन क्षमता वाढवणे, नद्यांवर काही ठिकाणी बॅरेजेस, अवैध वाळू उपसा आणि नद्यांचा ऱ्हास, पंढरपूर-अक्कलकोट-सिध्देश्वर मंदिर यासह तुळजापूर या धार्मिक स्थळांचे सर्किट करून धार्मिक पर्यटनाला चालना देणे, जिल्ह्यात हुरडा महोत्वस व पर्यटन वाढविणे, बोरामणी येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि होटगी विमानतळावरून विमानसेवा सुरु करणे ही प्रमुख विकासकामे रखडलेली आहेत.

# 'त्या' विमानांच्या पेट्रोल पंपासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून शर्तीचे प्रयत्न सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

प्रवासी विमान वाहतूक सेवेसाठी लागणाऱ्या महत्वाच्या आणखी दोन एनओसी बाकी असल्याने २३ डिसेंबरला चालू होणारी प्लाय ९१ ची विमानसेवा जानेवारी महिन्यात सुरू होणार असल्याचे संकेत मिळत असून, ही विमानसेवा चालू करण्यासाठी सोलापूर येथे विमानासाठी आवश्यक पेट्रोल पंपाची गतीने सोय करण्यात येणार असून, उर्वरित राहिलेली एक त्रुटी एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडिया व डिजीसीएकडून मार्गी लागून लवकरच विमानसेवा चालू करण्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रयत्न सुरू केले आहेत.




सोलापूरच्या उच्चशिक्षित असंख्य युवकांना पुणे-मुंबईकडे नोकरीसाठी जावे लागते म्हणून सोलापूर शहरात मोठ्या उद्योगांची गरज होती. तर हे उद्योजक सोलापूरला येण्यासाठी विमानसेवेची गरज आहे. यासाठी सोलापूर विकास मंचच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून लढा देवून विमानसेवा सुरू करण्यासाठी वारंवार प्रयत्न केला आणि स्थानिक नागरिकांनीही मागणी आता लावून धरली होती. यात आता आमदार सचिन कल्याणशेट्टींप्रमाणेच खासदार प्रणिती शिंदेंनीही विमानसेवा लवकर सुरू होण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

या विमानसेवेला केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही चांगला प्रतिसाद दिला होता. इतकेच नाहीतर खा. मोहोळ यांनी विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान, सोलापूरकरांना २३ डिसेंबरपासून विमानसेवा कार्यान्वित करण्याचा शब्दही दिला होता. त्या अनुषंगाने आवश्यक ती तयारीही झाली होती. प्लॉय ९१ या कंपनीने तब्बल ७२ सिटांच्या विमानसेवेसाठी आवश्यक ते कर्मचारीही नेमले होते. मात्र प्रवासी वाहतूक सेवेसाठी एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडिया व डिजीसीएकडून अजून २ एनओसी मिळणे बाकी असल्याने डिसेंबरची विमान उडानसेवा जानेवारी मध्ये कार्यान्वित होणार आहे. प्रवासी विमानसेवेसाठी अनेक बारीक त्रुटी पाहिल्या जातात. सोलापूरचे विमानतळ सुसज्ज असून चालत नाही तर या नव्याने येणाऱ्या विमानाचे वजन किंगफिशर कंपनीच्या विमानापेक्षा पावणेचार टन जास्त आहे. म्हणजेच किंगफिशर मॉडेल: एटीआर ५०० होते तर हे प्लॉय ९१ चे विमान मॉडेल: एटीआर ६०० आहे. याची एनओसी आणि दुसरी त्रुटी म्हणजे हिंदुस्थान पेट्रोल कंपनीची आहे. यामुळे या दोन त्रुटींची पूर्तता होताच ही होटगी रोडवरील विमान सेवा सर्वांसाठी कार्यान्वित होणार आहे. जानेवारीत सोलापूरच्या गड्डा यात्रेसाठी अनेक प्रवासी अक्षरश: १० नोव्हेंबरच्या तिकिट बुकींगपासून आजतागायत वाट पाहत होते. विमानसेवेचे स्वप्न आता आगामी नवीन वर्षातच साकार होणार असल्याचे दिसून येते.



# ५४ पथकांद्वारे सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमा अंतर्गत दि.२३ डिसेंबर ते ३ जानेवारी २०२५ दरम्यान १० दहा दिवसांच्या सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीमेस आज पासून प्रारंभ करण्यात आला.

मनपा कार्य क्षेत्रातील अति जोखमीच्या भागांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. ज्या व्यक्तींना दोन आठवड्यापेक्षा अधिक कालावधीचा खोकला सायंकाळी येणारा ताप, भूक न लागणे, वजनामध्ये लक्षणीय घट, मानेवर व इतरत्र गाठी येणे ही लक्षणे असणाऱ्या संशयित व्यक्तीची तपासणी करण्यात येणार आहे. त्या व्यक्तींची तत्काळ थुंकी नमुने तपासणी, क्ष किरण तपासणी केली जाणार आहे. यात क्षयरोग आढळून आल्यास मोफत औषध उपचार सुरु करण्यात येणार आहे व क्षयरुग्णास निक्षय पोषण योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. क्षयरोग प्रसाराचे प्रमाण कमी करणे, मृत्यु दर कमी करून शहरातील क्षयरुग्णाची संख्या कळण्यास या मोहिमेची मदत होईल. आयुक्त शीतल तेली यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्याधिकारी डॉ.राखी माने यांच्या सनियंत्रणातून आणि शहर क्षयरोग अधिकारी डॉ अरुंधती हराळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम आहे. आयुक्तांच्या हस्ते गुलाबी रंगाचे जॅकेट वाटप झाले. आशा वर्कर्स व आरोग्य कर्मचारी यांना या गृहभेटीत नागरिकांनी योग्य माहिती देऊन सहकार्य करावे आणि शहर क्षयमुक्त करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### १ लाख २१ हजार नागरिकांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट

या मोहिमेत आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन घरातील सर्व सदस्यांची क्षयरोगासंदर्भातील तपासणी करणार आहेत. या मोहिमेसाठी शहरी भागासाठी ५४ पथके तयार केली असून ११ पर्यवेक्षकद्वारे पर्यवेक्षण करण्यात येणार आहे. एकूण लोकसंख्येच्या १ लाख २१ हजार ६९६ इतक्या नागरिकाची मोहिमेतील १० दिवसात तपासणी करण्याचे उद्दिष्ट आहे.

# अभाविप म्हणजे देशभक्त विद्यार्थी घडवण्याचे विद्यापीठ

## ● पद्मश्री मिलिंद कांबळे सोलापुरातील प्रदेश अधिवेशनाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

विकसित भारत घडविण्यासाठी विद्यार्थी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद म्हणजे राष्ट्रहिताकरिता जीवन समर्पित करणारे देशभक्त विद्यार्थी घडविण्याचे विद्यापीठ आहे, असे प्रतिपादन पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी केले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या ५९ व्या प्रदेश अधिवेशनाचे उद्घाटन सोमवारी पद्मश्री मिलिंद कांबळे यांच्या हस्ते झाले. यावेळी अभाविपचे राष्ट्रीय सह संघटनमंत्री देवदत्त जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात हे अधिवेशन सुरू आहे. अधिवेशन स्थळाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले आहे.



अधिवेशन उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर अभाविपचे राष्ट्रीय सह संघटनमंत्री देवदत्त जोशी, अधिवेशनाचे स्वागत समिती अध्यक्ष अंकुर पंधे, स्वागत समिती सचिव सुहास जोशी, प्रदेश अध्यक्ष प्रा. डॉ. शांतिनाथ बागेवाडी, प्रदेश मंत्री अथर्व कुलकर्णी, अभाविपच्या प्रदेश सहमंत्री श्रेया चंदन, महानगर अध्यक्ष प्रा. डॉ. प्रशांत चाबुकस्वार, महानगरमंत्री यश उडाणशिव, उपस्थित होते. प्रारंभी पद्मश्री मिलिंद कांबळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून अभाविपच्या प्रदेश अधिवेशनाचे उद्घाटन झाले. पद्मश्री मिलिंद कांबळे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार समाजात पोहोचणे आवश्यक आहे. नोकरी मागणारे नको तर नोकरी देणारे तरुण घडावेत यासाठी कार्य करण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थी युवकांच्या सक्रिय सहभागानेच देशाचा सर्वांगीण विकास होणार आहे. या प्रवासात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा सिंहाचा वाटा या पूर्वीप्रमाणेच कायम राहणार आहे. जगातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना असा नावलौकिक असलेल्या अभाविपचे राष्ट्र विकासात अखंड योगदान आहे. आणीबाणीला विरोध, भ्रष्टाचारविरोधी आंदोलन तसेच जम्मू कश्मीरसारख्या आंदोलनामध्ये अभाविपने प्रचंड संघर्ष केला आहे. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यातही अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने मोठा वाटा आहे, असेही पद्मश्री मिलिंद कांबळे म्हणाले. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष प्रा. शांतिनाथ बागेवाडी, प्रदेशमंत्री अथर्व कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वागत समिती अध्यक्ष अंकुर पंधे यांनी प्रास्ताविक केले. स्वागत समिती सचिव सुहास जोशी यांनी सूत्रसंचालन तर महानगरमंत्री यश उडाणशिव यांनी आभार मानले. आ.देवेंद्र कोठे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, स्वागत समितीचे संरक्षक रंगनाथ बंकापूर, शिक्षण प्रसारक मंडळी संस्थेचे निमंत्रित संचालक श्रीरंग कुलकर्णी, शिक्षण प्रसारक मंडळी संस्थेचे शालेय समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, अभाविपचे राष्ट्रीय कार्यकारी परिषद सदस्य प्रा. प्रशांत साठे, राष्ट्रीय मंत्री शालिनी वर्मा, पश्चिम क्षेत्र क्षेत्रीय संघटनमंत्री गितेश चव्हाण, सांगली विभाग प्रमुख प्रा. निर्भयकुमार विसपुते, राष्ट्रीय मंत्री शालिनी वर्मा उपस्थित होते.

### सनईच्या मंगलसुरांनी झाले स्वागत

पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अधिवेशनासाठी येणाऱ्या विद्यार्थी कार्यकर्ते आणि प्राध्यापकांचे स्वागत करण्यासाठी सनई चौघडे वाजविण्यात येत होते. सनईच्या मंगलसुरांनी विद्यार्थी कार्यकर्त्यांचे स्वागत झाले. सोलापूरचे कलाकार व्यंकटेश माने, हनुमंतु माने, आबा कांबळे यांनी सनई चौघडा वादन केले.

### नंदीध्वजांसोबत सेल्फी घेण्यासाठी गर्दी

श्री सिद्धरामेश्वर यात्रेतील सात नंदीध्वजांच्या प्रतिकृती आणि श्री सिद्धरामेश्वरांची भव्य मूर्ती अधिवेशनस्थळी ठेवण्यात आली आहे. या नंदीध्वजांच्या प्रतिकृतींसोबत सेल्फी घेण्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून आलेल्या तरुण-तरुणींनी मोठी गर्दी केली होती.

### शिस्तबद्धतेचे घडले दर्शन

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या प्रदेश अधिवेशनात विद्यार्थी आणि विद्यार्थिनी कार्यकर्त्यांनी शिस्तीचे दर्शन घडवले. मुख्य सभागृहातील आसन व्यवस्था, सभागृहाच्या आणि भोजन कक्षाच्या बाहेर रांगेत लावलेल्या चपला, शेकडो कार्यकर्ते असूनही एका सुरात दिल्या जाणाऱ्या घोषणा, समय पालन आदी गोष्टीतून अभाविपच्या कार्यकर्त्यांच्या शिस्तबद्धतेचे दर्शन सोलापूरकरांना घडले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ज्ञानामृत आनंदलहरी -९८३

**सांडावे मांडावे ।**
**काय ऐसें नाहीं ठावें ।।**

नीट-नेटकी, धष्ट-पुष्ट दिसणारी त्याचबरोबर सुशिक्षित माणसंसुध्दा बऱ्याचवेळा नको ते करुन जातात. अशा नको ते करणाऱ्यांकडे पाहिले म्हणजे ही माणसंच आहेत का? असा प्रश्न पाहणाऱ्या माणसाला पडतो. एखाद्या माणसाला माणूस म्हणावे का? असा माणसाला प्रश्न पडणे म्हणजे थोडे विचित्रच वाटते. पण वस्तुस्थिती अशीच असल्याने ते मान्यही करावे लागते. आपण कोणत्या वेळी काय करतो किंवा कोणत्या वेळी काय करायला हवे, याची जाण मानवाला असायलाच हवी. नाकातली नथनी कानात आणि कानातील झुंबर नाकात घातले म्हणजे खूप विचित्र वाटते. अगदी याप्रमाणे कोणती गोष्ट कोठे किंवा कोणती गोष्ट केव्हा याचा कसलाही विचार न करता मनाला वाट्टेल तसे लोक कृत्य करीत असतात. घाणीच्या ठिकाणी वास येतो म्हणून नाक धरणे योग्य आहे. पण सुवासाच्या ठिकाणी वास येतो म्हणून नाक धरणे योग्य नव्हे. तरीपण योग्य-अयोग्यतेचा विचार न करता नाकाला धरण्याची कृती अनेकांकडून होते. अशी कृती म्हणजे माणुसकीला काळीमा फासणे नव्हे तर काय?



**ऐसी बात बोलिए कोई न बोले झूठ ।**
**ऐसी जगह बैठिए कोई न बोले ऊठ ।।**

ही संतोक्ती असली तरी यांच्या विरुध्द वागणाऱ्यांची संख्या कमी नाही. जेवतांनाही नाक धरायचे आणि हागतानाही नाक धरायचे म्हणजे निव्वळ वेडा चाळा होय. हा वेडा चाळा स्वत:च्या फजितीस कारणीभूत होतो. अशा मूर्खांना केव्हा काय अनुसराने व केव्हा काय टाकावे हे कळत नाही. याबद्दल बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**जेवितांही धरी । नाक हागतिया परी ।।**
**ऐसियाचा करी चाळा । आपुलीच अवकळा ।।**
**सांडावे मांडावे । काय ऐसें नाहीं ठावें ।।**

मुके प्राणीसुध्दा शिकविलेल्या गोष्टीचे पालन करतात. केव्हा व कोठे काय करावे हे त्यांना कळते. पण बुध्दीवादी माणूस मात्र स्वत:च्या अहंकारात बऱ्याचवेळा नको ते करुन जातो. मी शिकायला असतांना शिक्षण खर्च निघावा म्हणून औरंगाबादला चित्रपट परिक्षक म्हणून काम पाहात होतो. एका चित्रपटाच्या मध्यंतरामध्ये मी लघुशंकेला गेलो असता विचित्रच पहायला मिळाले. एका धष्टपुष्ट शर्टींग केलेल्या व्यक्तीने लघुशंकेला उभे राहण्यासाठी आपल्या अंगावरील पँट काढून खांद्यावर घेतली आणि अत्यंत तोकड्या चड्डीवर उभा राहिला. सर्व लोक त्याच्या या कृतीकडे आश्चर्याने पाहू लागले. तेवढयात एका तरुणाने त्याच्या खांद्यावरची पँट ओढली आणि वरुन खाली फेकून तो तरुण पळून गेला. त्यानंतर हा तरुण तोकड्या चड्डीवर ओरडत त्या पँटकडे धावू लागला. आपण जसे या अशोभनिय कृतीबद्दल हसत असाल, त्यापेक्षाही आम्ही जास्त हसलो आणि बरेच लोक लाजलेसुध्दा ! स्वत:च्या कृतीची अनेकांना लाज वाटत नसली तरी पाहणाऱ्या अनेकांना त्यांच्या कृतीची लाज वाटते. मुक्या प्राण्यांकडून किंवा वेडया माणसांकडून एखादी नको ती घटना घडली तर त्याचे कोणाला विशेष कांही वाटत नाही. पण बुध्दीवान माणसांकडून असे कांही घडले म्हणजे निश्चितच लाजीरवाणे वाटते जास्त लाडावलेल्या किंवा स्वत:ला फार शहाणे समजणाऱ्यांकडूनच मोठ्या प्रमाणावर अशा नको त्या घटना घडत असतात. चांगल्या-वाईटातला, काळ-वेळेतला, योग्य-अयोग्यतेतील फरक माणसाला समजायलाच पाहिजे. असा फरक न करता वागणाऱ्याला फजितीस तोंड द्यावेच लागते. समोर कोणी कांही म्हणत नसले तरी माघारी का होईना पण लोक नांव ठेवतात हे लक्षात ठेवावे.

**जय जय रामकृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २४ डिसेंबर २०२४ | राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन, |
| विक्रम संवत् २०८०-८१ | पद्मनाभस्वामी जयंती - कोल्हापूर |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. नवमी - (१९.५१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - हस्त (१२.१६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शोभन (२०.५२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (अहोरात्र) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ** : सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

**मिथुन:** अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क** : विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल.

**सिंह** : प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कन्या** : व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

**तुळ** : नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** : साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु** : आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

**मकर** : नातेवाईंकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विराधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

**कुंभ** : लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

**मीन** : रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

### शाश्वत विकासासाठी बदलत्या हवामानावर

# भू-पर्यावरणीय संशोधन व्हावे : कुलगुरु

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर -**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेती व शेतकऱ्यांवरच देशाची प्रगती अवलंबून आहे. आज बदलत्या हवामानाचा आणि भू-पर्यावरणाचा मोठा फटका शेतीला बसत आहे. त्यामुळे शेती सुधारण्यासाठी व शाश्वत विकासासाठी बदलत्या हवामानाबरोबरच भू-पर्यावरणशास्त्रात चांगले संशोधन व्हावे, अशी अपेक्षा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी व्यक्त केले.

विद्यापीठातील भूशास्त्र संकुलाच्यावतीने पीएमउषा अंतर्गत शाश्वत विकासासाठी हवामान बदल आणि भू-पर्यावरणीय नवकल्पना या विषयावर दोन दिवसीय आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन कुलगुरू प्रा. महानवर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी विभागप्रमुख डॉ. प्रवीण सप्तर्षी, भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. धवल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. भूशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. विनायक धुळप यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून राष्ट्रीय चर्चासत्राची माहिती दिली.

प्रा. महानवर म्हणाले, शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सतत वेगवेगळे पिके घेणे आवश्यक आहे. त्यामुळे मातीची गुणवत्ता व पोत सुधारते. जर एकच पीक आपण सतत घेतल्यास जमीन नापीक बनते. त्याचबरोबर चांगल्या हवामानासाठी व संतुलित पर्यावरणासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षांची लागवड व संवर्धन होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांनी काम करणे आवश्यक आहे.

डॉ. प्रवीण सप्तर्षी यांनी वातावरण कसे बदलत चालले आहे, याविषयी माहिती दिली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. शाश्वत तंत्रज्ञानाचाही वापर होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी देशभरातून १०० जणांनी सहभाग घेतला आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुलभा बनसोडे यांनी केले तर आभार डॉ. प्रशांत उनाळे यांनी मानले.



## गोव्याच्या शेकोटी संमेलनात डॉ. सुवर्णा गुंड-चव्हाण सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

अभिजात मराठीची स्थिती कधी या महत्त्वाच्या विषयावर आधारित सुवर्णधन दिवाळी विशेषांक २०२४ च्या वैशिष्ट्यपूर्ण व उत्कृष्ट संपादनाबद्दल कोकण मराठी परिषद गोवा यांच्यातर्फे उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार २०व्या शेकोटी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सत्रात संमेलनातील या महत्त्वाच्या पुरस्काराने संमेलनाच्या उद्घाटन सत्रात संपादिका प्रो. डॉ. सुवर्णा गुंड-चव्हाण यांना पणजी येथे सन्मानित केले गेले.

याप्रसंगी कोकण मराठी परिषद संस्थेचे अध्यक्ष सुदेशजी अर्लेकर, संमेलनाचे अध्यक्ष डॉ. तुकाराम रोंगटे, उद्घाटना डॉ. स्नेहा महाम्बरे, स्वागताध्यक्ष अभिनेत्री अमिता नायक- सलत्री, नगरसेवक व बोडगेश्वर संस्थांचे अध्यक्ष आनंद भाईडकर नगराध्यक्ष डॉ. नूतन बीयोलकर, माजी नगराध्यक्ष सुधीर कांदोळकर, ॲड. तारक आरोलकर, कार्याध्यक्ष म्हाळू गावस, रोहिदास गावकर, गुरुदास वायगणकर तसेच कार्यवाहक मेधा जाधव व प्रमुख कार्यवाहक व्यंकटेश नाईक होते. निमंत्रित कवींच्या सत्राच्या 'अभिजात मराठीची स्थिती गती ' या विषयावर प्रो. डॉ. गुंड-चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. निमंत्रित करण्यात आलेल्या कवींबरोबरच डॉ. गुंड-चव्हाण यांनी 'बाईपण' ही कविताही सादर केली.

## मालपाणीज् बेकलाईटने गाठला २५ कोटींचा टप्पा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

खाद्यप्रक्रिया आणि बेकरी क्षेत्रातील अग्रगण्य व विश्वासपूर्ण ब्रँड असलेल्या मालपाणीज् बेकलाईटने एक ऐतिहासिक टप्पा गाठला असून कंपनीच्या १९९९ स्थापना झाल्यापासुन २५ कोटी क्रिमरोलचे उत्पादन करून वेगाने वाटचाल करत आहे. पुण्यातील बेकलाईट फूड प्रोसेसिंग प्रा.लि.कंपनीने बाजारपेठेत दोन दशकांपासून कार्यरत आहे. व्यवस्थापकीय संचालक सचिन मालपाणी म्हणाले, क्रीम रोल फक्त डेझर्ट नसून आधुनिक विश्वातील समाधानाचे प्रतीक देखील आहे. शुध्द शाकाहारी उत्पादने लक्षात घेऊन आधुनिकता आणि परंपरेचा अनोखा मिलाफ असलेली उत्पादने भविष्यात बाजारात आणण्याची बेकेलाइटची योजना आहे.

## वंचितांना मायेच्या उबदार शाली, चादरींचे पांघरुण

**साने गुरुजी कथामाला जिल्हा समितीचा उपक्रम**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ डिसेंबर-**

साने गुरुजी कथामाला जिल्हा समितीच्या वतीने दत्त मंदिर, प्रभाकर महाराज मंदिर, शासकीय रुग्णालय, रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड इ. परिसरातील वंचितांना मायेच्या उबदार शाली व चादरींचे पांघरुण घालण्यात आले. त्यावेळी वंचितांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. कथामालेच्या या उपक्रमात उपाध्यक्ष आरती काळे, , कोषाध्यक्ष अशोक म्हमाणे, सदस्य शिवलिंग शहाबादे श्रीवल्लभ करकमकर, अरुण कुमार धुमाळ, रंगसिद्ध कोरे, गणेश लेंगरे, डॉ. जयश्री मेहता, अरविंद जगताप, प्रा. वामन बावळे आदींनी सहभाग घेतला. कार्याध्यक्ष अवधूत म्हमाणे यांच्या प्रेरणेने आयोजित या कार्यक्रमाचे, प्रास्ताविक अशोक खानापुरे यांनी केले तर, रामचंद्र धर्मसाले यांनी आभार मानले.

# आंतरभारती-साने गुरुजी यांची देशाला देणगी



**१९२९ सालच्या लाहोर काँग्रेस अधिवेशनाच्या अधिवेशनानंतर महात्मा गांधींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेण्यासाठी पूज्य साने गुरुजींनी १७ जून १९२४ पासून अमळनेर येथील खानदेश शिक्षण संस्थेच्या शाळेत (सध्याचे प्रताप हायस्कूल) शिक्षक म्हणून काम करीत असलेल्या नोकरीचा २९ एप्रिल १९२४ रोजी राजीनामा दिला आणि जळगाव जवळच्या पिंपराळे येथील अण्णासाहेब दास्ताने यांच्या आश्रमात दाखल होऊन खानदेशात सत्याग्रह व कायदेभंग चळवळीच्या प्रचार कार्यात स्वत:ला झोकून दिले. परिणामी १७ मे १९३० रोजी त्यांना इंग्रज सरकारने अटक केली. १५ महिन्याचा कारावास झाला. पहिले दोन अडीच महिने धुळ्याच्या तुरुंगात नंतर त्यांचे तामिळनाडू येथील त्रिचनापल्लीच्या तुरुंगात रवानगी केली. येथेच आंतरभारतीचे बीज अंकुरले.**

त्रिचनापल्लीच्या तुरुंगात संपूर्ण देशभरातील कैदी होते. कोणी केरळ, कोणी आंध्र, कोणी कर्नाटक, कोणी बंगाल, कोणी महाराष्ट्रातील असे विविध प्रांतातील, विविध भाषा बोलणाऱ्यांचे ते एक संमेलनच होते. शिक्षा भोगत असताना अनेकांमधील एकतेचा चांगला परिचय झाला. येथेच गुरुजींनी कन्नड, तमिळ सारख्या द्रविड भाषांचे ज्ञान मिळविले. तमिळ शिकून त्या भाषेतील लोकप्रिय कुरल ग्रंथाचे त्यांनी अनुवाद केले. कन्नड, तमिळ भाषेतील अनेक गोष्टी ऐकल्या. अनेक गोष्टी लिहून त्या सर्वांना वाचून दाखवल्या. आपला भारत देश अनेक प्रांतांचा, अनेक भाषांचा, अनेक जातींचा, अनेक धर्मांचा, अनेक वंशाचा, अनेक पंथांचा, चालीरीतींचा देश आहे. या अनेकांमधील एकतेचा संगम त्रिचनापल्लीच्या तुरुंगात झाला होता. कुरल ग्रंथाच्या अभ्यासावरून गुरुजींच्या लक्षात आले की भारतीय संस्कृती सर्वत्र एकच आहे. या खंडप्राय देशाचे हृदय एकाच रक्ताने भरलेले आहे. आपण इतर प्रादेशिक भाषेतील साहित्याचे अभ्यास केले तर आपणास कळून येईल की, प्रादेशिक अंतर असले तरी मनाने, संस्कृतीने आपण सारे जवळ आहोत. सर्व भारतीय एक आहोत.

### आंतरभारतीचे सूत्र

गुरुजी मुळात भारतीय संस्कृती आणि सर्वधर्म समन्वयाचे, तत्त्वज्ञानाचे अभ्यासक होते. भारतीय संस्कृतीचे नम्र उपासक होते. पण चातुर्वरण्याची चौकट जी हिंदू मध्ये दृढ झालेली होती ती त्यांना मान्य नव्हती. हिंदूंनी कर्मकांडावर वा औडंबरावर भर देऊ नये अशा मतांचे गुरुजी होते. भारतासारख्या विशाल देशात विविध धर्म, नाना उपासना पध्दती, विविध ग्रंथ, अनेक बोलीभाषा आणि त्यांचे लोकसाहित्य आहे. या साऱ्या विषयी गुरुजींना प्रेम होते. त्रिचनापल्लीच्या तुरुंगात असताना गुरुजींच्या ठायी असलेल्या समृद्धीचा, सौजन्याचा, विद्वत्तेचा, तळमळीचा आणि मधाळवाणीचा प्रभाव त्यांच्या सर्व मित्रावर पडल्याशिवाय राहिला नाही. तुरुंगातील कैद्यांना गुरुजी सामोपचाराच्या स्वरात स्वराज्याचा अर्थ समजावून सांगत असत. दुसऱ्यांना दुःख देणे हे स्वराज्य नसून सर्वांशी प्रेमळ, प्रेमाने, बंधुत्वाने एकत्र आणणे आणि समतेने एकत्र नांदणे हेच खरे स्वराज्य होय. हाच विचार मनी धरून गुरुजी आंतरभारतीचे सूत्र आपल्या सहकाऱ्यांच्या हाती सोपवत होते.

### आंतरभारती साठी गुरुजींचे स्वप्न

या संस्थेसाठी सुंदरशी जागा असावी. सरकार जवळ मागावे किंवा कुणा सज्जनाने देऊ केली तर ती कृतज्ञतेने घ्यावी. तिथे त्या त्या भाषेतील तज्ञ असतील. त्या त्या भाषेतील साहित्य राहील. त्या सर्व तज्ञांना हिंदी येत असावे. संस्थेला जोडून विद्यालय असावे. शेती हस्तोद्योग असावे. भारतीय भाषा शिकण्याची तेथे सोय होईल. विद्यार्थ्यांच्या कानावर सर्व भाषा पडतील. साहित्याबरोबर चित्रकला, नृत्यकला, सहकार, सहजीवनाचे शिक्षण द्यावे. प्रांत भारतातील मुलं सुट्टीमध्ये खेडोपाडीही जातील. मुले संवाद करतील. स्वच्छता करतील. भिन्न भिन्न प्रांतात सांस्कृतिक देवाण-घेवाण होईल. ध्येयवादी तरुण प्रांत भारतीयातून बाहेर पडतील. नवभारताच्या निर्माण कार्यात सहभागी होतील. गुरुजींच्या भाषणाला सर्व साहित्यिकांनी टाळ्या वाजवल्या आणि संमती दिली. पुज्य गुरुजींचे हे स्वप्न साकार करण्यासाठी स्वर्गीय यदुनाथजी थत्ते, प्रकाशभाई मोहाडीकर, चंद्रकांत शहा, सनत भाई मेहता, प्राचार्य सदाविजय आर्य, प्रा. मु. ब. शाह, प्राचार्य जयवंत देशमुख, सुब्बारावजी, जयू नाना ठाकरे, पुष्करभाई पंड्या इत्यादी मंडळी कार्यशील होते. ओ्म तेजस्वीना वधितमस्तू या मंत्राची प्रचिती देणारी अमृतधारा म्हणजेच आंतरभारती होय. या नवभारत निर्मिती केंद्रात आपला सहयोग हीच पूज्य गुरुजींना श्रद्धांजली ठरेल. प्रतिवर्षी २५ डिसेंबरला आंतरभारती स्नेहमेळाव्याचे आयोजन केले जाते. या स्नेह मेळाव्यात विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या आंतरभारतीचे काम करीत असलेल्या, साने गुरुजींचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांचा एक स्नेह मेळावा होत असतो. यावर्षीचा हा मेळावा आपल्या सोलापूर शहरात होत आहे.

नागेश करजगी ऑर्चिड स्कूल, जुनी मील या ठिकाणी हे अधिवेशन होत आहे. या अधिवेशनामध्ये आपण सगळ्यांनी धर्म, पंथ, जाती, भाषा या सर्व वादांच्या पलीकडे जाऊन निर्विवादपणे भारतीय म्हणून एकत्र यावे आणि या देशाची एकता आणि अखंडता अबाधित राहावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्राचार्य सुभाष शास्त्री, प्रा. डॉ. राजशेखर नळगे, प्रा. अरुणकुमार धुमाळ व सोलापूर शाखेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करीत आहेत.

**- प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी**
**अध्यक्ष, महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज, बोरामणी.**

# ग्राहक जागृती काळाची गरज

ग्राहक दिनाचा मुख्य उद्देश प्रथम आपण ग्राहक म्हणजे काय हे जाणून घेतले पाहिजे वस्तू किंवा सेवा विकत घेणारा जन्मापासून ते मृत्यूपर्यंत ग्राहक आहोत या सर्वांमध्ये समन्वय असेल तरच हे अर्थव्यवहाराचे चक्र सुख समृद्धीच्या दिशेने गतिमान होऊ शकेल मग संघर्ष कुठे आहे सर्व ग्राहक आजही बाजारात का लुबाडला जात आहे याचा विचार केला तर असे लक्षात येते की याची पाळेमुळे उपरोक्त भोगवादी व चंगळवादी संस्कृतीत आढळून येतील सर्वसामान्य ग्राहक राजाला दिलासा संरक्षण देण्यासाठीच भारतीय ग्राहक चळवळीने उचित न्याय व्यापार व्यवहाराचा पुरस्कार करण्यावर भर दिला आहे या चळवळीने जो ग्राहक संरक्षण कायदा आणला आहे तो कुणा व्यावसायिक विरुद्ध नाही तर या कायद्याचे पहिले वाक्य आहे हा कायदा अनुचित व्यवहारांना लागू आहे. सन १९८० साली पुणे आणि लोणावळा येथे शिबीर होऊन त्यात उत्तम नेटवर्क असणारी भारतामधील ग्राहकांची ही एकमेव प्रभावी क पंचायत खऱ्या अर्थाने सामान्य माणसाची चळवळ झाली पाहिजे, असा बिंदू माधव जोशींच्या निर्धार होता अनेक अडचणींना मार्ग पार करून ही चळवळ आज यशस्वी झाली ग्राहक पंचायतीची चळवळ कोणत्याही राजकीय खुंट्याला बांधलेली नाही ग्राहक पंचायतीच्या वतीने सामान्य ग्राहकांचे प्रश्न प्रशासना मधून सोडून घेण्यासाठी देखील राजकीय पुढार्यांचा वापर करायचा नाही हे ग्राहक पंचायतीने स्वीकारलेले पथ्य कमालीचे यशस्वी झाले आहे सामान्य ग्राहकांचे अति सामान्य प्रश्न सामान्य ग्राहकांनी गटागटाने स्वतः सोडवायचे या या पद्धतीला ग्राहक पंचायत म्हणतात आज ग्राहक पंचायतीने सरकारी भवन घेतलेले नाही समाजाच्या उत्स्फूर्त सहाय्य आणि सहकाऱ्यांवर ग्राहक पंचायत चळवळ आहे ग्राहक पंचायत म्हणजे भारतातील ग्राहकांचे संरक्षण कवच झाले पाहिजे असा विचार ग्राहक पंचायत ही गरुड झेप घेत आहे. घराचे स्वप्न साकार व्हावे त्यामध्ये कोणतीही होऊ नये यासाठी प्रत्येक व्यक्तीने दक्षता घेणे आवश्यक आहे वीज हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला असून विजेवर चालणारी निरनिराळी उपकरणे ही आता राहिली नसून ती गरजेची झाली आहेत विजेच्या उपकरणांची खरेदी करताना विशेष काळजी ग्राहकांनी घ्यावी कारण ती सुरक्षित नसती तर वापरणाराच्या जीवाला धोका उपकरणाला आयएसआय चिन्ह आहे का ते पहावे गॅरंटी कार्ड वॉरंटी कार्ड तपासून पहावे विज बिल भरता नाही तपासून पहावे कमी जास्त वाटल्यास वीज वीज केंद्रात दाखल करावी गॅस वितरण पोस्ट खाते बँक पतसंस्था हॉस्पिटल बी बियाणे खते एसटी सेवा बस सेवा खासगी वाहतूक रिक्षा दूरध्वनी सेवा शासकीय निमशासकीय नागरी सेवा विविध साखळी योजना कपडा लता इत्यादी अनेक बाबीत ग्राहक फसला जात आहे अपुरा वेळ अपुरी माहिती कायद्याचे ज्ञान नसणे इत्यादी गोष्टीमुळे ग्राहकांची फसवणूक होते आणि तो ग्रासला जातो ज्यांनी कायद्याची कार्यवाही तेच कायदा धाब्यावर बसून सामान्य ग्राहकांची आढळून करून त्यांना लुटत आहे आज बाजारात काय सत्य आणि काय असत्य आहे हे आता कुणालाही कळेनासे झाले आहे सामान्य ग्राहक या परिस्थितीचे चटके घेतो आहे त्याला व्यवहारात फटके बसत असल्यामुळे तो संतप्त झाला आहे कोणतीही वस्तू किंवा सेवा विकत घेताना ग्राहकांनी ती डोळसपणे हाताळली पाहिजे ग्राहकांची सुद्धा काही हक्क आणि कर्तव्य ही आहेत कोणत्याही वस्तूच्या रंगारूपाला न बोलता ती उत्कृष्ट दर्जाची आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे एकाच ठिकाणी खरेदी न करिता प्रत्येक दुकानात त्याची किंमत योग्य आहे किंवा नाही हे पाहिले पाहिजे भेसळ वितरण व्यवस्था सेवेतील त्रुटी विलंब या गोष्टी जागरूकतेने पाहिल्या पाहिजेत




प्रत्येक दुकानांमध्ये किंवा सेवा व्यवस्थेमध्ये तक्रार बुक ठेवलेले असते. परंतु ग्राहकांना ते माहीत नसते त्यामुळे ग्राहक हा कायद्याविषयी अज्ञानी असतो.तक्रार बुकची मागणी करून त्यात आपली तक्रार दाखल करा. ग्राहकांनी खरेदी केलेल्या वस्तूंची किंवा सेवेची पावती घेणे आवश्यक आहे. सोने जसे सांभाळून ठेवतो तसे पावतीही सांभाळून ठेवणे महत्त्वाचे आह. वेळप्रसंगी ग्राहकांना निकृष्ट वस्तू सेवेतील विलंब व त्रुटी याबाबत ग्राहकास दुकानदार ग्राहक पंचायत किंवा ग्राहक मंचाकडे तक्रार दाखल करता येते तक्रार करण्यास ग्राहकांनी कधीही आळस व टाळाटाळ करू नये आपण तात्काळ तक्रार केली तरच बाजारपेठेत सुव्यवस्था व आर्थिक व्यवहारात सुरळीतपणा येणार आहे आजचे ग्राहक हे जागृत ग्राहक आहेत याची जाणीव वस्तू व सेवा विक्रेत्यास झाली पाहिजे ग्राहकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे ग्राहकाला त्याच्या हक्काची जाणीव करून देणे ग्राहकांचे शोषण थांबवणे व त्या शोषणमुक्त करणे ग्राहकाला त्याची गाऱ्हाणी मांडण्यासाठी मार्गदर्शनासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य ग्राहक संरक्षण कक्ष ग्राहक न्याय मंच आज कार्यरत आहे ग्राहक पंचायतीत तक्रार दाखल करून घेऊन त्यांना मार्गदर्शन केले जाते समन्वय व संवादामधून ग्राहक समस्यांचे निराकरण करणे ही ग्राहक सं संरक्षण हा जीवनस्पर्शी व व्यापक आहे अनेक अडचणीत ह्या कायद्याचे सहाय्य ग्राहकाला होऊ शकते सामान्य माणसाच्या दृष्टीने याची व्याप्ती ही फार मोठी आहे हा कायदा साधा सोपा आणि उपयुक्त तर आहेच शिवाय विनामूल्य असून मानसिक कासापोटी ग्राहकांना उलट पाचशे रुपये मिळू शकतात ग्राहकांनी आपली तक्रार स्वतः मांडावी कोणत्याही वकिलाची इथे गरज नाही २७ वे कलम हे ग्राहक संरक्षण कायद्यातील ब्रह्मास्त्र आहे ग्राहक कायद्याची सर्व ताकद शक्ती या कलमात आहे २७ कलमाची वैधता उच्च न्यायालयाने ही मान्य केली आहे ग्राहक दिनी ग्राहक जागृती काळाची गरज आहे त्यासाठी संघटित होऊन ग्राहक चळवळीत सहभागी व्हावे २१ व्या शतकात ग्राहक अर्थव्यवस्था शोषणमुक्त नक्कीच होईल जय ग्राहक जय ग्राहक

**- शोभना सागर**
**मोबाईल नंबर ९२२५८३८८९५**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### स्पंदन ट्रस्टतर्फे 'गावगाथा'ला सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार प्रदान

**अक्कलकोट, दि.२३ डिसेंबर-**

पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगांव) येथील स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित केलेल्या दिवाळी अंक स्पर्धेत गावगाथा दिवाळी अंकाला 'सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी संपादक धोंडप्पा नंदे, प्रा. शिवशरण धड्डे, प्रा. कृष्णा विद्यापीठ कराड यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन श्री गुरु ष. ब्र. प्र. १०८ राष्ट्रसंत पद्मभास्कर, डॉ. नीलकंठ शिवाचार्य महास्वामी, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे माजी कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. सुप्रसिध्द पार्श्व गायिका कविता राम, सुप्रसिध्द मालिका दिग्दर्शक विठ्ठल डाकवे, सुप्रसिध्द अभिनेते पंकज काळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार महिला आघाडीच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्या संगिता साळुंखे, पत्रकार गजानन तुपे, अभिनेत्री, रील स्टार अंजली आकळे, शिवम असोसिटसचे गुलाब जाधव, डॉ. संदीप डाकवे आदी उपस्थित होते. यावेळी प्राईड ऑफ स्पंदन अवॉर्ड, राज्यस्तरीय स्व. राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार, उत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धा, सेल्फी विथ गुढी स्पर्धेतील विजेत्यांचाही सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. संदीप डाकवे यांनी केले, सूत्रसंचालन शितल दवणे आणि आभार भीमराव धुळप यांनी मानले.



### बार्शीच्या बीआयटी कॉलेजचा कृतीशील महाविद्यालय पुरस्काराने गौरव

**बार्शी, दि. २३ डिसेंबर-**

शिक्षक मतदारसंघाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत प्रणित महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे विविध पुरस्कार जाहीर झाले असून त्यामध्ये जेएसपीएम पुणे संचलित भगवंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बार्शी या अभियांत्रिकी महाविद्यालयास कृतीशील अभियांत्रिकी महाविद्यालय हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी भगवंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बार्शीचे प्राचार्य डॉ. रणजित शिराळ यांच्यासोबत विविध विभाग प्रमुख व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. यावेळी प्राचार्य शिराळ म्हणाले की, अशा पुरस्काराने भविष्यात काम करण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याचेही सांगितले. महाविद्यालयास मिळालेल्या या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री डॉ. प्रा. तानाजीराव सावंत, जे. एस. पी.एम. ग्रुपचे अध्यक्ष प्रा. शिवाजीराव सावंत, संकुल संचालक ऋतुराज सावंत यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.



### नॅशनल कल्चरल पायथियन गेम्समध्ये बार्शीतील खेळाडूंचे यश

**बार्शी, दि. २३ डिसेंबर-**

प्रथम पायथियन गेम कौन्सिल यांच्याद्वारे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील प्रथम नॅशनल कल्चरल पायथियन गेम्स २०२४ मध्ये बार्शीतील मुलांनी मोठे उज्वल यश संपादन केले आहे. पंचकुला, चंदीगढ येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रोलर म्युझिकल चेअर आणि म्युझिकल चेअर या प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. प्रियांका जितेश येडलवार यांच्या श्रीशा स्केटिंग क्लब बार्शी यांच्यामार्फत मुलांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी व त्यांनी प्राप्त केली पदके पुढीलप्रमाणे- अनन्या मंदार कुलकर्णी- २ सुवर्णपदक, अर्णव मंदार कुलकर्णी- २ सुवर्णपदक, सर्वेश शिवशंकर उदबाळे- २ सुवर्णपदक, प्रसाद पांडुरंग शिंदे- २ सुवर्णपदक, द्वारकेश ऋषिकेश झरेगावकर- २ सुवर्णपदक, कार्तिकेय रवींद्र पवार- २ सुवर्णपदक, अर्जुन अविनाश भुसारी- १ सुवर्णपदक व १ रौप्य पदक, कृष्णा आनंद ढाळे- २ सुवर्णपदक या सर्व विजेत्या स्पर्धकाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



### बार्शीचे संदेश काकडे यांचा धम्मदूत पुरस्काराने गौरव

**बार्शी, दि. २३ डिसेंबर-**

इंडो एशिया मेत्ता फाउंडेशनच्यावतीने बार्शी नगरपालिकेचे माजी सभापती व युवा उद्योजक संदेश उर्फ पिनू काकडे यांना प्रतिष्ठेचा धम्म दूत पुरस्कार नागपूर येथे जेष्ठ विचारवंत प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या हस्ते शाल, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले. यावेळी बौद्ध धर्म प्रतिष्ठीत मान्यवर उपस्थित होते. संदेश उर्फ पिनू काकडे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी नगरसेवक तथा बाजार समितीचे मुख्य प्रशासक विजय नाना राऊत, बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रणवीर राऊत यांच्यासह समाजातील विविध क्षेत्रातील नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी पूजेची २६ डिसेंबरपासून ऑनलाईन नोंदणी

### कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके : १ जानेवारी ते ३१ मार्च २०२५ मधील पुजांची होणार नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ डिसेंबर-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या नित्यपूजा, पाद्यपूजा, तुळशी पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी पूजा श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील पुजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि.२६ डिसेंबर रोजी स ११ पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

यावाबत मंदिर समितीच्या दि. २० ऑगस्ट रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https: //www.



vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. यापूर्वी पहिल्या टप्प्यात दि.७ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीतील श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्रप्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

आता, दुसऱ्या टप्प्यात १ जानेवारी ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६-२९९२९९या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा असे आवाहन व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी केले आहे.

# अक्कलकोट तालुक्यात सोमवारी पहाटे पाऊस

### दिवसभर ढगाळ हवामान; तूर कापणी, मळणीला अडचण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ डिसेंबर-**

अक्कलकोट शहर व परिसरात सोमवारी पहाटे ४ दरम्यान पावसाच्या सरी कोसळल्या. सध्या तुर पिक कापणीला आहे . ढगाळ हवामान पडणाऱ्या पावसाच्या सरी तुर पिक कापणीला व मळणीला अडचण निर्माण झाली आहे.

अक्कलकोट तालुक्यात बोरी उमरगे रामपुर इटगे कंठेळी मातनाळी नागनाळी निमगाव कोन्हाळी बॅगेळी हंजगी सांगवी काळेगाव गौडगाव स्टेशन जेऊरवाडी कडबगाव आबावाडी कोन्हाळी वळसंग आदिसह तालुक्यातील इतर काही भागात सोमवारी पहाटे ४ दरम्यान पावसाच्या सरी कोसळल्या . पहाटे . पासून कमी जास्त प्रमाणात सकाळ पर्यंत ढगाळ हवामान धुके दाटलेले



होते. तालुकयातील ग्रामीण भागात शेतीची कामे चालू आहेत साखर कारखान्याची ऊस तोड चालू आहे काढणीला आलेलं तूर पिक कापणी, मळणी चालू आहे. ढगाळ हवामान पाऊस यामुळे ही कामे खोळंबली आहेत. द्राक्षे बाग या हवामानामुळे संकटात आले आहेत. हरभरा पिकांवर अळीचा प्रादुभाव होण्याची शक्यता बळवत आहे. शेतकऱ्यांवर पिक उत्पादन खर्च वाढलेले संकट असताना दर अनिश्चितेतेचे संकट हवामान प्रतिकुलतेचा सामाना व नैसर्गीक आपत्तीचे संकट अशा अनेक संकटानां सामोरे जावं लागत असल्याने शेती व्यवसाय दिवसो दिवस आत बट्टयात तोट्यात जात असल्याच मत शेतकरी निरंजन माने हरिष हर्डीकर यांनी व्यक्त केले आहे.

# भाग्यवंती देवीची यात्रा भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २३ डिसेंबर-**

केशेगाव येथील प्रसिद्ध, नवसाला पावणारी ग्रामदैवत श्री भाग्यवंती देवीच्या यात्रेनिनित्त विविध धार्मिक कार्यक्रम, मिरवणूक, महाप्रसाद वाटपाने ही यात्रा ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात पार पाडली.



यात्रा कमिटीच्या वतीने १९ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता, शावळ येथील खाजप्पा पुजारी यांनी देवीचा महिमा व देवीवरील मराठी, कन्नड भाषेतील गाणी गाईली. त्याला भक्त, भाविकांनी फार मोठा प्रतिसाद दिला. याचवेळी आराधिर्नीनी आराधी गीते सादर करून देवीचा जागर केला. शुक्रवारी पहाटे ५ वाजता प्रथेप्रमाणे देवीची, विधी, पूजा, होम आदी धार्मिक कार्यक्रम पार पडले. सकाळी ८ वाजता देवीची सनई, वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक गावातून काढण्यात आली. यावेळी संपूर्ण गावाने आपापल्या घरासमोर सडा टाकून रांगोळ्या घातल्या होत्या. संपूर्ण गावात आनंदी व उत्साही वातावरण होते. महिलांनी देवीच्या पालखीचे औक्षण करून स्वागत केले. दुपारी २ वाजता संपूर्ण गावातील प्रमुख मार्गावरून वाजत गाजत देवीची पालखी मंदिरात आली. यावेळी पालखीचे पूजन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिवर्षाप्रमाणे या वेळेचा महाप्रसाद गावचे सरपंच मल्लिनाथ गावडे यांच्या वतीने देण्यात आला. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यात्रा कमिटी व केशेगाव ग्रामस्थानी ही साजरी केली. गुलाब तुरुरे मेजर यांनी देवीसाठी पालखी व पादुका अर्पण केल्या. मंदिराचे पुजारी शिवानंद हुकिरे यांनी त्याचा स्वीकार केला तर यात्रा सुरळीत व यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मल्लिनाथ हुकिरे, सतीश पाटू, चिदानंद हंद्राळे, शशिकांत हुकिरे, केदारनाथ उमाटे, प्रशांत क्षीरसागर, शिवानंद बिराजदार, ॲड. यशवंत पाटील, मल्लिनाथ जळकोटे, विनय पाटू, मनोज हुकिरे व इतर सर्व ग्रामस्थ व यात्रा कमिटी सदस्यांनी ही यात्रा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.



# जिल्हा कलाध्यापक संघाच्या अध्यक्षपदी गणेश तडका

### सचिवपदी मुकुंद मोरे यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२३ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघ चे पदाधिकारी व तालुका पातळीवरील प्रतिनिधी यांच्या सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघाच्या बैठकीत महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ पुणे संलग्न सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघ अध्यक्षपदी गणेश ईरप्या तडका, कुचन प्रशाला तर सचिवपदी मुकुंद हरीहर मोरे ज. रा. चंडक प्रशाला यांची निवड करण्यात आली.

तीन वर्षांसाठी निवड करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. पुणे विभागीय कार्यवाह तथा माजी अध्यक्ष दीपक कन्ना यांनी नूतन अध्यक्ष सचिव यांचे अभिनंदन केले. संघटनेतील इतर पदाधिकाऱ्यांची निवड खालील प्रमाणे उपाध्यक्ष सुहास रत्नपारखी, शशिकांत कनकी, शहर अध्यक्ष प्रकाश गुज्जेटी, शहर उपाध्यक्ष संगिता पवार-मलजी, ग्रामीण अध्यक्ष विजयकुमार गुंड, ग्रामीण सचिव अमोल गायकवाड, सहसचिव प्रभा आडकी, कार्याध्यक्ष सुरेश मलाव, देवेंद्र निंबर्गीकर, सहकार्याध्यक्ष श्रीशैल गुरव, शिल्पा भैरप्पा म्हमाणे, विभागीय ग्रामीण उपाध्यक्ष श्रीकांत वेदपाठक, प्रसिध्दी प्रमुख मुकुंद मोरे यांची निवड करण्यात आली. सर्व निवड झालेल्या पदाधिकारींचे राज्याध्यक्ष नरेंद्र बारई, नागपूर, बलराम सामंत सिंधुदुर्ग, दिगंबर बेंडाळे, विजयसिंह ठाकूर, प्रकाश पाटील यांनी अभिनंदन केले माजी अध्यक्ष तथा राज्य सल्लागार पी. आर. पाटील, काझी, दादा भगाटे, हिरामण पाटील, प्रियंवदा तांबोटकर, ज्योत्स्ना पाटील यांनी अभिनंदन केले.

# समाजासाठी ग्राहक चळवळीची गरज : उपमुख्याधिकारी वाळुजकर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ डिसेंबर-**

ग्राहक चळवळीची समाजासाठी गरज असुन त्यामध्ये सर्वांनी सहभागी होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन पंढरपूर नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी ॲड. सुनिल वाळुजकर यांनी केले.



ते राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक प्रबोधन पंधरवड्याचा शुभारंभ करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी ग्राहक पंचायतीचे प्रांत सदस्य सुभाष सरदेशमुख होते. प्रारंभी मान्यवरांचे हस्ते ग्राहक पंचायतीचे आराध्यदैवत स्वामी विवेकानंद व अ.भा.ग्राहक पंचायतीचे संस्थापक ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, पंढरपूर तालुका अध्यक्ष विनय उपाध्ये यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी ग्राहक प्रबोधन पंधरवड्याची सविस्तर माहिती दिली व ग्राहक संरक्षण कायद्याचा उद्देश स्पष्ट केला.जिल्हा संघटक दीपक इरकल यांनी ग्राहक संरक्षण कायद्याची व त्याची अंमलबजावणी कशी करावी याबद्दल विस्तृत माहिती दिली.

प्रमुख अतिथी उपमुख्याधिकारी ऍड सुनिल वाळुजकर यांनी ग्राहक पंचायतीचे कार्याबद्दल व यामध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची प्रशंसा केली. ग्राहक संरक्षण कायदा लागू झाल्यामुळे ग्राहकांना आपल्यावरील अन्याय, समस्या दूर करण्यासाठी मोठे साधन मिळाले असून अनुचित व्यापार करणाऱ्यांवर धाक निर्माण झाला आहे असे सांगितले. या समारंभासाठी ग्राहक पंचायतीचे जिल्हा सचिव सुहास निकते, सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर, तालुका सहसंघटक आझाद अल्लापूरकर, तालुका सदस्य सागर शिंदे, रामदास डोंगरे, नरेंद्र कवडे,अंकुश वाघमारे,सचिन कोळेकर, सतिश निपाणकर,व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.तालुका सचिव प्रा. धनंजय पंधे यांनी सूत्रसंचालन केले.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात ध्यानाची साधना

### आंतरराष्ट्रीय ध्यान दिवसानिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ डिसेंबर-**

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील महिला कक्ष विभाग व जिमखाना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय ध्यान दिवसानिमित्त विद्यार्थ्यांनी ध्यान साधना करून एकाग्रता वाढावी यासाठी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांच्या जीवनात गुणवत्ता महत्त्वाची असते, विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक सुधारण्यासाठी नियमित ध्यान साधना आवश्यक असते. ध्यानामुळे विचारांवर नियंत्रण मिळवता येते. आत्मविश्वास निर्माण होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना आत्मसन्मान मिळतो, असे यावेळी प्रा. मधुबाला लोणारी यांनी सांगितले. ध्यान साधना केल्याने व एकाग्र बुद्धीने नव नवीन शोध लावता येतो. यासाठीच विद्यार्थी दशेतच आपला आत्मविश्वास व व्यक्तिमत्व घडत असते. म्हणूनच विद्यार्थ्यांनी नियमितपणे ध्यानसाधना करावी असे यावेळी प्राध्यापिका डॉ.शितल झिंगाडे यांनी सांगितले.

कार्यक्रमास प्रा. मनीषा शिंदे, प्रा. प्राची गणाचारी, प्रा. जनाबाई चौधरी, प्रा. विद्या बिराजदार, प्रा. शिल्पा धुमशेट्टी, प्रा. विद्याश्री वाले, प्रा. भीम सोनकांबळे तसेच विठ्ठल यरगल महेश जोगदे उपस्थित होते.

या उपक्रमाचे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, ज्युनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा यांनी विशेष कौतुक केले.

# वांगी प्राथमिक शाळेत आजी-आजोबा पूजन

### हृदयस्पर्शी उपक्रमाने अनेकांची मने जिंकली

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२३ डिसेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वांगी नंबर ३ (ता. करमाळा) येथे आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत आजी आजोबा पूजन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वांगी नंबर ३ येथे घेण्यात आला.

उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनंजय रोकडे यांनी केले. यावेळी सरपंच मयूर रोकडे, उपाध्यक्ष लक्ष्मण गोडसे, मारुती रोकडे, दत्ता मेनकुदळे, यशवंत भवर, जयवंत सातव, नागेश खराडे, मनोज तळेकर, बाळासाहेब कांबळे, प्रकाश तेलंग, नागनाथ वाघमोडे व ग्रामस्थ उपस्थित होते. गावातील शाळेत प्रथमच आजी-आजोबा पूजन हा आगळावेगळा उपक्रम घेण्यात आला. त्यानंतर उपस्थित आजी-आजोबांचे संगीत खुर्ची घेण्यात आली. या उपक्रमाला गावातील आजी-आजोबांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. सदर उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक आदिनाथ राऊत, उज्ज्वला भोंग, अशोक कणसे, बाळू राठोड यांनी परिश्रम घेतले. शाळेत आजी-आजोबांना बोलवून घेऊन नातू व आजी-आजोबा यांच्यातील निस्सिम प्रेम वृद्धिंगत झाले. सर्व आजी-आजोबांचे, नातवांचे प्रेम पाहून हृदय भरून आले व डोळ्यांच्या कडा ओलवल्या. थरथरते हात नातवांच्या डोक्यावरून फिरत होते. लहानग्यांच्या चिमुकले डोळे आपल्या आजी-आजोबांना निहाळत होते.

#### अन् आजी-आजोबा धावले

आजी-आजोबांसाठी घेण्यात आलेल्या संगीत खुर्ची या खेळात आजी-आजोबा धावताना त्यांची नातवंडे बाबा, दादा, आजोबा धावा, धावा असा एकच आवाज करत होते आणि आजोबाही नातवंडासाठी थकलेले शरीर घेऊन धावण्याचा प्रयत्न करत होते. आजी-आजोबांच्या व नातवंडांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेचा भाव दिसून येत होता.

#### ज्येष्ठांचा आदर, संस्कृतीची जपणूक

विद्यार्थ्यांकडून आजी-आजोबांचे पाद्यपूजन करण्यात आले. संगीत खुर्चीसह विविध मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय संस्कृती आणि परंपरेतील ज्येष्ठांच्या आदर करण्याच्या मूल्यांची जपणूक करण्यासाठी आजी-आजोबा दिन साजरा करण्यात आला.

**-आदिनाथ राऊत,** मुख्याध्यापक,
जि. प. प्राथमिक शाळा, वांगी नं. ३, ता. करमाळा



CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## चोरीला गेलेल्या ७० मोटरसायकली संबंधित मालकांना परत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ डिसेंबर-**

पंढरपूर शहर व परिसरातील चोरी गेलेल्या ७० मोटरसायकली संबंधित मालकांना परत करण्यात आले आहे एकूण पंधरा लाख रुपयांचा मुद्देमाल परत केला केला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी दिली.



गेले अनेक वर्ष चोरीला गेलेल्या मोटरसायकली शहर पोलिसांच्या गुणाप्रकरशाखेने गुन्हे उघड करून शहर व परिसरातील नागरिकांना बोलवून ७० मोटरसायकली त्या त्या मालकांना परत करण्यात आल्या आहेत एकूण १५ लाख रुपयांचा मुद्देमाल परत केला यासाठी जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रीतम कुमार यावलकर पंढरपूर विभागाचे डी. वाय एस. पी. डॉ. अर्जुन भोसले शहर पोलीस निरीक्षक सहाय्यक निरीक्षक आशिष कांबळे सहाय्यक फौजदार शरद कदम राजेंद्र गोसावी पोलीस कर्मचारी सुरेश हेंबाडे सचिन हेंबाडे सम ाधान माने लोखंडे यांनी याचा तपास पूर्ण केला असून ते मोठा सायकली मूळ मालकाला परत देण्यात आल्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### आर्या पब्लिक स्कूलमध्ये गणित, शेतकरी दिवस साजरा

**माढा, दि. २३ डिसेंबर-**

विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव (टें) संचलित, आर्या पब्लिक स्कूल, माढा या सीबीएसई मान्यताप्राप्त स्कूलमध्ये गणितज्ञ रामानुजन यांच्या जन्म दिवसानिमित्त गणित व राष्ट्रीय शेतकरी दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य सागर थोरात यांच्या हस्ते गणिततज्ञ रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी तेजस्विनी चव्हाण, समृद्धी शिंदे, समृद्धी गुंड, कार्तिकी वाळके, गौरांग इंगळे, अविष्कार चव्हाण या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. तर प्रा. जयदेव गायकवाड, प्रा. मनोज नागटिळक प्रा.माधुरी पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. प्राचार्य सागर थोरात यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रा. दत्तात्रय चव्हाण, प्रा. शुभम पुरवत, अतुल लंकेश्वर, प्रा. वंदना गोसावी, प्रा. संध्या सरडे, प्रा. कृष्णा जठार ,प्रा. सारिका यादव, प्रा. मेघा भांगे, प्रा. प्रियंका काशीद , प्रा. संजीवनी ढोबळे, प्रा. रागिनी शिंदे, प्रा. तेजस्विनी कवठे, अरुण माने, तुषार तोडकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन माधुरी पाटील व आभार प्रा. दत्तात्रय चव्हाण यांनी मानले.



### महाराष्ट्र विद्यालयात आंतरराष्ट्रीय ध्यान दिन उत्साहात साजरा

**बार्शी, दि. २३ डिसेंबर-**

दि. २१ डिसेंबर रोजी महाराष्ट्र विद्यालय बार्शी येथे ध्यान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी ध्यान दिवस महाराष्ट्र विद्यालय बार्शी येथे साजरा करण्यात आला. यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक अनंत शहाणे व सहकारी स्वप्निल जिलपे यांनी खूप छान प्राणायाम व ध्यान शिकवले. सर्व विद्यार्थ्यांनी खुप छान प्रतिसाद दिला. याप्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### रयतक्रांती संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी रणजीत चव्हाण

**श्रीपूर, दि. २३ डिसेंबर-**

रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत व प्रदेशाध्यक्ष दीपक राव भोसले यांच्या सूचनेनुसार सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी रणजीत चव्हाण यांची निवड करुन निवडीचे पत्र रयतचे राज्य प्रवक्ते राहुल बिडवे यांनी दिले. रणजीत चव्हाण हे गेली दहा वर्ष शेतकरी चळवळीमध्ये काम करत असून शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी ऊस आंदोलन, दूध आंदोलन, पाण्यासाठी रास्ता रोको आंदोलनामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन आमदार सदाभाऊ खोत यांनी त्यांची निवड केलेली आहे. आगामी काळामध्ये माळशिरस तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यामध्ये संघटना वाढीसाठी व शेतकरी, शेतमजूरांच्या न्याय हक्कासाठी काम करत राहू, असे जिल्हा उपाध्यक्ष रणजीत चव्हाण यांनी सांगितले. यावेळी राज्य प्रवक्ते राहुल बिडवे, गणेश कोडक, बापू वावळ, सुधाकर पांढरे, गजानन माने, अक्षय चव्हाण उपस्थित होते.

### उमरड येथील किर्तनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**करमाळा, दि.२३ डिसेंबर-**



उमरड (ता. करमाळा) येथे स्वर्गीय बाजीराव माणिकराव मारकड यांच्या पुण्यतिथी निमित्ताने हभप करळे महाराज यांचे कीर्तन सेवा संपन्न झाली.यावेळी उमरड आणि पंचक्रोशीतील अनेक लोक उपस्थित होते. या कीर्तनात महाराजांनी बाजीराव दादा मारकड यांच्या जीवनातील अनेक प्रसंग कथित केले. तसेच मानवी जीवनाचे महत्व उपस्थित लोकांना समजावून सांगितले. यावेळी गायक, पखवाजे टाळकरी यांनी यांच्या सुश्राव्य गायन व वादनाने अनेकांची मने जिंकली. उपस्थितांची जेवणाची व्यवस्था संदीप बाजीराव मारकड व जिजाबापू बाजीराव मारकड यांनी केली.

## अक्कलकोटमधील फिरते शौचालय जागेवरुन हलेना

**वापरच होईना; विनाकारण देखभाल, दुरुस्तीचा प्रशासनावर ताण**

**तभा वृत्तसेवा ।**
**नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. २३ डिसेंबर-**

अक्कलकोट तीर्थक्षेत्री लाखो भक्तीची नेहमी वर्दळ असते. यात्रा भाविकांना पुरेसे प्रसाधनगृह उपलब्ध व्हावीत म्हणून लाखो रुपये खर्च करून फिरत्या शौचालयाची उपलब्धता करून देण्यात आली. पण लाखो रुपयांची ही फिरते शौचालय वापराविनाच एकाच ठिकाणी थांबून देखभालअभावी नष्ट होत आहेत.

फिरत्या शौचालयावर लाखो रुपयाचा होणारा खर्च टाळावा. तीर्थक्षेत्री ठिकठिकाणच्या मंदिर भागात कायमस्वरूपी शौचालये बांधा, वापरा, हस्तांतरीत करा या तत्त्वावर विकसित करावित अशी मागणी नागरिकांतून व्यक्त केली जात आहे. अक्कलकोट तीर्थक्षेत्री दिवसेंदिवस येणाऱ्या पर्यटक, यात्री स्वामी भक्तांच्या संख्येत प्रचंड वाढ होत आहे. या अनुषंगाने भाविकाना मुलभूत सोयीसुविधा, चांगली रस्ते, प्रसाधन गृह, वीज, पाणी, स्वच्छता, आरोग्य या सुविधा उपलब्ध होण्याकरिता शासनाचा करोडो रुपयाचा निधी खर्च होतो. पर्यायाने नागरिकांनाच कर स्वरूपात अधिक भुर्दड पडतो. अक्कलकोट तीर्थक्षेत्री यात्रा काळात येणाऱ्या भाविकांना पुरेसे प्रसाधनगृहे उपलब्ध व्हावीत





### लाखो खर्च टाळा, कायमस्वरूपी शौचालय बांधा

अक्कलकोट नगरपालिकेचे जुने दवाखाना आवारात अनेक फिरते शौचालय निकामी अवस्थेत थांबल्याचे आढळून आले आहे. यावर लाखो रुपये खर्च झाले. नवीन फिरते शौचालयही येथेच ठाण मांडून थांबले आहेत. यावर होणारा लाखोंचा खर्च पर्यायाने नागरिकांकडून कर स्वरूपात जमा होणाऱ्या पैशातून होतो. फिरते शौचालयाचा वापर होत नसेल तर शहरातील विविध मंदिर भागात बांधा, वापरा, हस्तांतरीत करा या तत्त्वावर शौचलय विकसित करावीत अशी मागणी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी केली आहे.

म्हणून फिरते शौचालयावर वेळोवेळी लाखो रुपये खर्च केली आहेत. अनेक फिरती शौचालय वापराविना एकाच जागेवर ठाण मांडून जागेवरच निकामी झाल्याचे दिसून येते. नगरपालिकेचा जुन्या दवाखाना आवारात देखभाल दुरुस्तीअभावी निकामी झालेले फिरते शौचालय व याचबरोबर नवीन फिरते शौचालय वापराविना एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याचे दिसून आले.

## कासारवाडी जिल्हा परिषद शाळेतील आनंद बाजारात २७ हजारांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ डिसेंबर-**

कासारवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल आनंद बाजारचे आयोजन करण्यात आले होते. आनंद बाजारात एकूण २७ हजार रुपयांची उलाढाल झाली. यातून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान मिळाले.

सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रीती कांबळे, उपाध्यक्षा अंबिका खाडे, नितीन मंडलिक यांच्या हस्ते बाल आनंद बाजारचे उदघाटन झाले. आनंद बाजारामध्ये एकूण ९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आनंद बाजारात बालकांनी स्वतःच्या शेतातून आणलेल्या पालेभाज्या, फळभाज्या, फळे तसेच गावरान मेवा, चहा, कॉफी, शीतपेये, वडापाव, पाणीपुरी, शैक्षणिक साहित्य, खेळणी, फुगे, स्टेशनरी, ज्वेलरी आदींची दुकाने थाटली. बाजारात ज्याप्रमाणे विक्रेते ओरडुन भाजी विकतात, अगदी त्याचप्रमाणे बालकांनी आपल्या दुकानात मांडलेली भाजी, भाजी घ्या भाजी, ताजी ताजी भाजी म्हणत आरोळ्या ठोकल्या. विद्यार्थ्यांमध्ये जणू वस्तू विक्रीसाठी



स्पर्धाच लागली होती. बाल गोपाळाकडून खरेदीसाठी ग्रामस्थांनी प्रतिसाद दिला. आनंद बाजार यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुधाकर बडे, बिनादेवी दरेकर, वीणा कदम, बाळासाहेब मुंढे, मनीषा भोसले, रेणुका मुंढे, द्वारका पिंपळे यांनी परिश्रम घेतले.



## बार्शीच्या झाडबुके महाविद्यालयाने केले पुणे विभागाचे नेतृत्व

**मुलांचा सॉफ्टबॉल संघ राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ डिसेंबर-**

१९ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धा १७ ते १९ डिसेंबर या कालावधीत विभागीय क्रीडा संकुल, नागपूर येथे उत्साहात झाल्या. पुणे विभागाचे नेतृत्व झाडबुके महाविद्यालय, बार्शीने केले होते. या स्पर्धेत झाडबुके महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने शानदार कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला.

पुणे विभागाचा पहिला सामना मुंबई विभागाविरुद्ध झाला. या सामन्यात पुणे विभागाने १०-० असा एकतर्फी विजय मिळवला. त्यानंतर सेमी फायनलमध्ये यजमान नागपूर संघाविरुद्ध खेळताना ६-२ असा विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना पुणे विरुद्ध अमरावती असा रंगला. कठीण लढत दिल्यानंतर पुणे विभागाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

राष्ट्रीय संघात झाडबुके महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची निवड या स्पर्धेदरम्यान राष्ट्रीय संघासाठी निवड प्रक्रिया झाली. झाडबुके महाविद्यालयाच्या (पुणे विभाग) राम घोडके आणि ओम खळदकर या दोन खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय संघात स्थान मिळवले. संघाचे प्रशिक्षक गणेश नाकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विभागाने ही यशस्वी कामगिरी केली. या यशाबद्दल संस्थेच्या खजिनदार वर्षा ठोंबरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, उपप्राचार्य प्रा. भास्कर करडे, पर्यवेक्षक प्रा. सतीश रणदिवे, क्रीडाशिक्षक गणेश नाकाडे, प्रा. सागर खराडे यांनी संघाचे व खेळाडूंचे अभिनंदन केले.

## तरंगफळ येथे धावपटू रिद्धी पाटील हिचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव दि २३ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील श्रीनाथ विद्यालय ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स तरंगफळ येथे धावपटू रिद्धी मुगुटराव पाटील हिचा सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तरंगफळ या ठिकाणी शिक्षण घेत असणारी रिद्धी मुगुटराव पाटील या विद्यार्थिनीने माळशिरस या ठिकाणी पार पडलेल्या तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून नावलौकिक मिळव याप्रसंगी प्राचार्य शेंडगे म्हणाले, इतर विद्यार्थ्यांनी रिद्धीकडून प्रेरणा घेऊन आपणही प्रयत्न करून यश मिळवावे व आपल्या गावचा आपल्या आई वडिलांचा व शाळेचा नावलौकिक मिळवावा असे आवाहन केले. याप्रसंगी प्राचार्य संतोषकुमार शेंडगे, माळशिरस तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष संजय देशमुख, माजी सरपंच भानुदास तरंगे, नारायणराव वाघमोडे, अश्विनी शेंडगे, बालाजी नरळे, सखाराम तरंगे, आप्पासाहेब पाटील, वैशाली कांबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश गोरवे यांनी केले, आभार शोभा साठे यांनी मानले.

## मंदिर समितीच्या सुरक्षा रक्षकाचा प्रामाणिकपणा

**महिला भाविकाचे दागिने शोधून केले परत**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ डिसेंबर-**

सुजित शेळवणे, मंडलअधिकारी टेंभुर्णी (ता. माढा) हे आपल्या कुटुंबासह रविवारी श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन झाल्यानंतर संबंधित महिला भाविकाच्या गळ्यातील मंगळसूत्र गहाळ झाल्याचे लक्षात आले. त्यांनी मंदिर समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता दर्शनरांगेतील रक्षक ग्रुपचे सुरक्षा रक्षक आदित्य बाबर, यास सदर दागिने आढळून आले. त्यांनी तात्काळ नियंत्रण कक्षात दागिने जमा केले त्यानंतर खात्री करून संबंधित भाविकास ते परत करण्यात आले.

संबंधित दापत्यांना छत्रपती शिवाजी चौक येथे गेल्यानंतर सदरबाब त्यांच्या निदर्शनास



आल्यानंतर त्यांनी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना संपर्क केला.व्यवस्थापक श्री. श्रोत्री यांनी तात्काळ मंदिर समितीच्या नियंत्रण कक्षात संपर्क करून सुचना दिल्या. तद्नंतर सीसीटीव्ही ऑपरेटर यांनी कॅमेरातील रेकॉर्डींग पाहणी करून व सर्व सुरक्षा रक्षकांना वॉकीटॉकीद्वारे सुचना केल्या असता, दर्शनरांगेतील सुरक्षा रक्षक आदित्य तुकाराम बाबर, रक्षक ग्रुप यास सदरचे दागिने आढळून आल्यानंतर त्यांनी नियंत्रण कक्षात जमा केले व खात्री करून संबंधित भाविकास परत करण्यात आले. सदरचे दागिने मिळाल्यानंतर प्रामाणिकपणे मंदिर समितीच्या कार्यालयात जमा केल्याबद्दल सुरक्षा रक्षकाचा मंदिर समिती मार्फत सन्मान केला व मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी देखील दुरध्वनीद्वारे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सुजित शेळवणे यांचे कुटुंब श्री विठ्ठल-रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त आहेत. सद्यस्थितीत, नाताळ (ख्रिसमस) उत्सव सुरू असल्याने भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. श्रीमती शेळवणे यांना मंगळसूत्र परत मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद स्पष्टपणे दिसत होता. अवघ्या काही तासांनी आपल हरवलेल सौभाग्याचं लेणं मिळाल्याने त्यांनी मंदिर समितीच्या कर्मचा-याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

## उद्योजक सुरेश कुंकूलोळ यांच्या दोन पुस्तकांचे रविवारी प्रकाशन

**ज्येष्ठ विचारवंत व्यंकटेश जोशी, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वृक्षमित्र बाळासाहेब पानसरे उपस्थित राहणार**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ डिसेंबर-**

बार्शीतील उद्योजक सुरेश कुंकूलोळ लिखित माझ्या नोंदी व अर्थपूर्ण शोध या पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन नयन प्रकाशन व बार्शीच्या कुंकुलोळ परिवाराने येथील मोरया फंक्शन हॉल येथे रविवारी (दि.२९) सकाळी साडेदहा वाजाता केले असल्याची माहिती संयोजकांच्यावतीने अजित कुंकुलोळ यांनी दिली.

पुस्तक प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत व्यंकटेश जोशी, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वृक्षमित्र बाळासाहेब पानसरे, तसेच रेणूकॉर्प ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वानखेडे यांच्या हस्त, आमदार दिलीप सोपल यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यावेळी ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे, प्रशासकीय अधिकारी संजय खरात (गुजरात) व व्हॉईस ऑफ मिडियाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे हे










मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पुस्तक प्रकाशन सोहळ्यात लेखक सुरेश कुंकुलोळ यांच्या ८१ व्या वाढदिवसपूर्तीनिमित्त उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात येणार आहे. प्रकाशन सोहळ्यानिमित्त दोन्ही पुस्तकं सवलतीच्या दरात वाचकांना प्रकाशन स्थळी उपलब्ध केली आहेत तसेच राज्यातील विविध ३५०० ग्रंथालयात तसेच विक्रीसाठी स्टॉलवर ही दोन्ही पुस्तकं लवकरच उपलब्ध करुन दिली जातील, अशी माहिती अजित कुंकुलोळ यांनी यावेळी दिली. सुरेश कुंकुलोळ यांच्या पुस्तक प्रकाशन व सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्यास नागरिकांनी व पुस्तकप्रेमी वाचकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### व्यवसाय सांभाळत जोपासला छंद

सुरेश कुंकुलोळ यांनी उद्योग व्यवसाय सांभाळून लेखन व वाचनाची आवड जोपासली आहे. नित्य जीवन जगताना आलेले बरे वाईट अनुभव, समाजात काम करताना घडलेले विविध प्रसंग यांच्या बारीक सारीक नोंदी, निरीक्षण, वाचन यांची सुरेश कुंकुलोळ यांनी मागील सुमारे २५ वर्षांपासून डायरीत नोंदी लिहल्या आहेत. हे त्यांचे डायरी लेखन व अनुभवातून आलेली निरीक्षण यांचे सहज सोपी भाषेत सर्वस्तरातील वाचकांना उपलब्ध करण्यासाठी व्हॉईस ऑफ मिडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी पुढाकार घेऊन व्हॉईस ऑफ मिडियाचे राज्य उपाध्यक्ष अजित कुंकुलोळ यांच्या सहकार्याने माझ्या नोंदी व अर्थपूर्ण शोध या दोन प्रेरणादायी व संग्रही ठेवण्यासारख्या पुस्तकांची निर्मिती केली आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज संगीतमय चरित्र कथेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन (३७५ वर्षे) त्रिशत्कोत्तर अमृत महोत्सवी वर्षानिमित्त धाराशिव शहरातील बार्शी नाका येथील स्वयंवर मंगल कार्यालयात शनिवार दि.२८ डिसेंबर ते शुक्रवार दि.३ जानेवारीपर्यंत दररोज सायंकाळी चार ते सात पर्यंत कथा प्रवक्ते हभप. दीपक महाराज खरात यांच्या अमृतवाणीतून सदर कथा सकल संत सेवा समिती धाराशिवमार्फत होत असून, रविवार दि.२९ डिसेंबर रोजी संत संमेलनाचे आयोजन केलेले आहे.

याप्रसंगी अनेक कीर्तनकार प्रवचनकार सत्संगी आवर्जून उपस्थित राहणार आहेत. त्याचे रीतसर नियोजन झालेले असून, उद्घाटन सकाळी साडेनऊ वाजता होणार आहे. सदर परिसंवाद तीन सत्रामध्ये दुपारी तीन वाजेपर्यंत होणार आहे. तसेच याप्रसंगी नॅचरोपॅथी तज्ञ हभप. ईश्वर महाराज कुंभार यांच्या पुढाकाराने पंचगव्य नॅचरोपॅथी आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे आयोजन केलेले असून, तपासणी ही मोफत व तज्ञ डॉक्टरांचे सल्ला व मार्गदर्शन होऊन, अल्प दरात औषध दिले जाणार आहे. तरी या सर्व कार्यक्रमांचा धाराशिव व परिसरातील भाविकांनी आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन सकल संत सेवा समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### सिद्धार्थ शिंगाडे व ममता शिंगाडे यांची न.प.प्रा. शाळेस सदिच्छा भेट

**तुळजापूर, दि.२३ डिसेंबर -**

राष्ट्रीय चित्रकार सिद्धार्थ शिंगाडे व ममता शिंगाडे यांनी सहकुटुंब नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.२ ला सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांची संवाद साधला व विद्यार्थ्यांमध्ये विविध कलेविषयी आवड निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सोलापूर येथील छाया प्रकाशन फाउंडेशनच्या वतीने प्रेरणा पुरस्कार स्वीकारण्यासाठी आले असता आपण ज्या प्राथमिक शाळेत शिकलो. त्या प्राथमिक शाळेला भेट देण्यासाठी शाळेत आलो असल्याचे सांगितले. सिद्धार्थ शिंगाडे हे नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.२ चे माजी विद्यार्थी असून प्रेरणा पुरस्काराची एक लाख रुपयाची रक्कमे पैकी २५ टक्के रक्कम विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी देणार असल्याचे सांगितले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गणेश रोचकरी, सहशिक्षक महेंद्र कावरे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य महेंद्र पाटील सुज्ञानी गिराम शिवाजी डाके सह चित्रकार ममता शिंगाडे, शिलीव शिंगाडे, विजयमाला शहाजी शिंगाडे उपस्थित होते.

### आम्मा वाचनालयास युनिटी मल्टीकॉन्स कंपनीकडुन पुस्तके भेट

**नळदुर्ग, दि.२३ डिसेंबर -**

नळदुर्ग येथील माजी नगरसेवक व शहर ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष विनायक अहंकारी यांनी वाचन संस्कृती जिवंत राहावी यासाठी सुरु केलेल्या आम्मा वाचन कट्टास व आम्मा वाचनालयास नागरिकांकडुन मोठा प्रतिसाद मिळत आहे. दि.२३ डिसेंबर रोजी युनिटी मल्टीकॉन्स कंपनीकडुन आम्मा वाचनालयांस १०१ पुस्तके भेट देण्यात आली. युनिटीचे मल्टीकॉन्स कंपनीचे कार्यकारी संचालक कफील मौलवी, युनिटीचे संचालक जयधवल करकमकर व संचालिका वैशाली. जैन यांच्या हस्ते हे पुस्तके देण्यात आली. आतापर्यंत या वाचनालयास महाराष्ट्र पोलीस प्राधिकरण समितीचे सदस्य उमाकांत मिटकर यांनी ५१ पुस्तके भेट दिली. दगडु जाधव गुरुजी यांनी ५१ श्यामची आई ही पुस्तके दिली. तर सुनिल उकंडे आणि कविता पुदाले यांनीही ५१ पुस्तकं भेट दिली आहेत.

### कुलस्वामिनी आश्रमशाळेत राष्ट्रीय गणित दिवस साजरा

**जळकोट, दि.२३ डिसेंबर -**

जळकोट येथील श्री कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. भारतीय गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पुजन प्राचार्य संतोष चव्हाण व कार्यक्रमाचे अध्यक्ष गुरव प्रमुख पाहुणे श्रीमती कुंचगे, कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात कुंचगे यांनी गणितीय दिनाचे महत्त्व विशद केले. गणितीय रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमाला प्रा. ज्योतिका चव्हाण, चौगुले, लवंद, कांबळे, अभिजीत चव्हाण, कारले, कोकाटे, कदम, पांढरे, हक्के, मुखम, खारे, शिक्षकेत्तर कर्मचारी देवकते, पांचाळ, जंगले, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दुधभाते तर आभार प्राध्यापिका लबडे यांनी मानले.



### गाडगे बाबा स्मृतिदिनानिमित्त वेद शैक्षणिक संकुलात स्वच्छता अभियान

**कळंब, दि.२३ डिसेंबर -**

स्वच्छतेचा सं टवदेश देणारे गाडगे बाबा महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि.२० डिसेंबर रोजी धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या प्रेरणेने व भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतिश मातने यांच्या मार्गदर्शनाखाली वेद शैक्षणिक संकुल अंतर्गत भैरवनाथ अध्यापक विद्यालय व भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थींनी दि.२० डिसेंबर रोजी कॅम्पसमध्ये स्वच्छता मोहीम राबवून गाडगे बाबांना अभिवादन केले. यावेळी भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सूरज भांडे, निदेशक अविनाश म्हेत्रे, निदेशक राजकुमार शिंदे, आदित्य गायकवाड, विनोद कसबे, विनोद जाधव आदींची उपस्थिती होती.

### अतुल सावे यांचा सत्कार

**जळकोट, दि.२३ डिसेंबर -**

राज्याच्या महायुती सरकारमध्ये संभाजीनगरचे अतुल सावे यांनी ओबीसी विकास व दुग्धविकास मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील समर्थ बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्थेच्यावतीने संभाजीनगर येथे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. जळकोट येथील संस्थेचे अध्यक्ष रामशेट्टी पाटील यांनी राज्याचे ओबीसी विकास व दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांची संभाजीनगर येथे निवासस्थानी भेट घेऊन मंत्री पदावर विराजमान झाल्याबद्दल सत्कार केला. यावेळी मंत्री अतुल सावे यांचे पुत्र अनुराग सावे व कार्यकर्ते उपस्थित होते.

## उत्पन्नावर आधारित विमा योजना सुरु करण्याचा आ. पाटील यांचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी वेगळी व विस्तृत प्रधानमंत्री पिक विमा योजना आणली. या योजनेच्या माध्यमातून देशभरातील शेतकऱ्यांना पूर्वीच्या पिक विमा योजनेच्या तुलनेत अधिकचा न्याय मिळाला. ही योजना उत्पादनावर आधारित नुकसान भरपाईची आहे, मात्र योग्य बाजारभाव न मिळाल्याने देखील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते आणि हीच बाब लक्षात घेऊन राष्ट्रीय शेतकरी दिनाचे औचित्य साधत उत्पन्नावर आधारित पीक भाव संरक्षण योजना सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी आज दि.२३ डिसेंबर रोजी प्रतिष्ठान भवन येथे आयोजित पत्रकार परिषद बोलताना केला.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या माध्यमातून आज उत्पादनावर आधारित पीक विमा शेतकऱ्यांना मिळतो, मात्र अनेक वेळा बाजारातील भाव कोसळल्याने उत्पादन असूनही शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. महायुती सरकारने भावांतर योजनेच्या माध्यमातून मागील खरीप हंगामात सोयाबीन पिकासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी रुपये पाच हजार अनुदान दिले. या हंगामात देखील बाजारभाव कमी असल्याने शासनाच्या माध्यमातुन सोयाबीनची आधारभुत किमतीने खरेदी सुरु आहे.

शेतकऱ्यांचे बाजार भावातील घटीमुळे नुकसान होऊ नये, यासाठी पीक भाव संरक्षण योजना लागू करण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. या अनुषंगाने १ जानेवारी २०२५ रोजी सर्व ग्राम पंचायतीने याबाबतचा ग्रामसभेचा ठराव घेण्याचे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. जागतिक बाजारपेठेमुळे अनेकदा शेतमालाचे भाव कोसळतात, यामध्ये शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. ही बाब टाळण्यासाठी अशा योजनेची नितांत गरज असल्याचे ते म्हणाले. या बाबत कृषी क्षेत्रातील तज्ञांसोबत विचार विमर्ष झाला आहे. जगातील काही देशामध्ये अशा प्रकारच्या विमा योजना राबविल्या जातात, याला इंन्शुरन्स प्रॉडक्टस असे संबोधले जाते. शेतकऱ्यांना शाश्वत आर्थीक उत्पन्न मिळवुन देण्यासाठी अशा प्रकारची योजना अत्यंत फायदेशीर राहणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या योजनेचे महत्व अधोरेखीत करुन हा विषय केंद्र सरकार कडे मांडण्याची विनंती करणार असल्याचे ते म्हणाले.

यावेळी भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, तेरणा साखर कारखान्याचे माजी चेअरमन सुरेश देशमुख, माजी जि.प उपाध्यक्ष शिवाजीराव नाईकवाडी, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य सतीश दंडनाईक, माजी जि.प उपाध्यक्ष सुधाकर गुंड गुरुजी, निहाल काझी, संजय लोखंडे आदी उपस्थित होते.

## राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड चाचणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

राजस्थानातील जयपूर येथे ७ ते १३ जानेवारी २०२५ पर्यंत राष्ट्रीय व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन केले आहे.या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी खुल्या गटाची राज्य निवड चाचणी घेतली जाणार आहे. या निवड चाचणीसाठी क्रीडापटूंनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

इंडियन असोसिएशनकडून ऑलिम्पिक अँडहॉक समिती नियुक्त केली आहे. ॲडहॉक समिती व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याकडून वरीष्ठ गटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. महिला व पुरुष गटासाठी पुणे येथील आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे २६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता चाचणी घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कसगावडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

## तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या विकास कामासंदर्भात बैठक

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ डिसेंबर -**



श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या नवीन विकास आराखड्याच्या कामासंदर्भात बैठक आज (दि.२३) रोजी जिल्हाधिकारी मैनक घोष यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत मंदिर संस्थानच्या नवीन विकास आराखड्याच्या कामासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील, उपविभागीय अधिकारी संजयकुमार ढवळे, तहसीलदार अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक श्रीमती माया माने, सहायक व्यवस्थापक (स्थापत्य) राजकुमार भोसले व कंत्राटदार कंपनीचे अधिकारी आदी उपस्थित होते. कंत्राटी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी व्हिडिओ कॉंफेरेन्सच्या माध्यमातून मिटिंग मध्ये कामाच्या विविध टप्प्यांचे सादरीकरण केले.

बैठकीनंतर जिल्हाधिकारी मैनक घोष व आ. पाटील यांनी कामाची प्रत्यक्ष पाहणी केली.

## विस्माचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे यांची सेन्ट्रल रेल्वे उपभोक्ता सल्लागार समिती सदस्यपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

वेस्ट इंडियन शुगर मील्स् असोसिएशन, पुणे या खाजगी साखर कारखाना संघटनेचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे यांची सेन्ट्रल रेल्वे उपभोक्ता सल्लागार समिती सदस्य म्हणून निवड केल्याचे सेन्ट्रल रेल्वेने नुकतेच दि.२६ नोव्हेंबर रोजी पत्राद्वारे कळवले आहे.

सेन्ट्रल रेल्वे उपभोक्ता सल्लागार समिती सदस्य म्हणून विस्माचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे हे महाराष्ट्रातील मध्य रेल्वेच्या कार्यकक्षेतील सर्व प्रकारच्या सेवा उपभोक्ता सल्लागार समितीवर सदस्य म्हणून महाराष्ट्रातील साखर उद्योग तसेच अन्नधान्य वाहतुक व विविध उपभोक्तांचे प्रतिनिधीत्व करणार असून त्यांची नियुक्ती ३० सप्टेंबर २०२६ अखेर पुढील २ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आल्याचे मध्य रेल्वे महा प्रबंधक यांनी कळवले आहे. त्यांच्या प्रयोगशिलतेचा व उद्योगातील अनुभवाचा लाभ होणेचे दृष्टीने सेन्ट्रल रेल्वे बोर्डाने सदर कमिटीवर सदस्य म्हणून त्यांची निवड केली आहे.



बी.बी. ठोंबरे यांच्या निवडीमुळे सेन्ट्रल रेल्वे बोर्डा मार्फत साखर उद्योग व धान्य वाहतुकीसह ईतर सर्व रेल्वे उपभोक्त्यांना येणा-या समस्या आणि त्यावरील उपाय योजना याबाबत रेल्वे सोबत संवाद साधून त्यावर तोडगा काढण्याच्या दृष्टीने बी.बी. ठोंबरे नक्कीच योग्य ते मार्गदर्शन व सूचना करतील आणि त्याचा सेन्ट्रल रेल्वे बोर्ड आणि देशातील शेतकऱ्यांना रेल्वे वाहतुकीचे माध्यमातून नक्कीच लाभ होईल.

बी.बी. ठोंबरे यांचे सेन्ट्रल रेल्वे बोर्डाचे ॲडव्हायझरी कमिटीवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल विस्माचे सर्व सदस्य साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, साखर उद्योगातील मान्यवर, नॅचरल शुगरचे संचालक, प्रवर्तक यांनी बी.बी. ठोंबरे यांचे अभिनंदन केले आहे.

## कांद्यावरील निर्यात शुल्क कमी करा : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

केंद्र सरकार कडून कांदा पिकावर २० टक्के निर्यात शुल्क आकरल्यामुळे भारतातून होणारी कांद्याची निर्यात मंदावली आहे. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान व केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याकडे पत्राव्दारे केली आहे.



खरीप हंगाम २०२४ मध्ये महाराष्ट्रातील नाशिक सह धाराशिव व सोलापूर जिल्हयात खरीप, लेट खरीप कांदा पिकाचे मोठया प्रमाणात उत्पादन घेतले जाते. शेतकऱ्यांना आर्थीक उत्पन्न देणारे प्रमुख बागायती पिकापैकी कांदा हे महत्वाचे पिक आहे.गतवर्षी लोकसभेच्या निवडणुका डोळयासमोर ठेवून सरकारने शेतकऱ्यांच्या कांद्यावरती २० टक्के एवढे निर्यात शुल्क लावले होते. यामुळे कांदा निर्यात न होता देशांतर्गत बाजार पेठेत कांदा विक्री कमी दराने झाली. चालू वर्षामध्ये कांदा पिकाचे उत्पादन चांगले मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात झालेल्या पावसात सदर पिक वाचविले. त्यातून चांगले उत्पन्न मिळण्याची अशा शेतकऱ्यांना होती. सध्या कांदा पिकाचा हंगाम सुरु असून खरीप हंगामातील कांदा विक्रीयोग्य झाल्याकारणाने शेतकऱ्यांनी कांदा बाजार पेठेत पाठविण्यास सुरुवात केली आहे. लासलगाव व सोलापूर येथे बाजारपेठेत कांद्याचे आवक मोठया प्रमाणात सुरु झाली असून यामुळे कांद्याचे दर मागील १५ दिवसाच्या तुलनेत खालच्या पातळीवरती आले आहे.

लेट खरीप व भविष्यातील रब्बी हंगामातील कांदा बाजार पेठेत उपलब्ध झाल्यास कांद्यावर केलेला खर्च देखील निघणे अवघड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे कांद्यावरील २० टक्के निर्यात दर हटवल्यास श्रीलंका, बांगलादेश व अन्य देशांकडून मोठया प्रमाणात भारतीय कांद्याची खरेदी केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना आपेक्षीत दर मिळेल. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे व्यथा लक्षात घेता केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान व केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याकडे पत्राव्दारे २० टक्के निर्यात दर हटवून तात्काळ निर्यात सुरु करणेबाबत पत्राव्दारे विनंती केली आहे.

## केंद्रीय गृहमंत्र्यांच्या निषेधार्थ भीम आनुयायींचा परंड्यात मोर्चा





### परभणी व बीडच्या मस्साजोग घटनेचाही निषेध; तहसिलदार यांना निवेदन...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ डिसेंबर -**

देशाचे गृहमंत्री भाजप नेते अमित शहा यांनी संसदेमध्ये बोलताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान होईल असे खेदजनक वक्तव्य केले आहे. त्याच्या निषेधार्थ दि.२३ डिसेंबर सोमवार रोजी भिम आनुयायी प्रेमकडून परंडा येथे रेवणी भिमनगर येथुन तहसील कार्यालयावर विराट असा मोर्चा काढण्यात आला देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी माफी मागुन गृहमंत्री पदाचा राजीनामा देवा अशी मागणी करत हा विराट मोर्चा भिमनगर मार्गे, महत्मा फुले चौक, मंडई पेठ, शिवाजी चौक या मार्गावरून घोषणाबाजी करीत तहसिल कार्यालयावर धडकला.

मोर्चेकऱ्यांच्या वतीने परभणी येथील घटनेचा निषेध करीत मयत सोमनाथ सुर्यवंशी व बीड मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील दोषींना तात्काळ फाशी देण्याची मागणी मोर्चेकरांकडून निवेदनाव्दारे तहसिलदारांमार्फत महाराष्ट्र शासनाकडे करण्यात आली आहे. यावेळी अनेकांनी आपले विचार मांडले असून गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा आणि यापुढे कोणत्याही भाजपाच्या नेत्यांनी महापुरुषाविषयी अवमानस्पद वक्तव्य केल्यास त्यांना देशात व महाराष्ट्रात फिरू देणार नाही असा इशाराही मोर्चेकरांनी दिला आहे.

यावेळी भीम अनुयायी प्रेमी संजय बनसोडे, राहुल बनसोडे, रत्नकांत पापा शिंदे, राजेंद्र निकाळजे, दिपक गायकवाड, संजय शिंदे, दादा चौतमाल, तानाजी शिंदे, आकाश बनसोडे, उत्तम ओव्हाळ, गुलाब शिंदे, घनश्याम शिंदे, नागसेन चौतमहाल आदीसह भीम प्रेमी महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यात्रेपूर्वी बोरी नदी, नदी घाटाची स्वच्छता करण्याची भाविकांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ डिसेंबर -**

नगरपालिका तसेच जिल्हा प्रशासनाने श्रीक्षेत्र मैलारपुर (नळदुर्ग) येथील बोरी नदी तसेच नदी घाटाची श्री खंडोबा यात्रेपुर्वी स्वच्छता करावी अशी मागणी भाविक व नागरीकांमधुन होत आहे.





नळदुर्ग (मैलारपुर) येथील श्री खंडोबा देव प्रसिद्ध असुन अनेकांचे ते कुलदैवत आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यातील लाखो भाविकांचे मैलारपुर येथील श्री खंडोबा देव श्रद्धास्थान आहे. सध्या पावणेदोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी श्री खंडोबा देवाचे मैलारपुर येथील मंदिरात वास्तव्य आहे. दि.१२ ते १४ जानेवारी २०२५ या कालावधीत याठिकाणी श्री खंडोबाची मोठी यात्रा भरते. श्री खंडोबा यात्रेदिवशी याठिकाणी भाविकांची मांदियाळी असते. लाखो भाविक याठिकाणी येतात येणारा प्रत्येक भाविक मंदिरासमोर असणाऱ्या बोरी नदीमध्ये स्नान करुन मगच खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात येतात. अनेक भाविक विशेष करून महिला भाविक या बोरी नदीमध्ये स्नान करून ओल्या कपड्याने बोरी नदीपासुन मंदिरापर्यंत देवाला दंडवत घालत येतात. खंडोबाचे भक्त या नदीमध्ये स्नान करणे पवित्र मानतात इतके महत्व या नदीला आहे. यावर्षी बोरीनदी मध्ये मुबलक पाणी आहे.

मात्र सध्या बोरी नदी घाणीने भरली आहे. बोरी नदीच्या पाण्यात वेल, वनस्पती मोठ्या प्रमाणात आले आहे.

हे पाण्यातील वेल भाविकांसाठी अतिशय धोकादायक म्हणुन ओळखले जाते. अनेकदा या वेलीमध्ये अडकुन भाविकांचा मृत्यु होण्याच्या घटना याठिकाणी घडल्या आहेत. या यात्रेमध्ये अशी दुर्दैवी घटना घडु नये यासाठी नगरपालिका प्रशासन व जिल्हा प्रशासनाने खंडोबा यात्रेपुर्वी भाविकांच्या सुरक्षेसाठी व भाविकांना व्यवस्थित स्नान करता यावे यासाठी नदीतील वनस्पती, वेल तसेच भाविकांनी पाण्यात सोडलेले साहित्य काढुन नदी स्वच्छ करावे. नदी स्वच्छ करण्याबरोबरच नदी घाटही स्वच्छ करणे गरजेचे आहे. सध्या नदी घाटावर ज्याठिकाणी भाविक स्नान करतात त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात गवत व काटेरी झुडपे आले आहे हे सर्व काढुन घाट स्वच्छ करणे गरजेचे आहे.

यात्रा अगदी तोंडावर आली असुन अवघ्या १९ दिवसांवर यात्रा येऊन ठेपली आहे त्यापुर्वी नगरपालिका व जिल्हा प्रशासनाने बोरी नदी आणि नदी घाटाची स्वच्छता करुन घेणे गरजेचे आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### २३ डिसेंबर ते ३ जानेवारी प्रत्यक्ष क्षयरुग्ण शोध मोहीम

**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्रत्यक्ष क्षयरुग्ण शोध मोहिम २३ डिसेंबर २०२४ ते ३ जानेवारी २०२५ पर्यंत राबविण्यात येणार आहे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ही मोहीम राबविण्यात येत आहे. शहरी व ग्राम ीण भागात अतिजोखमीच्या ठिकाणी तयार केलेल्या कृती आराखड्यानुसार आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, क्षेत्रीय स्तरावरील आरोग्य कर्मचारी व स्वयंसेवक यांच्या ९३ पथकाकडून दररोज ४० ते ५० घरांना भेटी देणार आहेत. त्यामध्ये ३८ हजार २२१ कुटुंबाचे सर्वेक्षण केले जाणार आहे. या मोहिमेचे उद्दिष्ट क्षयरोगाच्या निदानाअभावी अद्यापही वंचित असणाऱ्या संशयित क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांना क्षयरोग निदान करून औषधोपचारावर आणणे हे आहे.या मोहिमेमध्ये प्रशिक्षित पथकाद्वारे गृहभेट देऊन क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्यात येऊन संशयीत क्षयरुग्णाचे थुंकी नमुने व एक्सरे तपासणी तसेच आवश्यकतेनुसार इतर तपासण्या करण्यात येणार आहेत. क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तींचे रोग निदान व नवीन आढळलेल्या क्षयरुग्णांना औषध उपचार सर्व आरोग्य संस्थामार्फत मोफत उपलब्ध आहेत.

### नववर्षाच्या निमित्ताने मद्य विक्रीची परवाना दुकाने उशिरापर्यंत सुरू राहणार

**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

नाताळ व नववर्षानिमित्ताने विदेशी मद्य किरकोळ विक्रीची, बियर विक्रीची, परवाना कक्ष,क्लब परवाना असलेली तसेच मद्य विक्रीची दुकाने २४ डिसेंबर, २५ डिसेंबर आणि ३१ डिसेंबर २०२४ रोजी निर्धारित वेळेनंतर रात्री १०.३० ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत तर काही दुकाने पहाटे ५ वाजेपर्यंत उघडे ठेवण्यास जिल्हाधिकारी डॉ.मैनक घोष यांनी एका आदेशद्वारे मान्यता दिली आहे. यामध्ये एफएल -२ (विदेशी मद्य किरकोळ विक्रीचे दुकान), एफएलबीआर -२ (बंद बाटलीतून बीअर विक्री) दुकाने रात्री १०:३० ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत तर एफएल -३ (परवाना कक्ष) असलेली मद्यविक्रीची दुकाने आणि एफएल -४ (क्लब परवाना असलेली मध्यविक्रीची दुकाने) रात्री ११.३० ते दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजेपर्यंत आणि सीएल -३ प्रकारातील मद्यविक्रीची परवाना दुकाने अ व ब वर्गाच्या नगरपालिका क्षेत्रात रात्री ११ ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत व इतर ठिकाणी रात्री १० ते दुसऱ्या दिवशी पहाटे १ वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### जि.प.च्या ३५० कर्मचाऱ्यांनी घेतला प्रकृती परीक्षण शिबिराचा लाभ

**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

२६ नोव्हेंबर ते २५ डिसेंबर या कालावधीत देश का प्रकृती परीक्षण अभियान राबविले जात आहे. या अभियानात जिल्ह्यातील १८ ते ७० वर्ष वयोगटातील सर्व नागरिकांची आयुर्वेद तज्ञाकडून परीक्षण केले जात आहे. १९ व २० डिसेंबर रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह धाराशिव येथे हे शिबिर घेण्यात आले. हे शिबिर सार्वजनिक आरोग्य विभाग आणि शासकीय आयुर्वेद महाविद्यालय धाराशिव यांच्या संयुक्त वतीने घेण्यात आले. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष यांची प्रकृती परीक्षण शासकीय आयुर्वेद महाविद्यालय येथील प्रा.डॉ. मयूर देशमुख यांनी केले.जिल्हा परिषदेच्या ३५० अधिकारी-कर्मचारी यांनी आपले प्रकृती परीक्षण करून घेतले. या दोन दिवसांच्या प्रकृती परीक्षण करण्यासाठी शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नागनाथ गंगासागरे यांचे आणि आयुर्वेद तज्ञांचे सहकार्य लाभले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. या शिबिरासाठी जिल्हा आयुष्य अधिकारी डॉ. गजानन परळीकर, आयुष जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. विकास पवार व सर्व आयुष वैद्यकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय यांनी परिश्रम घेतले.

### शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याबद्दल ग्रा.पं. व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**कळंब, दि.२३ डिसेंबर -**

तालुक्यातील गौरगाव येथे जि.प.प्रा. शाळेच्या प्रांगणात शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याबद्दल प्रज्ञा प्रकाश पाटोळे (निलंगा नगर परिषद पाणीपुरवठा अभियंता),गौरी कमलाकर कापसे यांची (एम.बी.बी.एस नाशिक), अक्षय लहु माने सहाय्यक अभियंता जलसंपदा (लातूर), निरंजन बाबासाहेब पाटोळे कॅनल इंस्पेक्टर (लातूर), चक्रधर सुहास कापसे एच.आर. असिस्टंट (पुणे), कृष्णकांत राजेंद्र कापसे (सीआरपीएफ), शुभम जराचंद कापसे (सीआरपीएफ) आदींची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याबद्दल ग्रामपंचायत कार्यालयाच्या व ग्रामस्थांच्या वतीने याप्रसंगी सरपंच सचिन कापसे, उपसरपंच काकासाहेब पाटोळे, मधुकर कापसे, गुणवंत सपकाळ, विकास कापसे, ढोले, गवळी, गोरे, घाडगे, ताकपिरे, सतीश कापसे, अंकुश कापसे, पांडुरंग पाटोळे, लालासाहेब पाटोळे, सर्व ग्रा.पं.सदस्य पंडित पाटोळे, महेश कापसे, कांताबाई पाटोळे, नंदुबाई कांबळे, जनार्दन पाटोळे, योगीता कापसे,शालेय कमिटी अध्यक्ष कमलेश कदम यांच्या सह ग्रामस्थ व शिक्षक यावेळी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची आवड निर्माण होण्यासाठी गणित शिक्षकांनी प्रयत्न करावा : नन्नवरे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ डिसेंबर -**

विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची भीती जाऊन गणित विषया बद्दल आवड, गोडी निर्माण होण्यासाठी गणित शिक्षकांनी विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन प्राचार्य नंदकुमार नन्नवरे यांनी केले आहे. धाराशिव येथील भोसले हायस्कूलम ध्ये राष्ट्रीय गणित दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

श्रीपतराव भोसले हायस्कूलम ध्ये आयोजित राष्ट्रीय गणित दिन कार्यक्रमात प्राचार्य नन्नवरे बोलत होते. प्रारंभी मान्यवरांच्याा हस्ते



प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य एन. आर. ननवरे, उपप्राचार्य एस.के. घारगे, प्रा. ज्योती शिंदे, प्रा.जे.एस. पाटील, प्रा.पी.एस. म ाशाळकर आदिंची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य नन्नवरे यांनी परीक्षा तसेच सेमिनारमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी आदर्श महाजन, वैष्णवी काकडे, जान्हवी औताडे, समृध्दी कन्हेरे, स्वराली जाधव, सुल्तान शेख, पठाण तौहीद, लक्ष्मी काटे आदि विद्यार्थ्यांनी गणित तज्ञ रामानुजन यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे केली. यानंतर प्रा.एस.के. कापसे, उपप्राचार्य घारगे यांनी मार्गदर्शन केले तर अध्यक्षीय समारोप प्राचार्य नन्नवरे यांनी केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक प्रा. ज्योती शिंदे यांनी तर सुत्रसंचालन शताब्दी जमदाडे यांनी केले.

### या विद्यार्थ्यांना केले सन्मानित...

यावेळी गणित परीक्षा तसेच सेमिनार मध्ये उल्लेखनीय कामगीरी करणाऱ्या सुभान देशमुख, सागर दळवी, समृध्दी कन्हेरे, ओंकार आदलींगे, संचिता पाटिल, सोबणे भक्ती, हरिप्रीया ढेकणे आणि अयाण सय्यद, आर्यन पवार आदि गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# सोलर प्रकल्प रद्द करून इतरत्र स्थलांतरीत करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ डिसेंबर -**

नळदुर्ग येथील अत्यंत महत्वाच्या ठिकाणी होत असलेला सोलर प्रकल्प रद्द करुन तो इतरत्र स्थलांतरीत करावे अशी मागणी नळदुर्ग शहरातील नागरीकांनी धाराशिव जिल्हाधिकारी व आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, नळदुर्ग येथील नळदुर्ग-तुळजापुर रोडलगत असलेल्या सर्व्हे नं. २३६/७ मधील ११ हेक्टर २६ आर या जागेवर शासनाच्या मुख्यमंत्री सौर क्रांती वाहिनी योजनेअंतर्गत नवीन सौर प्रकल्प मंजुर झालेला आहे.

मात्र ज्या जागेवर हा प्रकल्प होत आहे ती जागा नळदुर्ग शहराच्या भौगोलिक स्थितीमध्ये अत्यंत महत्वाची आहे. नुकतेच महाराष्ट्र शासनाने नळदुर्ग शहरासाठी अप्पर तहसिल कार्यालय मंजुर केलेले आहे.

त्यामुळे येणाऱ्या काळात नळदुर्ग हा तालुका होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात नळदुर्ग तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर निर्माण होणाऱ्या विविध शासकीय कार्यालयासाठी, नवीन इमारतीसाठी ही जागा अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे हा मंजुर झालेला सौर प्रकल्प हा इतर ठिकाणी स्थलांतरीत करून ही जागा नळदुर्ग शहराच्या विकासासाठी राखीव ठेवण्यात यावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर भाजपचे सुशांत भुमकर, धीम ाजी घुगे, रणजितसिंह ठाकुर, संजय मोरे, सुधीर हजारे, सुहास येडगे, विलास येडगे, छामाबाई राठोड, सतीश पुदाले, सुभाष कोरे, पांडुरंग पुदाले, विनायक पुदाले, एस.के. बागवान, रमेश जाधव, सुजित सुरवसे यांच्यासह नळदुर्ग शहरातील आदि नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## डॉग शो प्रदर्शनामध्ये सिंबाने मारली बाजी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

सोलापूर येथे झालेल्या श्री सिद्धेश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शनातील डॉग शो मध्ये धाराशिवच्या सिंबाने बाजी मारत द्वित्तीय क्रमांक पटकाविला आहे.

धाराशिव येथील अमित

हनुमानदास सारडा यांचा सायबेरियन हस्की या प्रजातीचा डॉग असून त्याला डॉग ट्रेनर वाल्मिकी आकोसकर व करण अकोसकर मु.पो. कोळेवाडी यांनी ट्रेन केले आहे.

सिंबाला डॉग शोसाठी अमित हनुम ानदास सारडा, ॲड. हेमंत कुमार कठारे, डॉग ट्रेनर वाल्मिकी अकोसकर व करण अकोसकर,

यांच्यासोबत सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शन २०२४ येथे भरविण्यात आलेल्या डॉग शोसाठी नेण्यात आले होते.

तेथे त्याने हस्की श्वान ग्रुपमध्ये द्वितीय क्रमांक पटकावत द्वित्तीय विनर ट्रॉफी व सर्टिफिकेट मिळवले आहे.



# तेरणा पब्लिक स्कूलमध्ये गणित व किसान दिन उत्साहात साजरा





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

शहरातील तेरणा पब्लिक स्कूल (सीबीएसई) येथे गणित दिन व किसान दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष पद्माकर फंड, सचिव रत्नदीप वाकुरे यांच्या हस्ते गणिततज्ज्ञ रामानुजण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी बनविलेल्या गणित विषयाशी निगडित प्रोजेक्ट व चार्टचे फीत कापून उदघाट्न करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रम सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी समूह नृत्याद्वारे व लघुनाटिकेद्वारे व भाषणे करून गणित विषयाचे महत्व पटवून दिले.

तेरणा पब्लिक स्कूल मधील गणित विषयाच्या सर्व शिक्षकांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या प्रोजेक्ट व चार्टचे संस्थेचे अध्यक्ष पद्माकर फंड, सचिव रत्नदीप वाकुरे, प्राचार्य विलास मोरे, प्राचार्य विलास बचाटे, गणित शिक्षकांनी कौतुक करून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणित शिक्षक शिवाजी शेलार, शिवरत्न सूर्यवंशी, सुहासिनी मसे, अश्विनी जाधव, सुप्रिया गोसावी, अनुजा उंदरे, संतोष राऊत, राजश्री विधाते,

शुभांगी आडसुळ, अरुणा विभुते, शुभांगी खोत, वर्षा रणसर्जे यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्राचार्य विलास मोरे, प्राचार्य

विलास बचाटे, यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.
सूत्रसंचालन राजश्री विधाते यांनी केले.

आभार संतोष राऊत यांनी मानले.

# रिजर्व बँक ऑफ इंडियाच्या नवीन परिपत्रकाप्रमाणे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वाढीव रक्कमेचे पीक कर्ज वाटप करावे

## भारतीय किसान संघाची जिल्हाधिकारी धाराशिव यांना निवेदनाद्वारे मागणी..

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

देशभरातील वाढत्या महागाईच्या व कच्या मालाच्या महागाईमुळे खते बियाणे यांच्या किंमती वाढल्या आहेत. या महागाईच्या पार्श्वभूम ीवर विनातारण, विनागहाणखत, शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या कृषी कर्जाची मर्यादा रिजर्व बँक ऑफ इंडिया ने १.६० लक्ष वरून २ लक्ष केली आहे.

या बाबतचे परिपत्रक दि.६ डिसेंबर २०२४ रोजी रिजर्व बँक ऑफ इंडिया ने देशातील सर्व बँकांना काढले आहे.

या परिपत्रकानुसार धाराशिव जिल्ह्यातील सर्व बँकांनी शेतकऱ्यांना वाढीव रक्कमेचे वाटप करावे.

व या अभिनंदनीय निर्णयाची प्रसिद्धी प्रचार करावा या मागणीचे निवेदन भारतीय किसान संघ जिल्हा धाराशिवच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

या निवेदनावर भारतीय किसान संघ महाराष्ट्र प्रांताचे उपाध्यक्ष रावसाहेब शहाणे पाटील व जिल्हाध्यक्ष नितीन घुले वाशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधानाचा नळदुर्गमध्ये निषेध

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ डिसेंबर -**

भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल देशाच्या गृहमंत्र्यांनी केलेल्या आक्षेपार्ह विधान बद्दल त्यांच्या निषेधार्थ आणि परभणी येथील भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभुत असलेल्या संबंधित पोलिस प्रशासनाच्या विरोधात नळदुर्ग येथे नळदुर्ग आणि परिसरातील भिमसैनिकांच्या वतीने नळदुर्ग शहर बंद करण्याबरोबरच निषेध मोर्चा काढुन विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी नळदुर्ग बंदला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला.

गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आंबेडकर, आंबेडकर असे म्हणण्याची फॅशन झाली आहे, असे म्हणुन त्यांचा अवमान केला.

त्यांच्या या आक्षेपार्ह विधानचा जाहीर निषेध व परभणी येथील भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभुत असलेल्या पोलीस प्रशासनाच्या विरोधात नळदुर्ग येथे भिमसैनिकांच्या वतीने कडकडीत नळदुर्ग शहर बंद करून निषेध मोर्चा काढण्यात आला.

या प्रसंगी गृहमंत्र्यांनी देशाची माफी मागुन गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा.

सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबाचे पन्नास लाख रुपये देऊन पुनर्वसन करावे, सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभुत असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी निलंबित करुन त्यांच्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा यासह विविध मागण्यांचे निवेदन नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना देण्यात आले.

यावेळी सुनील बनसोडे, बाबासाहेब बनसोडे, दुर्वास बनसोडे, एस.के. गायकवाड, किशोर नळदुर्गकर, कैलास गवळी, अरूण लोखंडे, योगेश बनसोडे, सचिन बनसोडे, सिध्दांत बनसोडे, अजयकुम ार बागडे, रूषीकेश कांबळे, अश्वजीत कांबळे, मारुती बनसोडे, ामकांत नागीले, दत्ता बनसोडे, महादेव कांबळे, राजेंद्र शिंदे, सरेश लोंढे, विश्वास रणे, तानाजी कदम, रवी वाघमारे, अनिल वाघमारे, महिला कार्यकर्त्यां उषा शिंदे, पिंकी भोसले, स्नेहा झेंडारे यांच्यासह नळदुर्ग व परीसरातील शेकडो भिमसैनिक उपस्थित होते.

## सामान्य प्रशासन विभागाचा लेखा परिक्षण अहवाल नागरिकांना पाहण्यासाठी खुला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद धाराशिव या कार्यालयाचे सन २०२१-२२ व २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे लेखा

परिक्षण सहाय्यक संचालक, थानिक निधी लेखा परिक्षा धाराशिव यांचेकडून करण्यात आले आहे. हा लेखा परिक्षण अहवाल कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर लेखा परिक्षण अहवाल जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर आणि जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर सर्व नागरिकांना पाहण्यासाठीखुला करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी दिली आहे.

# गोवर्धन दराडे, रामकिसन सोळंके, मिराताई मोटे यांना लोकसेवा पुरस्कार जाहीर

## बुधवारी होणार पुरस्काराचे वितरण...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

लोकसेवा समिती,धाराशिवच्या वतीने भारतरत्न, स्व. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंती दिनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थाना दिनांक २५ डिंसेबर रोजी मराठवाडा पातळीवरील लोकसेवा पुरस्कार दिला जातो.

यावर्षी या पुरस्काराचे मानकरी सर्वश्री गोवर्धन दराडे (ढेकणमोहा जि.बीड) पसायदान सेवा प्रकल्प, रामकिसन सोळंके (लिखितपिंपरी जि.जालना) प्रेरणादायी शिक्षण संकुल, मिराताई मोटे (नळदुर्ग जि.धाराशिव) पालवरची शाळा या सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जाणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. मिलींद पाटील अध्यक्ष, लोकसेवा पुरस्कार संयोजन समि ती, धाराशिव हे उपस्थित राहणार असून हा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम खा. प्रमोद महाजन बहुउद्देशीय सभागृह, आर्य चाणक्य विद्यालय परिसर, धाराशिव येथे बुधवार दि.२५ डिंसेबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवहान लोकसेवा समितीचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, सचिव कमलाकर पाटील व सदस्य शेषाद्री डांगे यांच्यासह आदिंनी केले आहे.

# विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून बांधला भाटशिरपूरा येथे वनराई बंधारा



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२३ डिसेंबर -**

भाई नारायणराव लोमटे माध्यमिक विद्यालय भाट शिरपुरा व कृषी विभाग कळंब यांच्या संयुक्त विद्यमानाने भाट शिरपुरा येथील नदीवर वनराई बंधारा विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या, कृषी विभागाच्या सहाय्याने वनराई बंधारा करण्यात आला.

यावेळी वनराई बंधाऱ्याचे फायदे तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच यावेळी कृषी पर्यवेक्षक भुजंग लोकरे, कृषी सहाय्यक चंदनशिव मॅडम, संस्थेचे सचिव बाळकृष्ण धस, मुख्याध्यापक सुरेश टेकाळे शाळेतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षके त्तर कर्मचारी यांनी सर्वांनी वनराई बंधारा उभारण्यासाठी परिश्रम घेतले. वनराई बंधारा उभारल्यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना कृषी विभागातर्फे केळी वाटप करण्यात आल्या.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहशिक्षक एस.जी. सूर्यवंशी यांनी केले.

# सन २०२५ वर्षातील स्थानिक सुट्ट्या जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ डिसेंबर -**

सन २०२५ या वर्षातील स्थानिक सुट्ट्या जिल्हाधिकारी डॉ. मैनक घोष यांनी जाहीर केल्या आहे. सन २०२५ या वर्षात तीन स्थानिक सुट्ट्या देण्यात आल्या आहे.

यामध्ये १७ जानेवारी २०२५ (शुक्रवार) हजरत ख्वाजा शम शुद्दीन गाजी रहे दर्ग्याचा ऊर्स,१ सप्टेंबर २०२५ (सोमवार) ज्येष्ठा गौरी पूजन आणि २० ऑक्टोबर २०२५ (सोमवार) नरक चतुर्दशी अभ्यंग स्नान या सुट्ट्यांचा सम ावेश आहे.

या स्थानिक सुट्ट्या जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालये, जिल्हा परिषदे अंतर्गत येणारी कार्यालये, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्यालये, कोषागार कार्यालये व इतर शैक्षणिक संस्था यांनाच लागू राहतील.

जिल्ह्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालये, केंद्र शासनाच्या कार्यालयांना व बँकांना या सुट्ट्या लागू राहणार नाही.

जा.क्र२०२४/महसूल/जन्म-मृत्यु नोंद/क्रमांक-

**जाहिर प्रगटन**

ज्याअर्थी अर्जदार **लांडगे जयनाबी खदीर रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव** यांचा जन्म दिनांक. ०१/०६/१९८३ रोजी मौ. परंडा तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद नगरपरिषद कार्यालय परंडा ता. परंडा जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सररहू अर्जदार **लांडगे जयनाबी खदीर** रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांच्या जन्मनोंदी बाबत/जन्मस्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

**दिनांक ०९/०८/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.**

**स्वाक्षरित /-**
**तालुका कार्यकारी**
**दंडाधिकारी, परंडा**

क्राईम वृत्त...



## कॅशचा लाभ देण्याची मागणी

**अहमदपूर, दि.२३ डिसेंबर -**

एम फिल अहर्ताधारका संदर्भात नागपूर येथे रस्तोगी, सचिव उच्च शिक्षण विभाग व देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण विभाग यांना नागपूर येथील प्राध्यापक शिस्ट मंडळ भेटले. यावेळी एम. फिल. अहर्ताधारकांच्या प्रश्नां संदर्भात युजीसीने सर्व प्रस्ताव स्कृटनी करून शासनाकडे यादया प्राप्त झाल्या असून लवकरच सर्व विद्यापीठांच्या कुलगुरू समवेत ऑनलाईन बैठक घेऊन या संदर्भात ज्या अध्यापकांच्या त्रूटी युजीसीने कळवलेल्या आहेत. त्या विद्यापीठाकडून दुरुस्त करून सर्व यादया युजीसीला पाठवल्या जातील. विद्यापीठाने लकरात लवकर त्रृटींचे निरासन जाईल असे आश्वासन देण्यात आले. यावेळी नागपूर व इतर विभागातील सर्व एम.फील. पात्रता धारक प्राध्यापक उपस्थित होते.



## गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी

**निलंगा, दि.२३ डिसेंबर -**

कर्मवीर राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांची ६८ वी पुण्यतिथी निलंगा येथे सकल परीट समाजाच्या वतीने विविध उपक्रमाने उत्साहात साजरी करण्यात आली. गाडगेबाबा महाराज मंदिर निलंगा येथे आयोजित या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून नगर परिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी दीपक आनंतवाळ, काँग्रेस पक्षाचे डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांब्रे, अंकुश ढेरे, धम्मानंद काळे, बसवराज पाटील, रत्नेश्वर गताटे, आयुब शेख, ज्ञानोबा महाराज पांचाळ, गोपाळ महाराज गायकवाड, सागावे, केशव जाधव, गाडगेबाबा दत्तात्रय शिंदे, विठ्ठलराव जगताप आदी उपस्थित होते. यावेळी संत गाडगेबाबा महाराजांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महिला व पुरुष भजनी मंडळाची स्थापना करण्यात आली. महिला भजनी मंडळाच्या अध्यक्षपदी सविता जगताप, उपाध्यक्षपदी वंदना शिंदे, सचिवपदी भारतबाई काळे यांचे तर पुरुष भजनी मंडळाचे अध्यक्षपदी रमेश जगताप, उपाध्यक्षपदी हरिभाऊ शिंदे, सचिव पदी सिद्राम हिंगणे यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रम ाचे संयोजन व नियोजन सामाजिक कार्यकर्ते महेश काळे यांनी केले होते.



## वलांडी येथे माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**वलांडी, दि.२३ डिसेंबर -**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील व्यंकटेश विद्यालय वलांडी येथील माजी विद्याचा स्नेह मेळावा पार पडला. २००१ च्या बॅचचे विद्यार्थ्यांनी स्नेह मेळावा व ऋणनिर्देश रविवार २२ डिसेंबर रोजी पार पडला. मित्रत्वाचे ऋणाणूबंध व गूरूजनांप्रति असलेली कृतज्ञता यात सामाजिक तेचे भान जपत दहावीतील वर्गमित्र तब्बल २३ वर्षाने एकत्र जमले. गप्पांची मैफील करीत जून्या आठवणींचा उजाळा दिला. या विद्यालयातील अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी वकील, डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक, बॅकेत व बिजनेसमन, शेतकरी आदी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. यावेळी मंचावर प्रा.राठोड, बिरगे, कूलकर्णी, बच्चेवार, कोमल, बाजूळगे, धनाजी पाटील, सागर, शंकर पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संध्या मूंजाळ, रेखा गूदळे, महादेवी उमाटे, स्वाती बच्चेवार, सिद्धेश्र्वर खवंदे, लारब पैलवान, शिवहार बिरादार, गिरीश बच्चेवार यांनी परिश्रम घेतले.



## ‘जिव्हाळा’तर्फे दूध जनजागृती अभियान

**उदगीर, दि.२३ डिसेंबर -**

जिव्हाळा ग्रुपतर्फे विश्वनाथराव माळेवाडी कर यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख पाहुणेव मार्गदर्शक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ नागपूरचे, शिक्षण विस्तार संचालक डॉ. अनिल भिकानेतसेच जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष रमाकांत बनशेळकी कर,शंकरराव साबणे, शंकरराव केंद्रे, दशरथ शिंदे व देविदास नादरगे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यापीठाच्या आवाहनानुसार दूध जनजागृती अभियान हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. अनिल भिकाने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वानाथ मुडपे गुरुजींनी केले. तर दशरथ शिंदे यांनी उपस्थिताचेआभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी चंद्रकांत रोडगे, चंद्रकांत पांचाळ, लक्ष्मीकांत बिडवे, पांडुरंग बोडके, वैजनाथ पंचगल्ले, हावगीराव आचार्य, अशोकराव बिरादार, नवनाथ पाटील, रामराव मोमले, सच्चिदानंद पुट्टेवाड, संजय कानगुले, वाडेकर इत्यादींनी परिश्रम घेतले.

## चंद्रशेखर महाजन यांचे निधन

**वलांडी, दि.२३ डिसेंबर -**



देवणी तालुक्यातील वलांडी येथील रहिवासी तथा भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर नागप्पा महाजन (वय ५८) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, दोन मुली, भाऊ असा परिवार आहे.

### सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे चाकूर नगरीत स्वागत...

# सोसायटीचा चेअरमन ते सहकार मंत्री या अनुभवातून राज्याचा विकास करणार : पाटील

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२३ डिसेंबर -**

चाकूर, अहमदपूर मतदार संघातून बाबासाहेब पाटील हे ३१ हजारांच्या लिडने निवडून आले. त्यानंतर महायुतीच्या सरकारने पाटील यांची कॅबिनेट मंत्रीपदी निवड केली. बाबासाहेब पाटील यांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मतदारसंघात कार्यकर्त्यांच्या गाठी भेटी घेण्यासाठी दि.२२ डिसेंबर रोजी मतदारसंघांत आले असता त्यांचे महायुतीतील राष्ट्रवादी, भाजप व शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले.

यावेळी फटाकांची अतीषभाजी करून पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला व ना. बाबासाहेब पाटील यांची सहकार मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल मतदारसंघात वेगवेगळ्या ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले.

चाकूर शहरातील राष्ट्रवादी संपर्क कार्यालय, अर्जुन मद्रेवार कृषी दुकान, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते सुरज शेटे यांच्या घरी तसेच चाकूर शहरातील विविध ठिकाणी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, माजी नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे, अनील वाडकर, संदीप शेटे, शिवदर्शन स्वामी, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ माने, नगरसेवक भागवत फुले, रामभाऊ कसबे, पपन कांबळे, नरसिंग गोलावार, रविकिरण स्वामी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

माध्यमांशी बोलताना ना. पाटील म्हणाले की, चाकूर अहमदपूर मतदारसंघाला आजपर्यंत कॅबिनेट मंत्री पद कोणत्याही पक्षानी दिले नव्हते पण राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी माझ्यावर विश्वास ठेऊन मतदारसंघाला प्रथमच कॅबिनेट मंत्री पद दिले आहे.

त्यामुळे अजित पवार यांनी ठेवलेला विश्वास मी सार्थ करून दाखवणार आणि मतदारांनी मला भरघोस मतानी निवडून दिल्याबद्दल निवडणुकीवेळी दिलेले आश्वासन पुर्ण करणार असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील माध्यमांशी बोलताना सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्यावर सहकाराची जबाबदारी दिली आहे.

त्यामुळे या राज्यातील एकही घटक सहकारापासून वंचित राहणार नाही याची मी काळजी घेणार असून सहकारामधील ज्या काही



त्रुटी आहेत. त्या दूर करणार आहे. लवकरच सहकार क्षेत्रातील तज्ञ मंडळीची कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून सहकार क्षेत्रातील कामागारांच्या प्रश्नावर चर्चा करण्यात येणार आहे.

तसेच सहकार क्षेत्रात असलेल्या अडचणीवरही सविस्तर चर्चा करून त्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ना. पाटील म्हणाले. सहकारा मध्ये पारदर्शकता आणणार असून विषमुक्त शेतीवर जास्तीत जास्त भर दिला जाणार आहे. सहकारी सोसायटीचा चेअरमन ते सहकार मंत्री असा प्रवास ना. बाबासाहेब पाटील यांचा आहे.

त्यामुळे सहकार क्षेत्रातील आजपर्यंतचा पाटील यांचा अनुभव नक्कीच सहकार क्षेत्राला उभारी देण्यासाठी भविष्यात कामी येईल असा विश्वास सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.

तसेच राज्यातील सहकार क्षेत्रातील समस्या सहकाराच्या म ुळाशी जाऊन नासोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आ. पवारांच्या हस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२३ डिसेंबर -**

औसा शिक्षण विभाग पंचायत समितीच्या वतीने कुमार स्वामी महाविद्यालय आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते सोमवार दि.२३ रोजी करण्यात आले. या विज्ञान प्रदार्शनात तालुक्यातील १४ केंद्रातील ७८ प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले.

महंत स्वामी शिक्षण शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव गिरीश पाटील, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, कुमारस्वामी महाविद्यालयाच्या प्राचार्या कुसूम ढोणे, तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, भाजपाचे शहराध्यक्ष सुनील उटगे, गटशिक्षण अधिकारी गोविंद राठोड, औसा तालुका शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे,पंचायत समिती शिक्षण विभागाचे सचिन वळके, आर.के. जाधव, नासिर पठाण, मधुकर कदम, विजय राठोड, किशोर सोनवणे, ज्ञानोबा कांबळे, रविंद्र मोतेवार, रघुनाथ कराड, अबुबकर सय्यद, अर्चना चव्हाण, सुमित्रा दिवे, सविता सानप, अनिरुध्र वाघमारे, निलिमा डोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

### तालुक्यातील विद्यार्थी शास्त्रज्ञ व्हावेत : आ. अभिमन्यू पवार

या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतक करीत पुढील काळात माझे जास्तीत जास्त लक्ष शिक्षण विभागाकडे असणार आहे. मतदारसंघातील शाळांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध असून जिजाऊंच्या नावाने सुरू असलेल्या जिजाऊ माझी शाळा न्यारी शाळा अभियान अधिक व्यापक करण्यात येणार आहे. त्यामधून अधिकाधिक शाळा भौतिक दृष्टीने अत्यंत सक्षम होतील. व भविष्यात विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन म जबूत होऊन आपल्या तालुक्यातुन देखील शास्त्रज्ञ तयार होणार असल्याचा विश्वास आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

औसा तालुक्यातील चौदा केंद्रातून केंद्र स्तरावर विज्ञान प्रदर्शन झाले आहेत. त्यामधून प्रत्येक केंद्रातून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन प्रयोग तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी पात्र ठरले होते. या तालुकास्तरीय दोन दिवशीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक स्तरावरील जवळपास ४४ तर माध्यमिक स्तरावरील ३० प्रयोग तर शिक्षकांमधून ४ प्रयोग सादर करण्यात आले आहेत.

# चाकूर येथे १७२ जवानांचा दीक्षांत समारंभ सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२३ डिसेंबर -**

लातूर जिल्ह्यातील चाकूर येथील सीमा सुरक्षा दलच्या सहाय्यक प्रशिक्षण केंद्राच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज परेड ग्राउंडवर दि.२१ डिसेंबर रोजी १७२ नवीन जवानांचा भव्य शपथविधी समारंभ परेड आयोजित करण्यात आला होता. या शपथविधी परेडची सलामी विनीत कुमार,महानिरीक्षक सहायाक प्रशिक्षण केंद्र, सिमा सुरक्षा दल चाकूर यांनी घेतली.

या नेत्रदीपक परेडचे नेतृत्व नवीन हवालदार हिमांशू यांनी केले. या हवालदारांचे प्रशिक्षण ५ फेब्रुवारी ते २१ डिसेंबर २०२४ पर्यंत ४४ आठवड्यांचे होते. त्यांचे मूलभूत प्रशिक्षण विनीत कुमार, महानिरीक्षक, सहायक प्रशिक्षण केंद्र, सीमा सुरक्षा दल, चाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. यामध्ये महाराष्ट्र, हरियाणा, राजस्थान, बिहार आणि पंजाब या राज्यांतील नवीन जवानांचा सम ावेश आहे. या समारंभात, त्यांच्या प्रशिक्षण कालावधीत उत्कृष्ट काम गिरी करणाऱ्या नवीन जवानांना महानिरीक्षक विनीत कुमार यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

# प्रेमनाथ विद्यालयाच्या प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२३ डिसेंबर -**

तालुक्यातील येरोळ जिल्हा परिषद शाळेत ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले. यात ३५ शाळांनी सहभाग नोदवला होता. या विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक गटातून तालुक्यातील थेरगाव येथील श्री प्रेमनाथ विद्यालयातील पांचाळ समर्थ राजेंद्र या विद्यार्थ्याने सादर केलेला प्रयोग द्वितीय आला.

या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षक पवार व्ही.एस. यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल स्मार्ट सिटी ची संकल्पना आपल्या प्रयोगातून मांडली होती. बक्षीस वितरण अधक्षस्थानी केंद्रप्रमुख बालुरे होते. यावेळी गटशिक्षणाधिकारी अनिल पागे प्रश्नाला येरोळचे मुख्यध्यापक निचले माजी केंद्रप्रमुख वाघमारे विषय तज्ञ सुनील गायकवाड उपस्थित होते. गटशिक्षणअधिकारी अनिल पागे यांच्या हस्ते विद्यार्थी पांचाळ समर्थ व विज्ञान शिक्षक व्ही. एस. पवार सराना प्रमाणपत्र व पदक देण्यात आले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय शिंदे सचिव बाबुराव पेठे उपाध्यक्ष नारायण पाटील, शंकर पाटील शाळेचे मुख्याध्यापक तांदळे, बेल्लेवाड, कसपटे, चिमनशेटे, सगर, सदानंदे यांनी अभिनंदन केले.

# मुला मुलींनी आई-वडिलांचा सन्मान करावा : उपजिल्हाधिकारी लटपटे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२३ डिसेंबर -**

पाश्चिमात्य संस्कृतीमुळे भारतीय संस्कृती आणि परंपरा नष्ट होत असून जीवनात सर्वच क्षेत्रात नेत्र दीपक यश प्राप्ती करण्यासाठी प्रत्येकांच्या मनाम नामध्ये आणि घराघरात मुला मुलींनी आपल्या आई-वडिलांचा सन्मान करावा आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गाने म ार्गक्रमण करावे असे आग्रही प्रतिपादन उपजिल्हाधिकारी मंजुषा लटपटे यांनी केले.

त्या यशवंत विद्यालयात अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला शाखा हेलस तालुका मंठा आणि मानस फाउंडेशन जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लातूर जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी प्रमुख मार्गदर्शिका म्हणून बोलत होत्या. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन शिंदे होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक विरप्पा भुसनुर, उप मुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक शिवाजी सूर्यवंशी, समन्वयक खयूम शेख, परीक्षक प्रा.डॉ. अनिल मुंडे, परीक्षक प्रा.डॉ. बासू भंडारी, प्रा.डॉ. बालाजी कारामुंगीकर, जिल्हा संयोजक राम तत्तापुरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पोलीस निरीक्षक विरप्पा भुसनुर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात शिस्त आणि संस्काराचे पालन केल्याने जीवन घडते असे सांगितले.

या विजयी स्पर्धकांना उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ, पुष्पहार, सन्मानपत्र स्मृतीचिन्ह, श्यामच्या आईचा ग्रंथ देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते येथे सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा संयोजक राम तत्तापुरे यांनी सूत्रसंचालन डॉ. शरद करकनाळे यांनी तर आभार प्रा.डॉ. बालाजी कारामुंगिकर यांनी म ानले.

कथाकथन यशस्वी करण्यासाठी बालाजी सोनटक्के, श्रीधर लोहारे, संतोष पारशेट्टे, राजेश कजेवाड, विजया स्वामी यांच्यासह कथामालेच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अहमदपूर येथे जागतिक ध्यान दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२३ डिसेंबर -**

२१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस अहमदपूर शहरामध्ये साजरा करण्यात आला. येथील डॉ. चेरेकर संकुल येथे जागतिक ध्यान दिवस साजरा करण्यात आला.

पहाटे साडेपाच वाजता डॉ. चेरेकर संकुल येथे ३९ सूर्यनम स्कारासह भगवान बुद्ध यांनी शिकवलेली आनापान साधना ही बुद्ध वंदना व त्रिशरण तसेच पंचशील यासहित घेण्यात आली. तसेच भगवान बुद्ध यांनीच शिकवलेल्या मंगल मैत्री साधनेचा अभ्यास करण्यात आला. या शिबिरासाठी डॉ. मधुसूदन चेरेकर, अशोक तावडे तळणीकर, बाळासाहेब जाधव जिरगेकर, संदेश कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावर्षीपासून संयुक्त राष्ट्र संघाने २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिवस म्हणून घोषित केला आहे. त्यानुसार आज पहिलाच जागतिक ध्यान दिवस झाला. ध्यानाचे महत्त्व हे आहे की आयुष्यात येणाऱ्या सुख दु:ख, ऊन पावसाळे, लाभ हानी, यश अपयश यांना तोंड देण्याचे धैर्य ध्यानामुळे येते, ध्यानामुळे एकाग्रता वाढते, मनाची प्रसन्नता वाढते, मोक्षाचा मार्ग खुला होतो. तरी सर्वांनी ध्यानाचा अभ्यास केला पाहिजे असे याप्रसंगी डॉ. चेरेकर यांनी सांगितले.

## महिले सोबत छेडछाड; एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२३ डिसेंबर -**

तालुक्यातील अंबानगर येथे महीले सोबत छेडछाड केल्याची घटना अंबानगर येथे घडली एका विरूद्ध २० डिसेंबर रोजी विनयभंगाचा गून्हा दाखल करण्यात आला आहे. देवणी पोलीसांच्या व तिने मिळालेली अधिक माहिती अशी की, तालुक्यातील अंबानगर येथील शबानाबी शामीद शेख रा अंबानगर फिर्यादीस शेताला जाण्याच्या वाटेच्या कारणावरून शिवीगाळ करून केसाला धरून मारहाण करून उजव्या हाताच्या ब्लाउज फाडून वाईट उद्देशाने हाताला धरून विनयभंग केला व जिवे मारण्याची धमकी दिली.

शबानाबी शामीद शेख (रा. अंबानगर ता. देवणी) यांच्या फिर्यादीवरून आरोपी बहादूर जाफरसाब शेख यांच्या विरोधात गून्हा नोंद करण्यात आला आहे.

# महिलांनी धन व्यवहारासोबत मन व्यवहारात वाढ करावी : पटेल

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२३ डिसेंबर -**

बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा धन व्यवहार वाढला आहे. आता गरज आहे ती म हिलांनी धन व्यवहारासोबत मन व्यवहारात वाढ करण्याची, असे मत महिला आर्थिक विकास म हामंडळ लातूरचे जिल्हा समन्वयक अधिकारी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासन अंगीकृत बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन स्मार्ट अंतर्गत झाशीची राणी लोकसंचलीत साधन केंद्र, विणाधारी महिला ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमीटेड यांच्या सहकार्याने स्त्री पुरुष संयुक्त मालकी हक्क एक दिवसीय कार्यशाळेत झाली. त्यावेळी ते बोलत होते. विभागीय समाज विकास तज्ञ रोहन कांबळे, सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी माविम लातूरचे दिपक टेकाळे, विनाधारी प्रोड्युसर कंपनीच्या डायरेकटर निर्मला खजूरे, झाशीची राणी लोकसंचलित साधन केंद्राच्या सहसचिव सुनीता खरात, तलाठी वाडेकर, व्यवस्थापक मंगल वाघचौरे सह्योगिनी दैवशाला मुंडे, सरोजा बनसोडे, अश्विनी पाटील, पत्रकार विश्वनाथ गुंजोटे, उपजीविका सल्लगार मंगेश थोरात, जिल्हा कार्यालयाचे विजयसिंह इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



पटेल म्हणाले, शेतकरी उत्पादन कंपनी, स्थापना, सदस्य नोंदणी, शेतकरी शेतमजूर यांना संधी, उम ेद, माविम मधील महिलांना संधी, महिलांनी फोन पे, गूगल पे सारखे माध्यम वापरून आर्थिक लेन देन वाढवावी. गटाच्या माध्यमातून विचारांची देवाण घेवाण करावी. धन व्यवहारासोबत मनव्यवहारात वाढ व्हावी. घर सक्षम करावे, उधोग उभारणी करावी. पितृसत्ताक पद्धतीचा उगम कसा झाला, हिंदू वारसा हक्का संबधीचा कायदा. जमीन हस्तांतरणाच्या प्रक्रिया, ७/१२ वाचन, ८ अ, फेरफार काय असतो. त्याचे वाचन कसे करावे, तसेच ७/१२ वर महिलेचे नाव नोंदणी, त्यासाठी लागणारे कागदपत्रे आधी बाबत मार्गदर्शन केले. यावेळी तलाठी वाडेकर, उदयोजक अयोध्या गुंजोटे, आदर्श महिला शेतकरी सुनीता खरात, स्म ार्टचे रोहित कांबळे यांचे मार्गदशन झाले. सुत्रसंचालन संगीता गवळी यांनी केले. तर अश्विनी पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

याप्रसंगी सुरय्या देशमुख व बोरफळ, चिंचोली जोगण, राजेवाडी, तांबरवाडी, किल्लारी, बोरफळ, कारला, जावळी, लखनगाव, उटी, भादा, गुळखेडा, शिंदाळा, काळमाथा, लामजना, आशिव, आदी गावच्या सीआरपी, समन्वयक उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## गोलाईतील फेरीवाल्यांचे होणार कायमस्वरूपी पुनर्वसन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** गंजगोलाईतील सुमारे ७० फूट रस्त्यावर हातगाडीवर व्यापार करणाऱ्या व्यावसायिकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. यासाठी गोलाईतीलच घंटे लॉजच्या मागील मैदान व नवयुक थिएटरच्या परिसरातील या हातगाडी व्यापाऱ्यांना जागा देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. याची अंमलबजावणी सोमवारपासून (दि.२३) करण्यात येणार आहे. संपूर्ण गोलाईचा सर्कल यापुढील काळात रिकामा राहणार आहे.

लातूर शहरातील प्रमुख व्यापारपेठ असलेल्या गंजगोलाईत व्यवसायासाठी अनेकांनी हातगाडीवर व्यवसाय सुरू केले आहेत. या भागात सुमारे ५०० पेक्षा जास्त हातगाडी व्यापारी आपले व्यवसाय करतात. गोलाईच्या आतील बाजुला भर रस्त्यावर हातगाड्या घेऊन व्यापारी फिरत असल्याने नागरिकांना चालण्यासाठीही जागा राहत नाही. या भागातून वाहन जाणे तर दुरापास्तच. यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते. नुकतेच उच्च न्यायालयाने आदेशित करून गंजगोलाईतील संपूर्ण अतिक्रमणे हटविण्याचे आदेश महापालिकेला दिले आहेत. त्या आदेशाचे पालन करण्यासाठी महापालिकेने या हातगाडी व्यावसायिकांसाठी आधी जागेचा शोध घेतला. तो लगेच मिळालाही. शहर बस थांब्याच्या मागील बाजूस घंटे लॉजच्या मागे मोकळ्या मैदानावर व नवयुग थिएटरच्या पटांगणात या हातगाडी व्यापाऱ्यांचे स्थलांतर करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेच्यावतीने पोलीस बंदोबस्तही मागविला आहे. सोमवारपासून पुढे या मोहिमेला पालिका सुरुवात करणार आहे. त्या भागात पालिकेच्या कर्मचाऱ्यांसह पोलीस गस्तीवर राहणार आहेत अशी माहिती देण्यात आली .



## संक्षिप्त वृत्त...

### विद्यार्थिनीची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** येथील काशीलिंगेश्वरनगरातील एका अपार्टमेंटमध्ये शिक्षणासाठी रुम करून राहणाऱ्या २१ वर्षीय विद्यार्थिनीने पंख्याला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. वैष्णवी विदेश कराड असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. तिचे मूळ गाव रेणापूर तालुक्यातील वाघदरी हे आहे. ती शिक्षणासाठी काशीलिंगेश्वरनगर येथील एका अपार्टमेंटमध्ये राहत होती. शनिवारी सायंकाळच्या सुमारास तिने रुममधील पंख्याला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतला. घटनेमागचे कारण अद्याप समजू शकले नाही. डॉ. विशाखा गायकवाड यांच्या माहितीवरून पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस कॉन्स्टेबल हराळे हे करीत आहेत.

### तिर्रट खेळताना सातजणांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** अवैध धंदे बंद व्हावेत यादृष्टीकोनातून जिल्हा पोलीस प्रशासनाबरोबरच पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचे विशेष पथक तैनात करण्यात आले आहे. असे असताना अवैध गुटखा आणि सुगंधित तंबाखूची इतर राज्यातून वाहतूक तर होत आहेच शिवाय शहरातील सार्वजनिक ठिकाणी जुगाराचे अड्डे दिसून येत आहेत.

मध्यरात्री सिद्धेश्वर चौकातून रत्नापूर चौकाकडे जाताना असलेल्या मोकळ्या जागेत तिर्रटचा डाव सुरु होता. या ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकाऱ्यांनी कारवाई करुन सातजणांना गांधी चौक पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. शनिवारी मध्यरात्री सिद्धेश्वर चौकाकडून रत्नापूर चौकाकडे जात असाताना नामदेव सलगर यांच्या पत्र्याच्या शेडमागे काहीजण जुगार खेळत असताना पोलीसांनी धाड टाकून सात जणांना ताब्यात घेतले.

### वाहनाखाली चिरडून मुलाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** तालुक्यातील कोळपा येथे उसाने भरलेल्या ट्रॉलीच्या मागच्या टायरखाली चिरडून एका तेरा वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दोन सख्खे भाऊ रस्त्याने चालत जात असताना खड्ड्यांमुळे एकजण जमिनीवर पडला आणि ट्रॅक्टरच्या ट्रॉलीच्या टायरखाली आला आणि गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला आहे.

ऊस गाळप हंगाम सुरू झाल्याने कोळपा गावातूनच उसाची मोठ्या प्रमाणात कारखान्याकडे वाहतूक केली जात आहे. तोहीद जमिर सय्यद (वय १३) व त्याचा भाऊ रस्त्यावरून जात होते. रस्त्यावरील खड्ड्यात तोहीदचा तोल गेला व तो खाली पडला. याचवेळी उसाची वाहतूक करीत असलेला ट्रॅक्टर कारखान्याकडे निघाला होता. ट्रॉलीच्या मागच्या टायरखाली तोहीद आल्याने त्याचा मृत्यू झाला.

### सोने चोरणारी महिला अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** शहरच नाहीतर सबंध जिल्ह्यात सोने चोरुन धुमाकूळ घालणाऱ्या महिलेला अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शहरातील गांधी चौक, शिवाजी नगर तसेच मुरुड आणि अहमदपूर या ठिकाणी वेगवेगळे असे सात गुन्हे त्या महिलेवर दाखल झाले होते. मुद्देमालासह महिलेला अटक करण्यात आली आहे. सोनाली मधुकर कसबे (वय २३, रा. साई नगर, लातूर) या महिलेने गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीत २ ठिकाणी तर शिवाजी नगर हद्दीत एवढेच नाहीतर अहमदपूरमध्ये ३ ठिकाणी हातचलाखी करुन महिलांच्या गळ्यातील, पर्समधील सोने चोरी केले होते. गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस या महिलेच्या मागावर होते. दरम्यान पोलीसांनी तिला ताब्यात घेवून तिच्याकडून सोने ताब्यात घेतले. गांधी चौक पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### विनापरवाना बॅनर्स मनपाने हटविले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** शहर महानगरपालिकेच्या वतीने शहरात लावण्यात आलेले विनापरवाना बॅनर्स, पोस्टर्स हटविण्यात येत आहेत. विशेषतः विद्युत खांबांवर लावण्यात आलेले जवळपास ५० बॅनर्स हटविण्यात आले आहेत. त्यामुळे गर्दीची ठिकाणे मोकळी दिसू लागली आहेत. लातूर शहरात खासगी इमारतींवर लावण्यात आलेल्या लोखंडी होर्डिंग्जची तपासणी केली जात आहे. ज्या ठिकाणी मोठी डिजिटल लावण्यात आली आहेत, त्याच्या लोखंडी फ्रेम मजबूत आहेत की नाही, याची तपासणी तज्ज्ञांमार्फत करण्यात आली आहे.

## लातूर-जहिराबाद महामार्गावरील अर्धवट कामे पूर्ण करा

**या महामागाला मंजूरीच मिळालीच कशी हा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे. निटूर गावाजवळ चक्क एल आकारात हा महामार्ग असून अशा प्रकारचा देशातील हा एकमेव महामार्ग असावा**

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** लातूर -जहिराबाद या राष्ट्रीय महामार्गावरील म्हाडा कॉलनी ते बाभळगाव, निटूरमोड व औराद शहाजानी आदी ठिकाणची अनेक कामे ठेकेदाराने अर्धवट अवस्थेत ठेवली आहेत. त्यामुळे अपघात होऊन अनेकांचे बळी गेले. शिवाय या महामार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले आहे. या महामार्गारील अपूर्ण कामे पूर्ण करावीत, संबंधित ठेकेदार व अभियंता यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे आदींसह मागण्यांसाठी १६ डिसेंबरपासून लोदगा सरपंच पांडूरंग गोमारे यांनी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे.

उपोषणाच्या सहाव्या दिवशीही कोणताच अधिकारी आला नाही. यामुळे उपोषणकर्ते गोमारे यांनी जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, अशी भूमिका घेत त्यांनी उपोषण सुरुच ठेवले आहे.

**सरपंच गोमारे यांचे मागणीसाठी उपोषण सुरू**

लातूर-जहिराबाद महामार्गावरील निटूर ते औराद शहाजानी दरम्यानच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्याच्या मधोमध लांबच्या लांब मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत.

त्यामुळे दुचाकीचे टायर अडकून अपघात झाले आहेत आणि होत आहेत. त्या भेगा तात्काळ भरुन रस्त्याचे काम करावे, अपूर्ण राहिलेल्या रस्त्याचे व बाजूची भिंती, पेव्हर ब्लॉक, पूल, रस्त्यावरील स्ट्रीटलाईट, वृक्ष लागवड, रस्त्याचे सुशोभीकरण व इतर कामे तात्काळ पूर्ण करावीत, ठेकेदार व अभियंता यांनी निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे. सदरील महामार्गावर अनेक ठिकाणी वाहन जंपिंग होऊन अपघात होत आहेत, ही जपिंग कशामुळे होत आहे याची माहिती देऊन दुरुस्ती करावी, कंत्रटदाराला काळ्या यादीत टाकावे, ठेकेदार व अभियंता यांच्यावर आजपर्यंत या महामार्गावर रस्ता अपघाता मृत्यूमुखी पडलेल्या लोकांच्या मृत्यूस जबाबदार धरून ठेकेदार व अभियंता यांच्या मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, आदींसह विवध मागण्यांसाठी १६ डिसेंबरपासून लोदगा गावचे सरपंच पांडूरंग गोमारे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले आहे.

## लातुरात विज्ञान प्रदर्शनाचे बक्षीस वितरण



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** लातूर पंचायत समितीचा शिक्षण विभागातर्फे श्री राजगुरु प्राथमिक विद्यालयात आयोजित दोन दिवशी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमाकांत होनराव होते. मंचावर गटविकास अधिकारी तुकाराम भालके, गटशिक्षणाधिकारी निवृत्ती जाधव रविंद्र पाटील, ओंकार होनराव, ऐश्वर्या होनराव, डायट प्राचार्या डॉ. भागीरथी गिरी, जयपाल कांबळे, उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार, विकास सोनी आदी उपस्थित होते. दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनात लातूर तालुक्यातून एकूण १२७ प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले. या प्रयोगांमधून उच्च प्राथमिक विद्यार्थी गटातून प्रथम ऋतुजा कापसे केशवराज विद्यालय लातूर, द्वितीय राचय्या स्वामी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोकनगाव, तृतीय सानवी रसाळ जिजामाता कन्या प्रशाला लातूर, दिव्यांग गटातून प्रथम अनिरुद्ध आगलावे स्वामी विवेकानंद विद्यालय लातूर, माध्यमिक विद्यार्थी गटातून प्रथम पांचाळ विद्यासागर स्वामी विवेकानंद विद्यालय लातूर, द्वितीय विद्या सोमवंशी जिल्हा परिषद प्रशाला बोरी, तृतीय आदित्य बरमदे, सदानंद विद्यालय लातूर, प्राथमिक शिक्षक गटातून प्रथम पठाण रिनाज महानगरपालिका शाळा क्रमांक १५, माध्यमिक शिक्षक गटातून प्रथम वैभव धोत्रे साने गुरुजी माध्यमिक विद्यालय लातूर तर प्रयोगशाळा सहायक गटातून अंबादास धिवार अनुसूचित जाती/जमाती नवबौद्ध मुलांची शासकीय शाळा, लातूर यांनी पटकावला. या स्पर्धेचे उत्कृष्ट परीक्षण खंदाडे व्यंकोबा, महेशकुमार जाधव, अंकुश ज्ञानेश्वर, ठोंबरे अनुराधा, कबाडे अनघा, सूर्यवंशी विशाखा यांनी केले. या प्रदर्शनास लातूर शहर व ग्रामिण भागातील

विद्यार्थी व शिक्षक, पालक यांनी उत्स्फूर्तपणे भेट देऊन प्रयोगांची पाहणी केली. याप्रसंगी डायटचे ज्येष्ठ अधिव्याख्याता जयपाल कांबळे, लातूर जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार, विकास सोनी यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रातील असंख्य वाटा सांगून शास्त्रज्ञ बनण्याबाबत प्रेरणा दिली. अध्यक्षीय समारोप होनराव यांनी केला. प्रास्ताविक रविंद्र पाटील तर सूत्रसंचालन बालाजी शेळके यांनी केले. आभार चंद्रहंस म्हेत्रे यांनी मानले.

## निकृष्ट रस्ता कामाच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीस समिती

### अहवाल येताच गुत्तेदाराला काळ्या यादीत टाकणार, आयुक्तांनी घेतली दखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** शहरातील खोरी गल्लीत करण्यात येणारे रस्ता डांबरीकरणाचे काम निकृष्ट असल्याच्या तक्रारीची दखल महापालिका आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी तत्काळ घेतली आहे. या कामाची पाहणी उपायुक्त डॉ. पंजबराव खानसोळे यांनी केली. काम थांबविण्याचे आदेश दिले. कामाची चौकशी करण्यासाठी अभियंत्यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली आहे. अहवाल प्राप्त होताच गुत्तेदाराला काळ्या यादीत टाकण्यात येणार आहे.

शहरातील खोरी गल्लीतील शिवनेरी हॉटेल ते कावेरी हॉस्पिटलपर्यंतच्या रस्ता डांबरीकरणाचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेतून करण्यात येत आहे. हे काम ए. आर. कन्स्ट्रक्शनला देण्यात आले आहे. गुत्तेदाराने शिवनेरी हॉटेलपासून कामाला सुरुवात केली आहे. हे काम निव्वळ थातुर-मातुर पध्दतीने करण्यात येत आहे.

**अनेकांनी केल्या होत्या तक्रारी**

जुन्या रस्त्यावरची धूळही साफ न करता सदर गुत्तेदाराने कुठे तरी

डांबर पसरले. त्यानंतर लगेच ग्रीटचा थर अंथरुन त्यावर रोलर फिरविला. परंतु, डांबरीकरणाचे काम करायचे झाल्यास सुरुवातीला जुन्या रस्त्यावरची संपूर्ण धूळ स्वच्छ करण्यात येते. त्यानंतर मोठ्या खड्ड्यांमध्ये दीड, एकइंची खडी टाकून ते डाबंर टाकून बुजविण्यत येतात. त्यानंतर त्यावरून ग्राऊटींग करण्यात येते. त्यावर पुन्हा एलबीएमचा पाऊण व अर्धा इंच मिसळीचा थर टाकण्यात येतो. त्यानंतर अर्धा इंच व ग्रीट मिसळून पहिला डांबरीकरणाचा थर टाकण्यात येतो. त्यानंतर सिल्कोटचा म्हणजेच मऊ डांबरमिश्रित मालाचा थर टाकून त्याची दबाई करण्यात येते. ते उखडू नये म्हणून डस्ट टाकण्यात येते. अशी डांबरीकरण कामाची पध्दत असताना सदर ए. आर. या गुत्तेदाराने जुन्या रस्त्यावर थेट कुठेतरी डांबर शिंपडले, त्यावर ग्रीटचा थर टाकला. वरून पुन्हा बारीक ग्रीट टाकले. असे अतिशय निकृष्ट काम करून गुत्तेदार पुढे जात होता. परंतु, अनेक सामाजिक व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी सदर काम निकृष्ट होत असल्याच्या तक्रारी महापालिका आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांच्यापर्यंत पोहोचविल्या. मनोहरे यांनी तत्काळ सदर कामाची पाहणी करण्याच्या सूचना उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांना दिल्या. खानसोळे हे बाहेरगावी असतानाही त्यांनी लातूरमध्ये येऊन कामाची पाहणी केली, तत्काळ काम थांबविण्याच्या सूचना केल्या. तत्काळ महापालिकेच्या अभियंत्याला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. यावर महापालिकेतील अभियंत्यांची त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली. ही समिती रस्ता कामाचा अभ्यास करून पालिका आयुक्त मनोहरे यांच्याकडे अहवाल सादर करणार आहे. त्यानंतर ए, आर. कन्स्ट्रक्शन या गुत्तेदाराला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

सध्या सुरू असलेले शिवनेरी हॉटेल ते कावेरी हॉस्पिटलपर्यंतच्या रस्त्याचे खोरी गल्लीतील काम हे अत्यंत निकृष्ट पध्दत्तीने होत असून या निकृष्ट कामाचे दखल घेतली असून जर अहवालात दोष आढळला तर त्या गुत्तेदारास काळ्या यादीत टाकले जाणार आहे.

## डॉ. प्रमोद घुगे अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** डॉक्टरी पेशापेक्षा इतर कारणांनी चर्चेत असलेल्या आणि खून करून पलायन केलेल्या एका डॉक्टरला पोलिसांनी उत्तराखंड मधील हरिद्वार येथून ताब्यात घेतले.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की,दि. ११ डिसेंबर रोजीशहरातील आयकॉन हॉस्पिटल मध्ये बाळू भारत डोंगरे, (वय ३५ वर्ष )हा कामाला होता. याच दवाखान्यात डॉ. प्रमोद घुगे याने पैश्याच्या कारणावरून लिफ्टचे काम केलेल्यास मारहाण केली होती. त्यावेळी डोंगरे याने तो आरोप स्वतःवर घेतला होता. नंतर डॉ. घुगे आणि डोंगरे यांच्यात पैश्याच्या कारणावरून नेहमीच वाद होत असत. त्यामुळे चिडून जाऊन घुगे व अनिकेत मुंडे यांनी डोंगरे याला जबर मारहाण केली. या मारहाणीत डोंगरे मरण पावल्याचे दिसताच घुगे व मुंडे फरार झाले. मयताच्या नातेवाईकाने दिलेल्या फिर्याद वरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे घुगे, अनिकेत मुंडे यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच नमूद आरोपी हे फरार झाले होते. आरोपीचा शोध घेण्यासाठी सर्वत्र पथके रवाना करण्यात आली होती. दरम्यान पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून गुन्ह्यातील फरार आरोपी घुगे याला सोमवारी सकाळी उत्तराखंड राज्यातील हरिद्वार येथून ताब्यात घेण्यात आले आहे. सदरचे पथक आरोपी डॉ. घुगे यांना सोबत घेऊन लातूर मध्ये आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

## अंधश्रध्दा निर्मूलन समितीची आळंदीत परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी स्थापन केलेल्या अंधश्रध्दा निर्मूलन समितीला ३५ वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्त आळंदी येथे संविधान जागर राष्ट्रीय परिषद व महाराष्ट्र अंनिसचे राज्य अधिवेशनाचे आयोजन २७, २८ व २९ डिसेंबर असे तीन दिवस होणार आहे, अशी माहिती अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी लातूर येथे रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



बावगे म्हणाले, राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन शुक्रवारी (दि.२७) सकाळी १०.३० वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी अंनिसचे अविनाश पाटील राहणार आहेत. उद्घाटक म्हणून खुदाई खिदमतनगरचे नेते फैजलखान राहणार आहेत. यावेळी कार्याध्यक्ष माधव बावगे यांची उपस्थिती राहणार आहे. तीन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संविधानाचा जागर तीन दिवस होणार आहे. या परिषदेचा समारोप सायंकाळी ५ वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी माधव बावगे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सुभाष वारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी माजी मंत्री संजय बनसोडे हे मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर २८ व २९ डिसेंबर असे दोन दिवस अंनिसचे राज्य अधिवेशन होणार आहे. याचे उद्घाटन कामगार नेते बाबा आढाव यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी माधव बावगे राहणार आहेत. यावेळी अविनाश पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यानिमित्त दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वैचारिक मेजवाणी मिळणार आहे. या अधिवेशनाचा समारोप २९ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता होणार आहे. समारोप कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत उत्तम कांबळे यांची उपस्थिती राहणार आहे. अध्यक्षस्थानी माधव बावगे राहणार आहेत.

या संविधान जागर राष्ट्रीय परिषद व अधिवेशनात संविधानाचा जागर होणार आहे. विचारांचे आदान-प्रदान होणार आहे. या परिषद व अधिवेशनाला लातूर जिल्ह्यातून सुमारे १०० पदाधिकारी व कार्यकर्ते जाणार आहेत, असे माधव बावगे यांनी यावेळी सांगितले. पत्रकार परिषदेस अंनिसच्या रुक्साना मुल्ला, सुनीता आरळीकर उपस्थित होते.



## प्रा. योगेंद्र यादव यांची आशियाना निवासस्थानी भेट

### माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केला सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** ज्येष्ठ राजकीय विश्लेषक, सामाजिक कार्यकर्ते व भारत जोडो अभियानचे प्रमुख प्रा. योगेंद्र यादव यांनी येथील आशियाना निवासस्थानी भेट दिली. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विविध विषयांवर प्रा. योगेंद्र यादव यांनी दिलीपराव देशमुख यांच्यासोबत चर्चा केली. यावेळी रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक यशवंतराव पाटील, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, विनायकराव पाटील कवठेकर, सुभाष लोमटे, डॉ. गणेश गोमारे, अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष श्याम भोसले, ॲड. उदय गवारे, सुपर्ण जगताप, डॉ. बी. आर. पाटील, भाऊसाहेब उमाटे, सचिन पाटील, सचिन दाताळ, बाळासाहेब जाधव निंबाळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## डॉ. संदीपान जगदाळे यांना पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** दयानंद कला महाविद्यालय येथील संगीत विषयाचे प्रा. डॉ संदीपान जगदाळे यांना आर्ट बिटस् फौंडेशन, पुणे यांच्याकडून 'कला भूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

आर्ट बिटस् फौंडेशन ही संस्था गेली २४ वर्षे सातत्याने कलाकारांना प्रोत्साहन तसेच उत्तम व्यासपीठ देण्यासाठी कार्यरत आहे. चित्र, शिल्प, संगीत, अभिनय, नृत्य, लोककला तसेच इतर सर्व कलाक्षेत्रात काम करणाऱ्या कलाकारांना आर्ट बिटस् फौंडेशन या संस्थेमार्फत पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

प्राध्यापक यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना संस्थेमार्फत पुरस्कार देण्यात आला. डॉ. संदीपान जगदाळे यांनी तबला वादन, संगीत शास्त्र, संगीत प्रचार व लोककला इत्यादी क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

## मानवाच्या जीवन शैलीत अमुलाग्र बदल : डॉ. सुप्रिया नायर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ डिसेंबर-** मानवी जीवनाला तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे जीवन शैलीत अमुलाग्र बदल झालेले आहेत. जीवन शैलीतील बदलामुळे अनेक आव्हानात्मक व गुंतागुंतीचे आजार उत्पन्न होत आहेत. सध्या स्थितीतील रोगांचे वाढते प्रमाण लक्षात घेता परिणामकारक फिजिओथेरपी उपचार पध्दती व तज्ज्ञ यंत्रणेस अत्याधुनिक फिजिओथेरपी उपकरणांची जोड दिल्यास सर्व प्रकारच्या मानवी आजारांवर मात करणे शक्य आहे, असे मत परिषदेच्या प्रमुख पाहुण्या तथा पाँडिचेरी येथील मदर तेरेसा फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुप्रिया विनोद नायर यांनी व्यक्त केले.

लातूर येथील महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फिजिओथेरपी येथे आयोजित प्रथम राष्ट्रीय इलेक्ट्रोकॉन २४ परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुण्या तथा मार्गदर्शक म्हणून डॉ. सुप्रिया बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड हे होते. यावेळी परिषदेचे ऑर्गनायझिंग चेअरमन तथा प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, ऑर्गनायझिंग सेक्रेटरी डॉ. गौरव भटनागर, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे निरीक्षक डॉ. विरेंद्र मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती.

मानवी आजारांचे वाढते प्रमाण आणि गुंतागुंतीवर आधुनिक वैद्यकीय शास्त्रातील उपचाराबरोबर फिजिओथेरपी उपचार हे अत्यंत महत्वाचे ठरतात. अत्याधुनिक फिजिओथेरपी उपकरणांमुळे उपचारातील अचुकता वाढली असून ही उपकरणे उपचारात, पुनर्वसनात, सुधारणा घडवून आणण्यासाठी व उपचार कालावधी कमी करण्यासाठी मदतीची ठरत असल्याचे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. सुप्रिया नायर म्हणाल्या की, अत्याधुनिक वेदना व्यवस्थापन वैद्यकीय उपकरणे वेदनाशामक औषधांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी मदतीचे ठरत आहेत.

वेदनाग्रस्त अवयवावर अशा उपकरणांच्या माध्यमातून उपचार करुन रुग्ण बरा होण्यास मदत होते. पॅरेलिसिस, मेंदूरोग, हृदयरोग, फुफ्फुसाचे रोग, दुखापत, अपघात अशा कारणांमुळे कमकुवत व अशक्त स्नायू असलेल्या रुग्णांमध्ये विशिष्ट उपकरणांव्दारे स्नायूंना उत्तेजित करण्यास मदत होते. वेदनेने ग्रासलेले अनेक रुग्ण समाजात आहेत. मात्र माहिती व जागृती अभावी हे रुग्ण उपचारापासून वंचित आहेत. अशा रुग्णांना फिजिओथेरपी उपचाराच्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे, असे डॉ. सुप्रिया नायर यांनी शेवटी सांगितले.

यावेळी बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, वैद्यकीय क्षेत्रात फिजिओथेरपी ही शाखा अतिशय महत्वाची असून या शाखेची गरज दिवसेंदिवस वाढत असून तरुणांना करिअरच्या दृष्टीकोनातून ही शाखा फायद्याची आहे. वैद्यकीय, आयुर्वेद या शाखांबरोबर फिजिओथेरपी शाखेची तितकीच गरज आहे. लातूरात होत असलेली राज्यातील पहिली इलेक्ट्रोकॉन - २४ राष्ट्रीय फिजिओथेरपी परिषद ही संशोधक, डॉक्टर व विद्यार्थ्यांच्या हिताची ठरेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. यावेळी डॉ. गौरव भटनागर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर परिषदेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते परिषदेची स्मरणिका उपस्थितांना भेट देण्यात आली. या परिषदेचे सूत्रसंचालन डॉ. नेहा सिंग यांनी केले तर आभार डॉ. शितल घुले यांनी मानले. या परिषदेस देशभरातील फिजिओथेरपी विषयाचे ४०० प्राध्यापक, संशोधक, डॉक्टर, विद्यार्थी हे प्रत्यक्ष तर अभाशी माध्यमातून ९५६ जण उपस्थित होते.